01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B

ASS/ 10:10

04-01-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SGJ/ ST/ AKN/ 10:00

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

**श्री.गिरीष बापट** (संसदीय कार्य मंत्री ) :आजची अर्धा-तास चर्चा सकाळी 10.00 वाजता सुरु होत आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत अर्धातास चर्चेचा क्रम देण्यात आलेला आहे. त्यामुळे क्रमवार चर्चा उपस्थित न करता जे सदस्य उपस्थित आहेत, ज्या विभागाचे मंत्री उपस्थित आहेत त्यानुसार चर्चेला सुरुवात करण्यात यावी. आज सर्व सन्माननीय सदस्यांच्या अर्धा-तास चर्चेला माननीय मंत्री महोदय, उत्तर देणार आहेत एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**तालिका सभामपती (श्री.रामनाथ मोते ) :** आता अर्धातास चर्चा घेण्यात येतील परंतु जे मंत्री महोदय उपस्थित असतील त्यानुसार अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल. आजच्या अर्धातास चर्चा क्रमवार घेतल्या जाणार नाहीत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा आहे. अर्धातास चर्चेच्या संदर्भात कामकाज पत्रिकेत जो क्रम दिलेला आहे तो कशासाठी दिलेला आहे ? मंत्री महोदयांनी सभागृहात वेळेवर उपस्थित रहावे यासाठीच तो देण्यात आलेला आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सर्व सन्माननीय मंत्री महोदय सभागृहात हजर आहेत.

तालिका सभापती : कामकाज पत्रिकेत दुसऱ्या क्रमांकावर दर्शवण्यात आलेली श्रीमती शोभा फडणवीस यांच्या अर्धा-तास चर्चेला प्रथम सुरुवात करण्यात येत आहे.

**पृ.शी.** : राज्यात विशेषतः विदर्भ, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या अवैध वीज बिलाबाबत

**मु.शी.** : राज्यात विशेषतः विदर्भ, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या अवैध वीज बिलाबाबत या विषयावरील तारां□त प्रश्न □मां□ 517 ला दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, राज्यात विशेषतः विदर्भ, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या अवैध वीज बिलाबाबत या विषयावरील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तारांकित प्रश्न क्रमांक 517 ला दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. ..2..



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस .......

सभापती महोदय, मी आज अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने विद्युत मंडळावरील काही प्रश्न उपस्थित करणार आहे. चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा या तीन जिल्हयातील शेतकऱ्यांना विजेचे रिडींग न घेता बिले दिली जातात व हीच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची लूट आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हे हे नक्षलवादी जिल्हे असून ते दुर्गम भाग आहेत. या ठिकाणी अधिकारी पोहचू शकत नाही तर रिडींग घेणारे कर्मचारी कसे काय पोहचू शकतील ? विजेची कनेक्शन असुन सुध्दा त्यांची पुर्णपणे रिडींग घेतली जात नाही हा खरा महत्वाचा प्रश्न मी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने उपस्थित करत आहे. चंद्रपूर जिल्हयात शेती पंपधारक 25938 आहेत, गडचिरोली जिल्हयात शेती पंपधारक 18968 आहेत, वर्धा जिल्हयात शेती पंपधारकांची संख्या 56694 आहे. परंतु रिडींगचे काम होत नसल्याचे कारण असे आहे की, रिडींगचे काम शासकीय कर्मचारी घेत नाहीत तर रिडींग घेण्यासाठी एक स्पेशल युनीट उभे केले असून त्यासंदर्भात वेगळे टेंडर काढून रिडींगचे काम देण्यात आलेले आहे. टेंडरच्या माध्यमातून ज्या कंत्राटदाराला काम दिले जाते ते रिडींग न घेता विजेची देयके पाठवितात अशा प्रकारची तक्रार माझ्याकडे आलेली आहे. गडचिरोली, चंद्रपूर किंवा वर्धा या जिल्हयातील अर्ध्यापेक्षा जास्त तालुक्यांमध्ये रस्तेच नाहीत. जिल्हयांमध्ये 50 टक्के रस्ते नाही, पिण्याचे पाणी नाही, वाहतुकीची व्यवस्था नसल्यामुळे रिडींग घेणारे कर्मचारी रिडींग घेण्यासाठी जात नाही अशी शंका आमच्या मनात निर्माण झालेली असून ही परिस्थिती या तीनही जिल्हयातील आहे. रिडींग न घेता वीज देयक पाठविले जातात. आमच्या भागात रब्बी पीक घेतले जात नाही तर खरीप पीक घेतले जाते. खरीप पिकासाठी पहिले चार महिने शेतीचे पंप चालतात. भाजीपाल्यासाठी नंतर एक दोन महिने शेतीचे पंप चालतात. नंतर विविरीत आणि तलावामध्ये पाणीच राहात नसल्यामुळे वीज पंप बंद असतात. मार्च, एप्रिल, मे व जून या चार महिन्यात आमच्याकडील शेती पंप बद असतात. पाणी नसतांना, पंप बंद असतांना शेतकऱ्यांना जर 4-4 हजार रुपयाचे वीज देयके येत असेल तर ही वीज देयके घरी बसून तयार करण्यात आली हे सिध्द करण्याची दुसरी कोणतीही आवश्यकता मला वाटत नाही. शेतकऱ्याच्या

विहिरीत पाणी नसतांना, पंप बंद असतांना त्याला जर 2000 रुपयांचे बिल आले व त्यासंदर्भात विद्युत मंडळाकडे तक्रार केली तर अधिकारी नेहमी प्रमाणे सांगतात की, पहिले तुम्ही पैसे भरा मग

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस .......

नंतर बघू. शेतकऱ्याने पैसे भरले तर विद्युत मंडळाचे अधिकारी काही लक्ष देत नाही आणि पुढील महिन्यात पुन्हा तशाच प्रकारचे बिल पाठवितात आणि हाच खरा महत्वाचा प्रश्न आहे. माझ्याकडे एका शेतकऱ्याने तक्रार केली की, सन 2012-2013 मध्ये उन्हाळयात पंप बदं असतांना मला 2000 रूपयांचे बिल पाठवले.त्यानंतर पुन्हा एक हजाराचे बिल पाठवले, त्यानंतर पुन्हा एक हजाराचे बिल पाठवले. पंप बदं असताना बिल पाठवणे योग्य नाही. त्यामुळे रिडींग घेऊनच वीज बिल पाठविले गेले पाहिजे असे आदेश माननीय मंत्री महोदयांनी विद्युत मंडळाला द्यावेत अशी विनंती मी या निमित्ताने करते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात रिडींग घेऊन विद्युत देयक देण्यात आलेल्या ग्राहकांची संख्या 1888, गडचिरोली येथे 14362, वर्धा येथे 46162 अशी संख्या आहे.

सभापती महोदय, रिडींग घेऊन विद्युत देयक देण्यात आलेल्या ग्राहकांची टक्केवारी गडचिरोली येथे 69.74, चंद्रपूर येथे 79.9 आणि वर्धा येथे 81.28 अशी आहे.

सभापती महोदय, विद्युत रिडींग सरासरी वीज वापर झालेल्या युनीटची संख्या पुढील प्रमाणे आहे. चंद्रपूर जिल्हयात 7848, गडचिरोली जिल्हयात 3797 आणि वर्धा जिल्हयात 10572 आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात रिडींग घेऊन 740.24 ग्राहकांना विद्युत देयके देण्यात आली आहेत. रिडींग उपलब्ध न झालेल्या ग्राहकांना 655.7 युनीटचे विद्युत देयके देण्यात आलेली आहेत. याचाच अर्थ तुम्ही केवळ 50 टक्के मीटरचे रिडींग घेता व 50 टक्के रीडींग न झालेल्या ग्राहकांना बिल पाठवितात असा त्याचा अर्थ होतो.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयात रिडींग घेऊन विद्युत देयके देण्यात आलेल्याची संख्या 927.4 युनीट व रिडींग न करता दिलेले 719.96 युनीट. चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे आदिवासी जिल्हे आहेत. ज्यांच्या घरात खाण्यास अन्न नाही अशा लोकांना अशा प्रकारची बिले देणे म्हणजे ही त्यांची लूट आहे असे माझे स्पष्ट मत आहे. वर्धा जिल्हयात 689.4 युनीट सर्व्हे करून दिले. 859.70 युनीट रिडींग न करता दिलेली बिले आहेत. एवढया मोठया प्रमाणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रिडींग न घेता बिले देत असाल तर आपण अशा कंत्राटदारांवर कारवाई का करीत नाही ? रिडींग घेऊन बिले पाठवली गेली पाहिजेत असा उल्लेख त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये आहे. ..4..



श्रीमती शोभा फडणवीस .......

सभापती महोदय, अशाच प्रकारे घरगुती बिले सुध्दा पाठवली जातात. किती युनीट वीज वापरली याची माहिती बिलामध्ये दिली जात असते. माझ्याकडे एक उदाहरण असे आहे की, एका व्यक्तीला जुलै महिन्यात 3500 युनीट वीज वापर दाखवण्यात आले. ऑगस्ट महिन्यात 100 युनीट अधिक वापरले असेल तर 3600 युनीट वापर दाखवावयास पाहिजे आणि सप्टेंबर महिन्यात 3700 युनीट वीज वापर यावयास पाहिजे. परंतु जुलै महिन्यात 3500 ऑगस्ट महिन्यात 3700 तर सप्टेंबर महिन्यात 3800 युनीट वीज वापर दाखवण्यात आले. ओरिजन आकडेवारी तशीच परंतु वरील आकडेवारी जुलै पासून ऑगस्ट,सप्टेंबर महिन्यापर्यंत वाढते युनीट दाखवण्यात आले. यासंदर्भात तक्रार केली तर प्रथम पैसे भरा असे सांगितले जाते. त्यामुळे शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने न्याय देण्यासाठी खऱ्या अर्थाने वीज रिडींग आले पाहिजे. शेतीचे पंप बद असतांना विजेचे रिडींग यावयास नको तर "पंप बंद" असे वीज बिलामध्ये लिहिले गेले पाहिजे. पैसे आधी भरा यापेक्षा अगोदर चौकशी करा व मगच बिलाची मागणी करा अशी पध्दत सुरु व्हावी अशी मी या निमित्ताने मंत्री महोदयांकडे मागणी करते.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, आमच्या ज्येष्ठ नेत्या आणि ज्यांना आदिवासी व दुर्गम भागातील पूर्व विदर्भ आणि विदर्भाती प्रश्नांची संपूर्ण जाण आहे. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या विकासासाठी खर्ची घातले अशा आदरणीय श्रीमती शोभा फडणवीस यांनी विजेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. रिडींग न घेता बील देण्यात येणे, रिडींगचे काम आऊट सोर्सिंग करणे, बिलाचे वेळेवर वाटप न होणे, वर्षभर बील पडून राहणे, कृषी पंप बंद असताना बील देण्यात येणे, कृषी पंपाना पैसे भरण्याची सक्ती करणे अशा अनेक बाबी त्यांनी आपल्या भाषणात सांगितल्या.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा येथील दिलेली आकडेवारी अगदी बरोबर आहे. गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, नागपूर या भागातील विजेचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आदिवासी विभागाच्या दृष्टीने विजेचा प्रश्न महत्वाचा आहे. मी ऊर्जा विभागात ज्या काही सुधारणा करणार आहोत त्या संदर्भातील माहिती सभागृहाला देतो.

सभापती महोदय, आतापर्यंत रिडींग बील हे मुख्य अभियंत्याच्या पातळीवर झोनवाईज होत होते आणि ते सॅटेलाईटद्वारे होत होते. सुरुवातीला हे काम मुख्य अभियंत्याकडे होते आणि जिल्ह्याच्या एका कॉन्ट्रॅक्टरकडे होते आणि तो कॉन्ट्रॅक्टर पाच-पाच वर्षे काम करायचा. मग अधीक्षक अभियंत्याकडे या कामाचे आऊटसोर्सिंग देण्यात आले. त्यानंतर हे काम कार्यकारी अभियंत्याकडे देण्यात आले. उप अभियंत्याकडे 40-50 गावांचे सर्कल असते. आपण सब डिव्हीजन लेव्हलवर हे काम देत नाही तोपर्यंत या कामात सुधारणा होणार नाही. तेव्हा मी हे काम डिसेन्ट्रलाईज करण्याचा निर्णय घेतला. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, दिनांक 1 एप्रिल, 2015 पासून झोन लेव्हलला काम न होता ते सब डिव्हीलन लेव्हलवर होईल. सब डिव्हीजन लेव्हलवर हे काम दिल्यानंतर कॉन्ट्रॅक्टर प्रत्येकाच्या घरी जाऊन मीटर रिडींग घेऊन त्याप्रमाणे बिलाचे वाटप करणार आहे. मीटर रिडींग घेतल्याशिवाय बिलाचे वाटप करणार नाही अशी आम्ही काळजी घेणार आहोत. गडचिरोली जिल्ह्यातील काही भागात जाण्यासाठी रस्ते नाहीत अशा ठिकाणी ते अपवाद होऊ शकते. परंतु 90 टक्के ठिकाणी मीटर रिडींग घेतल्यानंतरच बील दिले पाहिजे अशी सक्ती उप डिव्हीजन लेव्हलला करणार आहोत. सब डिव्हीजन लेव्हलकरुन मीटर रिडींग आल्यानंतर ते

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

जिल्ह्याच्या आय.टी.सेंटरला उप अभियंता ते बील जाणार. आपण या बिलाचे वाटप करण्यासाठी यंत्रणा तयार करणार आहोत.

सभापती महोदय, विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सदस्यांना वीज कंपनीमध्ये कोणताही व्हॉईस नव्हता. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विद्युत नियम 2003 नुसार एक फोरम तयार केला. विधानसभेच्या आमदारांच्या अध्यक्षतेखाली तालुक्याची समिती असेल, त्या समितीमध्ये विधानपरिषदेचे सदस्य देखील असतील. त्या समितीची तीन महिन्यांतून एक बैठक होईल. त्या समितीमध्ये कार्यकारी अभियंता, उप अभियंता, विभागाचे सचिव, तहसीलदार आणि अन्य सदस्य असे एकूण 18 सदस्य असतील. आपण तीन महिन्यांची मॅन्डेटरी बैठक केलेली आहे. सन 2003 च्या कायद्याप्रमाणे ती समिती कॉन्स्टिटीटयुशनल आहे. ही समिती मीटरच्या रिडींगच्या प्रश्नापासून केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनेचा आढावा घेऊ शकते. त्या समितीच्या माध्यमातून पूर्ण कारभार चालणार आहे. तेव्हा यापुढे विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांना विजेच्या संदर्भात प्रश्न मांडण्याची संधी फार कमी मिळेल. ही समिती स्थापन करण्याचे आदेश काढलेले आहेत. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण तत्काळ या समितीचे गठन करावे. आपण पहिल्याच बैठकीत आपल्या विभागातील विजेचे प्रश्न सोडविता येतील.

सभापती महोदय समितीच्या बैठकीमध्ये चुकीच्या मीटर रिडींगबाबत आढावा घेऊ शकता. त्या बैठकीस संबंधित कॉन्ट्रॅक्टरला उपस्थित रहावे लागणार आहे. कॉन्ट्रॅक्टरने चूक केली आहे असे समितीस वाटले तर त्याच दिवशी त्या कॉन्ट्रॅक्टरचे टेंडर स्क्रॅप करण्याचा अधिकार समितीस दिलेला आहे. तसेच कॅान्ट्रॅक्टरला दंड करण्याचा अधिकार समितीस देत आहोत.

सभापती महोदय, या समितीमध्ये विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, तहसीलदार, कृषी अधिकारी (स्टेट), तालुका कृषी अधिकारी, डी.वाय.एस.पी. त्या विभागातील पोलीस इन्स्पेक्टर, त्याशिवाय माननीय पालकमंत्री शासकीय आणि अशासकीय सदस्य वाढवू शकतात. यामध्ये आणखी काही सुधारणा असतील तर त्या निश्चितपणे करण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

सभापती महोदय, आपण फीडर मॅनेजमेंट योजना आणत आहोत. एका अभियंत्याकडे चार-पाच फीडर्सची कामे आहेत आणि एका फीडरवर जवळपास सहा ते सात हजार वीज कनेक्शन्स असतात. म्हणजे एका शाखा अभियंत्याकडे जवळपास पंचवीस ते तीस हजार कनेक्शन्स आहेत. आता आपण सहा ते सात हजार कनेक्शन असतील तेथे फीडर मॅनेजमेंट सिस्टीम आणत आहोत. त्यामध्ये एक बी.ई.इलेक्ट्रीक झालेला उमेदवार असेल, शिवाय त्याच्या जोडीला आय.टी झालेले पाच उमेदवार देत आहोत. हे काम प्रायव्हेटद्वारे करणार आहोत. या फीडर मॅनेजमेंटच्या माध्यमातून मीटर रिडींग घेणे, बिलाचे वाटप करणे, मेन्टेनन्स करणे अशी सर्व कामे होणार आहेत. अशाप्रकारे शाखा अभियंत्याकडे जवळपास 30-35 लोकांची यंत्रणा तयार होणार आहे. या सर्व कामांचा काहीही खर्च महावितरण कंपनीला येणार नाही कारण आपण ऑलरेडी हे काम आऊटसोर्सिंग करुन त्याचे पैसे देत आहोत. आपण एका फीडरवर 60 ते 70 हजार रुपये खर्च करीत आहोत. आता तो खर्च फीडर मॅनेजमेंट सिस्टीमवर होणार आहे. या फीडर मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे संपूर्ण काम करुन घेत आहोत.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून ज्येष्ठ सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सूचना केल्याप्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीत सुधारणा झाल्या नाहीत तर पुन्हा त्यांच्या सोबत एक बैठक घेण्यात येईल. आपण येथे सूचविलेल्या सर्व मुद्यांचे तंतोतत पालन करण्याचा प्रयत्न करुन जनतेला न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहील एवढेच मी या निमित्ताने येथे सांगतो.

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : बीड जिल्ह्यात अनेक गावांना दुष्काळ निधी वाटप होण्यास होत असलेला विलंब

**मु.शी.** : बीड जिल्ह्यात अनेक गावांना दुष्काळ निधी वाटप होण्यास होत असलेला विलंब या विषयावरील तारां□त प्रश्न □मां□ 352 ला दिनांक 24 डिसेंबर, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.अमरसिंह पंडित,वि.प.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "बीड जिल्ह्यात अनेक गावांना दुष्काळ निधी वाटप होण्यास होत असलेला विलंब" या विषयावरील तारां□त प्रश्न □मां□ 352 ला दिनां□ 24 डिसेंबर,2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात आणि आताच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून मी हा प्रश्न उपस्थित केला होता, परंतु तो प्रश्न चर्चेला येऊ शकला नाही, म्हणून मी अर्धा-तास चर्चेला सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, मी हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर संबंधित विभागाने जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार आणि त्या दुष्काळग्रस्त भागातील बँकांकडे निधी वितरित केलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

आजच्या घडीला सदरहू रक्कम बँकेला प्राप्त झालेली आहे. ही रक्कम बँकेला प्राप्त होऊन 15 दिवस झालेले आहेत. वास्तविक पाहता अशाप्रकारे मदतीची रक्कम बँकेला प्राप्त झाल्यानंतर बाराखडीतील वर्णानुक्रमानुसार त्या रकमेचे संबंधित गावांतील शेतकऱ्यांना वाटप होते. परंतु यामुळे शेतकऱ्यांना सहा-सात महिन्यांनंतर मदतीची रक्कम मिळते. शेतकऱ्यांना मदतीची रक्कम सहा-आठ किंवा दहा महिन्यानंतर मिळत असेल तर ते ठीक नाही. अशाप्रकारे शेतकऱ्यांना मदतीची रक्कम विलंबाने मिळत असेल तर त्या रकमेचा फायदा खरीप हंगामासाठी सुध्दा होत नाही.

महोदय, सन 2012-13 च्या दुष्काळाच्या अनुषंगाने शासनाने मंजूर केलेला दुष्काळ निधी बँकेला प्राप्त झालेला असताना सुध्दा केवळ अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे त्या रकमेचे लाभार्थ्यांना प्रत्यक्षात वाटप करता आलेले नाही. महोदय, या संदर्भात बीड जिल्ह्याची परिस्थिती अतिशय भयानक आहे. गावचे सरपंच किंवा प्रमुख तहसीलदारांना किंवा तहसील कार्यालयातील विशिष्ट कर्मचाऱ्याना भेटले आणि त्यात सौदा झाला तर वर्णानुक्रमानुसार वाटप करण्याची पध्दत बाजूला ठेवून संबंधित गावातील शेतकऱ्यांना दुसऱ्याच दिवशी मदतीचे वाटप केले जाते. महोदय, हा आरोप मी जबाबदारीने करीत आहे. बीड जिल्ह्यात अशा तऱ्हेने गँगींग-अपचे काम सुरु आहे. या संदर्भात विचारणा केली असता, बँक आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन सांगितले जाते की, तहसीलदारांनी आदेश दिल्यामुळे संबंधित गावांना मदतीचे वाटप करण्यात आले. तहसीलदारांकडे विचारणा केली तर सांगितले जाते की, ही रक्कम बँकेने वितरित केली आहे. महोदय, सहा-सहा महिने दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत वितरित होत नसेल तर संबंधित तहसीलदारांवर कारवाई करणार आहात की नाही ? दुष्काळ आणि गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या पात्र लाभार्थ्यांना शासकीय मदतीचे वाटप करताना जी अनियमितता झालेली आहे त्याला प्रतिबंध घालण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? वास्तविक पाहता मदतीची रक्कम ही दुष्काळ, गारपीट किंवा पिकांवर एखादा रोग आल्यानंतर म्हणजेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी दिली जाते. काल एका प्रस्तावाला उत्तर देताना माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी बँकेत खाते न उघडल्यामुळे त्यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खात्यामध्ये मदतीची रक्कम जमा होऊ शकलेली नाही.  परंतु दुसऱ्या बाजूला जनधन योजनेंतर्गत





श्री.अमरसिंह पंडित....

दिवसभरात अमुक इतक्या शेतकऱ्यांनी बँकेमध्ये खाते उघडले आहे, अशा बातम्या आम्ही वर्तमानपत्रांतून वाचतो.  मराठवाड्यात शेतकऱ्यांनी बँकेत खाते न उघडल्यामुळे त्यांना मदत मिळू शकली नाही. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे बँकेत खाते नसल्यामुळे बरीच मोठी रक्कम परत गेली आहे.  महोदय, बीड जिल्ह्याची राज्य बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अडचणीत आहे. त्यातल्या त्यात राष्ट्रीयकृत बँकांवर कोणाचेही नियंत्रण नसल्यामुळे त्यांच्याकडे तुटपुंज्या रकमेसाठी शेतकऱ्यांच्या नावे बँक खाते उघडण्यास वेळ नाही.  जे शेतकरी त्या बँकांकडे खाते उघडण्यासाठी जातात त्यांना सांगितले जाते की, तुम्ही अमुक इतक्या वेळेमध्ये या.  शिवाय गावकऱ्यांना बँक खाते उघडण्यासाठी महसुली ठिकाणी जावे लागत असल्यामुळे त्यांना खाते उघडता येत नाही. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे बँक खाते नसल्यामुळे त्यांना देण्यात आलेली मदतीची रक्कम परत आली आहे.  ही बाब राज्य सरकारच्या दृष्टीने लाजिरवाणी आहे.  या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भात जी अनियमितता झाली आहे त्यातून मार्ग काढण्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना आखणार आहे ? 2012-13 चा दुष्काळ निधी बीड तालुक्यातील आहेर चिंचोली, तांदळवाडी, माळापुरी, लोळदगांव, कुर्ला, महाजनवाडी  अशा सहा गावांसाठी आला होता. या सहा गावातील 3443 शेतकऱ्यांना 4773 एकर बाधित क्षेत्रासाठी, 84,52,718/- रुपये अनुदान केव्हा वितरित करण्यात येणार आहे ? माननीय मंत्री महोदय उत्तरात सांगतील की, ही रक्कम बँकेला दिलेली आहे.  मी स्पेसिफिक विचारतो की, ही रक्कम 2012-13 या वर्षातील असल्यामुळे ती रक्कम पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासाठी शासनाकडून कोणती पावले उचलण्यात येणार आहेत ?

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे (मदत व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. हे खरे आहे की, त्यांनी डिसेंबरच्या अधिवेशनात हा विषय उपस्थित केला होता. हा विषय 2012-13 या वर्षाशी संबंधित आहे. बीड जिल्ह्यातील सहा गावांना दुष्काळ निधी वाटप झाला नसल्याबाबतची ही अर्धा-तास चर्चा आहे.

महोदय, या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, शासनाकडून देण्यात आलेला सदरहू दुष्काळ निधी बँकेला प्राप्त झाला आहे. बँकेमध्ये दुष्काळाचा निधी उपलब्ध असताना प्रत्यक्षात पात्र शेतकऱ्यांना तो मिळाला नाही. हा विषय दुष्काळ, गारपीट या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्यांबाबतचा आहे. तहसीलदार, प्रांताधिकारी किंवा ज्यांनी या निधीच्या वाटपात दिरंगाई केली असेल किंवा जाणूनबुजून कामात कुचराई केली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. वास्तविक पाहता या विषयी संबंधित अधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. संबंधित तहसीलदारावर कायद्याच्या नियमानुसार तातडीने कारवाई करण्यात येईल आणि सर्व पात्र शेतकऱ्यांना दुष्काळ निधी मिळेल अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येईल.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी बँकेमध्ये खाते उघडले नाही म्हणून निधी परत गेल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींची माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या दालनात बैठक घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी डिसेंबरच्या अधिवेशन हा विषय सभागृहात उपस्थित करुनही, पात्र शेतकऱ्यांना निधी वाटप झालेला नाही. त्यामुळे ज्या जबाबदार अधिकाऱ्यांनी कामात कुचराई केली आहे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : आता अर्धा-तास सूचना क्रमांक-3 चर्चेला घेण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, या अर्धा-तास चर्चेला उत्तर देणारे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे सभागृहात उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : माझ्या माहितीनुसार आपल्या अर्धा-तास चर्चेला माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे उत्तर देणार आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना सभागृहात बोलावून घ्यावे, असे मला वाटते.

**तालिका सभापती** : माझ्याकडे असलेल्या रेकॉर्डनुसार आपल्या अर्धा-तास चर्चेला माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे हे उत्तर देणार आहेत आणि ते सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यामुळे आपण भाषण सुरु करावे.

(माननीय मंत्री श्री.विनोद तावडे सभागृहात प्रवेश करतात.)

माननीय मंत्री श्री.विनोद तावडे नुकतेच सभागृहात आलेले आहेत. त्यामुळे आपण अर्धा-तास चर्चा क्रमांक-3 उपस्थित करावी.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : जात प्रमाणपत्रासाठी सन 1965 पूर्वीच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे

**मु. शी.** : जात प्रमाणपत्रासाठी सन 1965 पूर्वीच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, यासंबंधी श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"जात प्रमाणपत्रासह अनेक शासकीय कामकाजासाठी शालेय अभिलेख पुरावा म्हणून वापरण्यात येणे, शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिल्यानंतर जात प्रमाणपत्रासाठी सन 1965 पूर्वीच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची मागणी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी करणे, अनेक शाळा महाविद्यालयात शैक्षणिक अभिलेख्यांचे जतन सुस्थितीत न केल्यामुळे असे पुरावे मिळण्यास अडचणी निर्माण होणे, शालेय अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतीसाठी आणि अभिलेख्यांमध्ये साम्य येणाच्या दृष्टीने जात, धर्म, जन्मस्थळ, दिनांक यांसह इतर बाबींबाबत नियम करण्याची आवश्यकता असणे, शैक्षणिक अभिलेख्यांचे सुस्थितीत जतन करण्यासाठी त्याचे संगणकीकरण करणे याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, जात प्रमाणपत्रासह अधिवास, राष्ट्रीयत्व दाखल्यासाठी प्रशासनाकडून वेळोवेळी पुरावा म्हणून शालेय दस्तऐवजांची मागणी केली जाते. मुस्लीम व मराठा समाजाला आरक्षण देण्याचे जाहीर केल्यानंतर अनेकांना जात प्रमाणपत्र काढावयाचे होते. त्यावेळी अर्जदारांकडे सन 1965 पूर्वीचा शाळा सोडल्याचा दाखला पुरावा म्हणून सादर करण्याची मागणी केली जाऊ लागली. विविध प्रमाणपत्रांसह अनेक शैक्षणिक कामकामांसाठी शालेय अभिलेखे पुरावा म्हणून आवश्यक आहेत. अलीकडच्या कालखंडात ही बाब ज्यांना जात प्रमाणपत्रांची गरज आहे त्यांना प्रकर्षाने जाणवू लागली आहे. परंतु आजच्या घडीला शालेय अभिलेखे जतन करण्याची पध्दत शासन प्रणालीमध्ये कोठेही दिसून येत नाही. शासकीय किंवा खाजगी संस्थेच्या शाळा/महाविद्यालयांमध्ये शालेय अभिलेखे स्कॅन किंवा अन्य माध्यमातून जतन करुन ठेवण्याची पध्दत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दिसून येत नाही. कोणत्याही शाळा-महाविद्यालयाने सन 1965 पूर्वीचे रेकॉर्ड ठेवल्याचे दिसून येत नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

अनेक शाळांमध्ये अभिलेखे बेजबाबदारपणे ठेवले आहेत आणि त्यांना वाळवी लागली आहे. गेल्या 5-6 वर्षांपूर्वी गोदावरीला आलेल्या महापूरामध्ये तेथील शाळांतील अनेक अभिलेखे खराब झाले होते. आता त्यांच्याकडे ठरलेले उत्तर आहे की, सर्व अभिलेखे वाहून गेले आहेत, वापरण्याजोगे नाहीत, अस्पष्ट दिसत आहेत. सभापती महोदय, तेथील शाळांमध्ये अशी लेखी उत्तरे देण्यात येत आहेत. शालेय अभिलेख्यांचे प्रमाणिकरण करण्यात आलेले नाही आणि ही बाब तर त्यापेक्षाही अधिक गंभीर आहे. अनेक ठिकाणी शाळा सोडण्याच्या प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याची जात, धर्म, जन्म ठिकाण, आईचे नाव हे व्यक्तीसापेक्ष पध्दतीने लिहिले आहेत. टीसीचा फॉर्मट संपल्यावर शाळांतील मुख्याध्यापकांनी त्यांच्या सोयीनुसार फॉर्मट तयार केलेला आहे, जात आणि जातीमध्ये पोट जात, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव असे आपल्या इच्छेनुसार कॉलम टाकलेले आहेत. प्रत्येक शाळेत प्रत्येकाने स्वतःला पटेल तसे केले आहे. टीसीचा ठरलेला फॉर्मट नाही. टीसीचा फॉर्मट असावा असे ठरलेले नाही. मनाला येईल तसा टीसीचा फॉर्मट तयार करून टीसी वितरित केले आहे. अनेक शाळांत असे प्रकार होत आहेत.

सभापती महोदय, मध्यंतरी मराठा मुस्लीम आरक्षण जाहीर झाले त्यावेळी प्रमाणपत्रे घेण्यासाठी लोक उत्साहाने गेले. परंतु ज्यावेळी सन 1965 पूर्वीचा पुरावा मागितला त्यावेळी दुर्दैवाने त्यांना पुरावा देता आला नाही. भविष्यात अशा अडचणी टाळायच्या असतील तर शालेय अभिलेख्यांचे प्रमाणिकरण करणे अतिशय आवश्यक आहे. आपण शालेय अभिलेखे स्कॅन करून लॅमिनेट करून शाळेत ठेवणार आहात का ?

सभापती महोदय, महसूल मंडळामध्ये काम करणारी एक प्रमुख व्यक्ती असते. शिक्षकालाच त्या संदर्भातील अतिरिक्त जबाबदारी दिली जाते. आपण तशी त्यावर जबाबदारी देऊन हे काम करणार आहे का, प्रशासकीय दृष्टीने महत्त्वाचे असलेले शालेय अभिलेखे जतन करण्यासाठी नेमकी कोणती कार्यवाही करणार आहात, कोणती पावले उचलणार आहात की यासाठी आऊटसोर्सिंग करणार आहात ? आपण या संदर्भात नेमकी कोणती भूमिका घेणार आहात याचा उल्लेख उत्तरात यावा. शालेय अभिलेख्यांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी नियम करण्याची गरज

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

आहे. प्रत्येकाने टीसीचा फॉर्मट वेगळा केलेला असल्यामुळे सर्व काही मिसमॅच होते आणि प्रमाणपत्रे देण्यामध्ये अडचणी येतात. आपण एसटी प्रवर्गातील, ओबीसीमधील मुस्लीमांमधील लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सन 1965 च्या पूर्वीचे पुरावे मागत आहात. लोकांना केवळ ते पुरावे मिळत नाहीत म्हणून ते शासकीय योजनांपासून वंचित राहतात. माझ्याकडे एक उदाहरण आहे. माझ्या मुलीची बॅचमेट एसटी प्रवर्गातील आहे. दुर्दैवाने तिच्याकडे सन 1965 पूर्वीचा पुरावा नसल्यामुळे तिला एसटी प्रवर्गाचे कोणत्याही प्रकारचे लाभ मिळालेले नाहीत. ती मुलगी मेडिकलला आहे. तिच्याकडे एसटी प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र नाही. कारण तिच्या वडिलांकडे सन 1965 पूर्वीचे पुरावे नाहीत. एसटी प्रवर्गातील पारधी, महादेव-कोळी हे लोक गावकुसापासून 2 कि.मी. बाहेर राहणारे लोक आता मूळ प्रवाहात येऊ लागले आहेत. त्यामुळे या लोकांकडे सन 1965 पूर्वीचे पुरावे कोठून येणार ? आपल्याला आजच्या आज काही सापडत नाही त्यामुळे त्या लोकांना ते मिळणे ही अतिशय अशक्य कोटीतील बाब आहे. भविष्यात या अडचणी टाळायच्या असतील तर या संदर्भात ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, शालेय अभिलेखे जतन करण्याच्या संदर्भात विशिष्ट अशा प्रणालीचा वापर करणार का, टीसीचा फॉर्मट तयार करण्यासाठी नियम करणार का ? हा विषय अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. आम्हाला आपल्या उत्तरातून हेच अपेक्षित आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राज्यातील गोरगरीब, दलित, आदिवासी समाजाला मिळणारे जात प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखले आणि दस्तऐवज शैक्षणिक संस्थांनी जतन करण्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे. हा मुद्दा गंभीर आहे. कारण सन 1950 पूर्वीचा पुरावा म्हणजे 65 वर्षांपूर्वीचा पुरावा जातीच्या दाखल्यासाठी किंवा जात वैधता प्रमाणपत्रासाठी मागितला जातो. आपण रहिवासाचा पुरावा किंवा अन्य बाबींसाठी 15 वर्षांची मुदत देतो. मग जातीच्या दाखल्यासाठी सन 1950 पूर्वीचा पुरावा का मागितला जातो हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. शासन या संदर्भात लवकरच धोरणात्मक निर्णय घेईल आणि सन 1950 नंतरचे अलीकडचे पुरावे कसे घ्यायचे किंवा त्यासाठी काय ग्राह्य धरायचे हे पाहण्यात येईल.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयातील माधुरी पाटील व अन्य या प्रकरणाचा नेहमी दाखला दिला जातो आणि त्याप्रमाणे हे सर्व जातीच्या दाखल्याच्या संदर्भात नियमन केले आहे. मागच्या काळात बोगस ओबीसी, एसटींतील लोकांनी बोगस दाखले आणल्याने त्यांना शासकीय किंवा अन्य शैक्षणिक सवलती मिळाल्या. त्यामुळे मूळ आदिवासींना त्यापासून वंचित रहावे लागले. आपण बोगस आदिवासींमुळे खऱ्या आदिवासींना सवलतीपासून वंचित रहावे लागू नये म्हणून जात प्रमाणपत्रासाठी सन 1950 पूर्वीचा पुरावा मागतो. आपले म्हणणेही खरे आहे की, त्यांना 65 वर्षांपूर्वीचे पुरावे देता येणार नाहीत. ते वाड्यापाड्यांवर राहणारे आदिवासी बांधव आहेत, ते भटक्या विमुक्त समाजातील आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एसटी संवर्गातील एक विद्यार्थीनीचा उल्लेख केला आहे. पूर्वीपासून विशिष्ट जिल्ह्यामध्ये आदिवासी बांधवांचे वास्तव्य असल्यामुळे आपण त्या जिल्ह्याच्या बाहेरील आदिवासींना प्रमाणपत्र देत नव्हतो. परंतु आता नोकरी किंवा शिक्षणाच्या निमित्ताने आदिवासी बांधव इतर जिल्ह्यांत राहण्यास गेले आहेत. त्यामुळे विशिष्ट जिल्ह्यात आदिवासी बांधव राहतात असे न मानता, इतर जिल्ह्यांत राहणाऱ्या आदिवासी, एसटी, ओबीसी, स्पेशल बीसी यांना दाखले देण्याच्या संदर्भात शासनकडून लवकरच निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शालेय दस्तावेज जतन करण्याच्या संदर्भातील विषय देखील उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, शासन त्यासंबंधी देखील निश्चित विचार करेल. सभापती महोदय, हा काही विशिष्ट समाजचा विषय नाही. राज्यातील नागरिकांना त्या त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे ....

प्रवर्गातील सोयीसवलती मिळाव्यात याकरिता जातीचा दाखला काढताना शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात येतो. त्यामुळे या सर्व बाबी जतन करणे गरजचे आहे. शासन त्यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या संदर्भात लवकरच निर्णय घेईल.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी अर्धा-तास चर्चा वाचलेली नाही असे दिसत आहे. जातीचा पुरावा म्हणून सन 1965 पूर्वीचा पुरावा मागणे हा त्यातील पूरक मुद्दा आहे. माझा मूळ मुद्दा शालेय अभिलेखे जतन करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली निर्माण करणार का, सदर बाबतीत धोरणात्मक पावले उचलणार का, जेणेकरून ते सुरक्षित ठेवता येतील असा होता. माननीय राज्यमंत्र्यांनी त्या संदर्भात त्रोटक सांगितले आहे. या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आले, ते या संदर्भात सविस्तर माहिती देतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सदर अर्धा-तास चर्चा शालेय शिक्षण विभागाला मार्क केली पाहिजे होती. परंतु विधिमंडळाने ही अर्धा-तास चर्चा सामाजिक न्याय विभागाला मार्क केली आहे. माननीय मंत्र्यांनी बाकी सांगितेले मुद्दे महत्त्वाचे आहेत, या निमित्ताने ते मुद्दे देखील पटलावर येणे आवश्यक होते. त्यामुळे माननीय सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांचे उत्तरही उपयोगी आहे.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या विषयाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, जनरल रजिस्टर क्रमांक 1 मध्ये सर्व नोंदी असतात आणि त्याचा फॉर्मट राज्यासाठी एकच असतो. सदर फॉर्मटमध्ये बदल करता येणार नाही. एसएस कोडमध्ये तो फॉरमॅट आहे. नोंदी जतन करण्याची मर्यादा कायमस्वरूपी रेकॉर्ड या संवर्गात आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे अभिलेखे खराब होतात आणि गरज असताना ते सापडत नाहीत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

आपले राज्य आता डिजिटल इंडियाकडे सरकत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या सर्व नोंदी संगणकीकृत करुन त्या कायम स्वरुपी जतन केल्या जातील. जेणेकरुन भविष्यात नैसर्गिक आपत्ती, अपघात किंवा काही गैरप्रकार घडल्यास नोंदी गहाळ होणार नाहीत. संगणकीकृत नोंदीमुळे पुढील अनेक पिढ्यांना त्या सुरक्षितपणे मिळू शकतील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नोंदी संगणकीकृत करण्याबाबतचा मनोदय या ठिकाणी व्यक्त केला आहे. त्यांचा हा मनोदय किती कालावधीत ते पूर्ण करणार आहेत, एवढा खुलासा त्यांनी केला तर बरे होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, डिजिटल इंडिया या कार्यक्रमासंदर्भातील कालावधी स्वतः मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केला आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला शाळांमधील नोंदींचाही विषय अतिशय महत्त्वाचा आहे. कोणत्याही समाजातील लोकांना अत्यंत उपयोगी असलेले प्रमाणपत्र आणि आरक्षणाच्या बाबतीत सध्या जे काही चाललेले आहे, त्या अर्थाने हे काम आपण लवकरात लवकर करु. अर्थसंकल्पात या दृष्टीने जी तरतूद झाली आहे त्यामुळे हे काम लगेच सुरु होऊ शकते.

-----------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : नाशिक येथे पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करणे

**मु. शी.** : नाशिक येथे पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करणे यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

***"विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय नाशिक येथे पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असणे, नाशिकमध्ये आरोग्य विज्ञान विद्यापीठ ही वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असूनही येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सदर पी. जी. इन्स्टिटट्युट सुरु करणेसाठी शासनाने तातडीने "आवश्यक प्रमाणपत्र" निर्गमित करुन नाशिकमध्ये पदव्यूत्तर महाविद्यालय सुरु करण्याची आवश्यकता व याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."***

सभापती महोदय, नाशिक येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयामध्ये पदव्युत्तर शिक्षण सुरु करण्यासंबंधी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये येणाऱ्या लोंढ्यांमुळे मुंबईतील रुग्णालयांवर पडणाऱ्या ताणाची चर्चा आज आपण करतो. त्यामुळे रुग्णालये हा एक महत्त्वाचा विषय आहे. नाशिक सारख्या ठिकाणी चांगल्या पध्दतीने औषधोपचाराच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात, चांगले दवाखाने निर्माण व्हावेत व त्याचा लाभ उत्तर महाराष्ट्रामधील सर्व नागरिकांना व्हावा, अशी अपेक्षा आहे. म्हणूनच आरोग्य विज्ञान विद्यापीठाला असे वाटले की, नाशिक येथे आरोग्य विज्ञान विद्यापीठ असूनही येथे मेडिकल कॉलेज आणि पोस्ट ग्रॅज्युएट इंन्स्टिटट्यूट नाही व त्या दृष्टीने त्यांनी सदरचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाघव.......

सभापती महोदय, दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते की, पूर्वी आघाडी सरकारच्या काही मंत्री महोदयांमध्येच या विषयावरुन बेबनाव होता. त्यामुळे संबंधित सिव्हिल हॉस्पिटलकडून या प्रस्तावाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य होत नव्हते. हॉस्पिटलमध्ये असलेल्या सोयीसुविधा आणि उपलब्ध मनुष्यबळ याबाबतची माहिती विद्यापीठाने सिव्हिल हॉस्पिटलकडे मागितली होती. मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एक वर्ष होऊनही संबंधित सिव्हिल सर्जनने या संदर्भातील अहवाल दिलेला नाही. पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट आणि डी.एम.ई.आर. यांच्यामध्ये आवश्यक तो समन्वय नाही. आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करु इच्छितो की, या दोन्ही विभागांमधील समन्वय साधावा, आवश्यक असलेल्या प्रमाणपत्राची उपलब्धता करुन द्यावी आणि विद्यापीठाचा पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट सुरु करण्यासंबंधीचा जो प्रस्ताव गेल्या अडीच वर्षांपासून राज्य शासनाकडे प्रलंबित आहे, त्याला तत्काळ मान्यता देण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन संपण्यापूर्वी सर्व संबंधितांची एकत्रित बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावावा. अशा प्रकारची कार्यवाही मंत्री महोदय करतील काय ?

-----------

..4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना झालेला अधिवेशन संपण्यापूर्वी कार्यवाही करणे, हा रोग आता संसर्गजन्य होऊ पहात आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी एका प्रलंबित प्रश्नाच्या संदर्भात ही अर्धा-तास सूचना दिली आहे. नाशिक येथे गेल्यानंतर माननीय माजी आरोग्य मंत्री डॉ.दौलतराव आहेर व त्यांचे चिरंजिव श्री.राहूल तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी वारंवार या प्रश्नासंबंधीचा पाठपुरावा केलेला आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न मार्गी न लागण्यामागील अनेक कारणे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितली आहेत. यापूर्वीच्या आघाडी सरकारमध्ये या प्रश्नासंबंधी मंत्री महोदयांमध्ये बेबनाव होता, असेही त्यांनी सांगितले आहे. शिक्षणासारख्या विषयात असा बेबनाव असू नये, असेही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या सन 2000 च्या नियमावलीनुसार वैद्यकीय महाविद्यालयाला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे शक्य आहे. पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम सुरु करावयाचा असेल तर त्या ठिकाणी एम.बी.बी.एस.कॉलेज असणे आवश्यक आहे, हा त्यांचा एक नियम आहे. पदव्युत्तर संस्था सुरु करण्यासाठी 300 रुग्ण खाटांचे रुग्णालय उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामध्ये जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, स्त्रीरोग, प्रसुती तंत्र या उपचाराच्या सोयीही असणे आवश्यक आहेत. त्या व्यतिरिक्त ज्या विषयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करावयाचा आहे, त्या विषयाच्या विभागामध्ये स्वतंत्रपणे 30 रुग्ण खाटा असल्या पाहिजेत. शिक्षक-प्राध्यापकांच्या संख्येबाबत एकास एक असे प्रमाण असले पाहिजे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची ही नियमावली असली तरी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नाशिक महानगरपालिका संचलित रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पदव्युत्तर वैद्यकीय संस्था स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

सभापती महोदय, चंदीगड येथील पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूटचे उदाहरण आपल्यासमोर आहे. त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज नसताना इन्स्टिट्यूटला मान्यता देण्यात आली होती. कारण,

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

त्यावेळी ही नियमावली नव्हती. ती सन 2000 पासून अस्तित्त्वात आली आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या पोस्ट ग्रॅज्युएट ॲक्ट, 2000 च्या कलम 8 (अ) चा वापर केला तर स्पेशन केस म्हणून एक्झम्शन सर्टिफिकेट आपल्याला मिळविता येऊ शकते. त्यानुसार सन्माननीय सदस्यांनी आग्रही मागणी केली आहे आणि ती नाशिकची गरजही आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे आहे. तेथे मेडिकल कॉलेजही उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांना स्वतंत्र मेडिकल कॉलेजची गरज नाही. त्या ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आरोग्य विज्ञान विद्यापीठाला महापालिकेने आपले रुग्णालय देऊ केले आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएट संस्था सुरु करणे शक्य असेल तर महाराष्ट्र सरकार म्हणून आपण निश्चित प्रयत्न करु. हे अधिवेशन संपण्यापूर्वी असा प्रयन होऊ शकणार नाही. पण एक्झम्शन सर्टिफिकेट मिळविण्यासाठीचे सर्व प्रयत्न आपण करु. त्यासाठी मी स्वत: मेडिकल कौन्सिलशी बोलेन, केंद्रीय स्वास्थ्य मंत्री महोदयांना जाऊन भेटेन, नाशिकच्या सर्व लोकप्रतिनिधींना बरोबर घेऊन जाईन आणि नाशिक येथे चंदीगडच्या धर्तीवर पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटट्यूट नक्की स्थापन करण्याचा विचार आणि निर्धार आपण करु.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते की, नाशिक सिव्हिल सर्जन यांच्याकडून वर्षभरापासून सोयी सुविधा आणि मनुष्यबळाबाबतचा अहवाल मागविला जात आहे. तथापि, त्यांच्याकडून अहवाल पाठविला जात नाही. गेल्या अडीच वर्षांपासून मी हा प्रश्न या सभागृहात उपस्थित करीत आहे. परंतु, शासकीय यंत्रणा या संदर्भात उदासिन आहे. मी आपल्याला विनंती करतो की, किमान सिव्हिल सर्जन यांनी प्रमाणपत्र किंवा माहिती का दिली नाही, याबाबतची विचारणा सरकारने त्यांच्याकडे करावी, अशा प्रकारचे निदेश आपण द्यावेत.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नाशिककरांना चांगला दिलासा देण्याचा निर्णय या ठिकाणी घेतला आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत आणि अभिनंदन करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मुद्दाम हा विषय टाळला होता. कारण, चौकशी केली तर अधिकारी तत्कालीन मंत्री महोदयानी अशा सूचना दिल्या होत्या, असे सांगतील.

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चौकशी करावी. पूर्वीच्या कोणाचीही नावे उघड झाली तरी आम्हाला काही हरकत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागील गोष्टी सोडून द्याव्यात. मी त्यांना असे सांगेन की, "छोडो कल की बाते, कल की बात पुरानी, आओ हम लिखेंगे मिलकर नई कहानी." मी तुमच्या बरोबर आहे. काळजी करु नका.

-------------

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापती स्थानी माननीय तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)**

**पृ. शी.** : कोकणातील 48 लघुसिंचन प्रकल्प रद्द करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय.

**मु. शी.** : कोकणातील 48 लघुसिंचन प्रकल्प रद्द करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय यासंबंधी श्रीमती हुस्नबानू खलिफे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अवये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"सन 2014-2015 या आर्थिक वर्षात शासनाने सिंधुदूर्ग जिल्ह्यात 13, रत्नागिरी जिल्ह्यात 22 व रायगड जिल्ह्यात 13 लघुसिंचन प्रकल्प मंजूर करुन अंदाजे 700 कोटी रुपयांच्या खर्चास दिलेली प्रशासकीय मंजूरी, सदरहू 48 लघुसिंचन प्रकल्पामुळे कोकणातील सिंचनाची मोठ्या प्रमाणात वाढ होऊन विहिरीच्या पाण्याचा स्तरही वाढणार असल्याने कोकणातील शेतकऱ्यांना दुबार पीके घेणे शक्य होणे, परंतु अलिकडेच सदरहू 48 लघुसिंचन प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय नव्या शासनाने घेतल्याने येथील जनतेवर व शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात झालेला अन्याय, यामुळे सदरहू कोकणातील रद्द केलेल्या 48 लघुसिंचन प्रकल्पाचा पुनर्विचार करुन मंजूर करण्यात आलेली 700 कोटीची रक्कम, सन 2015-2016 या अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील 13, रत्नागिरी जिल्ह्यातील 22 व रायगड जिल्हयातील 13 लघुसिंचन प्रकल्प मंजूर करुन 700 कोटी रुपयांच्या प्रकल्पांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली परंतु हे 48 लघुसिंचन प्रकल्प अचानक रद्द करण्यात आले आहेत. कोकणात जवळपास 150 इंचापेक्षा जास्त पाऊस पडतो व ते सर्व पाणी वाहून जाते. या लघुसिंचन प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचा मोठा फायदा होणार होता.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती हुस्नबानू खलिफे...

शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी लागणार होते. नद्यांच्या आजूबाजूची जमीन सिंचनाखाली येणार होती. कोकणात फक्त पावसाळ्यात पीक घेतले जाते, त्या ऐवजी दूबार पीक घेतले जाणार होते. अचानक हे लघुसिंचन प्रकल्प रद्द केल्यामुळे आज सिंचनाच्या बाबतीत शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. 48 लघुसिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. या लघुसिंचन प्रकल्पाची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्यामुळे निधी अभावी हे लघुसिंचन प्रकल्प रद्द करण्यात येऊ नयेत. मंत्री महोदयांना मी विनंती करते की, 48 लघुसिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...3..

श्रीमती पंकजा मुंडे (जलसंधारण मंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी कोकणातील 48 लघुसिंचन प्रकल्पाबाबत चर्चा उपस्थित केली आहे. याबाबत मी असे सांगू इच्छिते की, या विषयाबाबत विस्तृत विचार करण्याची गरज आहे. जलसंधारण महामंडळास जो निधी प्राप्त होतो त्या निधीच्या अनुषंगाने कामे करण्याची इच्छा महामंडळाची व शासनाची असते. परंतु या कामांना निधी अभावी ब्रेक लावावा लागतो. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होते. जलसंधारण महामंडळाने 1200 कामांसाठी सन 2014-2015 मध्ये 1050 कोटी रुपयांची मागणी केली होती. या कामासाठी फक्त 139 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. यामध्ये मागील वर्षाची देयके देखील होती. अशा परिस्थितीत सर्वच लघुसिंचन प्रकल्पाची कामे करणे कठीण होते. या विभागाची मी मंत्री झाल्यानंतर अधिकाऱ्यांची बैठक घेतली. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, कोकणातील 48 योजनांपैकी 19 योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले नाही. त्यामुळे या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली होती. 1200 योजनांसाठी 940 कोटी रुपये मिळावे असा विभागाकडून प्रस्ताव पाठविण्यात आला होता. 757 कोटी रुपये कामांच्या निविदांना 16 जून 2014 रोजी मंजूरी देण्यात आली होती. 12 ऑगस्ट 2014 च्या जलसंधारण महामंडळाच्या बैठकीत कोकणातील 48 योजनाबाबत चर्चा करण्यात आली, त्यावेळी 19 योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही. तसेच उर्वरित योजनांची तांत्रिक तपासणी सुरु करण्यात आली आहे. यासाठी अधीक्षक अभियंता यांची समिती नियुक्त करुन त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल. निविदा झाल्या असल्या तरी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही, बाकीच्या योजनांची तांत्रिक तपासणी सुरु आहे, या धर्तीवर योजनांच्या बाबतीत अशा प्रकारे निर्णय घेण्यात आला आहे. कोकणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्या यांनी सांगितलेली बाब अतिशय बरोबर आहे. कोकणात पाऊस भरपूर पडतो व तो वाहून जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना दूबार पेरणी करता येत नाही, पाण्याची उपलब्धता नसते. कोकणातील जमिनीचा थर व पाणी साठविण्याची प्रक्रिया इतर विभागांसारखी करण्याची परिस्थिती नाही. बंधारे बांधले तरी तेथे खडक असल्यामुळे पाणी खालून वाहून जाऊ शकते. पाणी साठविण्यासाठी त्या भागात साठवण तलावांना चांगला प्रतिसाद मिळू शकतो. अशा प्रकारची चर्चा शासनाकडून करण्यात आली आहे. या योजना पूर्णपणे बंद करण्याची शासनाची मानसिकता नाही. निधीच्या उपलब्धते प्रमाणे त्या पूर्ण करण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

येतील. नाही तर अनेक योजनांना मंजुरी देऊन त्यांच्या निविदा काढायच्या व प्रत्येक योजनांना थोडा थोडा निधी देऊन अनेक अपूर्ण योजना निर्माण करायचा शासनाचा उद्देश नाही. ज्या योजना हातात घेतल्या त्या कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करायच्या आहेत. जितका निधी मिळेल त्यानुसार इस्टिमेट करुन योजनांना परवानगी दिली जाणार आहे. ज्या योजना हाती घेण्यात येतील त्या पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे. उर्वरित योजनाबाबत समितीचा अहवाल आल्यानंतर शासन सकारात्मक निर्णय घेईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सांगितले की, अशा काही योजना आहेत की, त्यांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नव्हते त्यामुळे त्या रद्द करण्यात आल्या आहेत. या योजना कोणत्या आहेत, या योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसताना त्यांच्या निविदा काढण्यात आल्या असतील तर ज्या अधिकाऱ्यांनी या योजनांचा सर्व्हे केला त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल काय ? शासनाच्या धोरणानुसार ज्या योजना अर्धवट आहेत त्या अगोदर पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यामुळे कोकणातील किती योजनांची कामे 20, 40 व 60 टक्के पूर्ण झाली आहेत. त्याचप्रमाणे असे किती प्रकल्प आहेत की, ज्यांची कामे फक्त 25 किंवा 40 टक्केच शिल्लक आहेत. काही योजनांची कामे सुरुच झाली नाहीत, याची आकडेवारी मंत्री महोदया देतील काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, जलसंधारणाच्या विषयासंदर्भातील माहिती सन्माननीय सदस्यांना हवी असेल तर फक्त 48 योजनांपुरती ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. त्यापैकी 19 योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही. मी या खात्याची मंत्री झाल्यावर अधिकाऱ्यांची बैठक घेतली तेव्हा माझ्या लक्षात आले की, अनेक योजनांना मंजुरी देण्याचा धडाका मागील काळात झालेला आहे, निविदा काढल्या असून त्या योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही. अशा प्रकारे ज्या अनियमितता झाल्या आहेत, अशा योजना जून महिन्यात रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये ज्या अनियमितता झाली आहे, त्याची तपासणी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी राज्यभरातील माहिती विचारली असेल तर ती नंतर देण्यात येईल. कोकणातील 48

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रकल्पांची माहिती मी आता सांगितली आहे. यातील काही योजनांच्या निविदा झाल्या होत्या, कामे सुरु होण्याच्या अगोदर त्या बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ...5...

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-5

VVK/ AKN/ ST/ KTG/ AKN/ प्रथम श्री.रोझेकर.. 10:50

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता असे सांगितले की, 19 योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही. मला देखील ही बाब अत्यंत धक्कादायक वाटली आहे. अशी परिस्थिती असेल तर या योजनांना प्रशासकीय मान्यता कशी मिळाली व त्यांच्या निविदा कशा काय काढण्यात आल्या. येथपर्यंत कार्यवाही कशी काय झाली आहे. या 19 प्रकल्पांची मंत्री महोदयांनी चौकशी करावी. तेथील शेतकरी पाणी मिळेल या अपेक्षेने पाहतो आहे. हा विषय मी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात देखील उपस्थित केला होता. या शासनात कोकणातील सहा मंत्री आहेत, तरी देखील या कामाकडे कोणीही लक्ष देत नाही याचा मला खेद वाटतो. कोकणातील गरीब शेतकरी लघुसिंचन प्रकल्पांकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहे की, हे सर्व मंत्री आपली कामे करतील. मंत्री महोदयांना विनंती आहे की, 19 प्रकल्पांबाबत बारकाई चौकशी करण्यात येईल काय ? अशा प्रकारे कोकणातील शेतकऱ्यांची फसवणूक का केली जाते, याबाबत विचार करण्यात येईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, जेव्हा एखादी योजना जाहीर होते, तेव्हा तेथील लाखो लोकांच्या आशा पल्लवीत होतात. ती योजना राजकीय दृष्टीकोन ठेऊन जाहीर केली जात असेल तर तेथील लोकांच्या मानसिकतेशी आपण खेळत आहोत असे मला वाटते. या योजनांचा मी अभ्यास केला तेव्हा मी देखील चकित झाले.19 योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही. तरी देखील निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. त्या योजनांना ऑगस्ट महिन्यात स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...........

त्यामध्ये अशी जी अनियमितता झालेली आहे त्याची आम्ही सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याचा निर्णय घेऊ.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मेरी संस्था जो पर्यंत पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देत नाही तो पर्यंत त्या प्रकल्पाचे अंदाजपत्रकच तयार होत नाहीत. हा प्रस्ताव पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसताना थेट इस्टिमेशन पर्यंत जातो, त्याचे टेंडर निघतात आणि आज अचानक मंत्री महोदया सांगतात की, त्याला पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे. हे प्रकल्प मागील काळातील आहेत किंवा कसे हा विषय आता किती दिवस उपस्थित करावयाचा ? आता तुम्हाला मंत्री म्हणून उत्तर द्यावयाचे आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या संदर्भात मागचा पुढचा विषय नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. मंत्री महोदया सभागृहाला बरोबर माहिती देत आहेत. 29 जून रोजी या संदर्भातील स्टे मिळाला आणि पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसताना त्याचे प्लॅन झाले, अंदाजपत्रक झाले, मंजुरी मिळाली, टेंडर लेव्हल पर्यंत सर्व झाले. वास्तविक वॉटर अकाऊंटमध्ये उपलब्धता असल्याशिवाय पुढे जाता येत नाही, हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. यामध्ये जी अनियमितता झाली त्याची चौकशी करण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले आहे. तुम्ही जे सांगत आहात तेच मंत्री महोदया सांगत आहेत. उलट मी त्यांना सांगितले की, आज तुम्ही त्यांना निलंबित करावे आणि नंतर चौकशी करावी. जे दोषी असतील त्या सर्वांना निलंबित करावे आणि चौकशी करावी. केवळ राजकीय स्वार्थासाठी प्रकल्प मंजूर करुन ते रद्द करावयाचे, तर ते बरोबर होणार नाही.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मी मघाशीच स्पष्टपणे सांगितले की, निविदा प्रक्रियेमध्ये जी मंजुरी दिली गेली ती मंजुरी दिनांक 16 जून, 2014 रोजी दिली गेली आणि दिनांक 12 ऑगस्ट, 2014 रोजी जलसंधारण महामंडळाच्या बैठकीत या 48 योजनांच्या विविदा प्रक्रियेच्या संदर्भात चर्चा झाली. त्यामुळे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नसल्यामुळे या योजना रद्द

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...........

करण्यात आल्या. आपण याची तपासणी करु. कारण, यामध्ये जो काही कालावधी गेलेला आहे त्या कालावधीत त्यांनी या योजना रद्द केलेल्या आहेत. मी त्याची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेईन आणि यामध्ये अनियमितता आढळून आल्यास आम्ही नक्कीच कारवाई करु.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : राज्यातील शासनमान्य मराठी, गुजराती, सिंधी माध्यमाच्या अनुदानित शाळांमधील शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले असून ते समायोजनाच्या प्रतिक्षेत असणे

**मु. शी.** : राज्यातील शासनमान्य मराठी, गुजराती, सिंधी माध्यमाच्या अनुदानित शाळांमधील शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले असून ते समायोजनाच्या प्रतिक्षेत असणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील शासनमान्य मराठी, गुजराती, सिंधी माध्यमाच्या अनुदानित शाळांमधील शिक्षक विद्यार्थीसंख्येअभावी अतिरिक्त झाले असून गेली 3 ते 4 वर्षे ते समायोजनाच्या प्रतिक्षेत आहेत. अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असतांना अनेक जिल्हा शिक्षणाधिकारी विशेषतः ठाणे जिल्हा यांनी नवीन नियुक्तांना मान्यता देऊन गैरप्रकार केले आहेत. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची जबाबदारी शासनाची असून त्यांचे समायोजन होईपर्यंत वेतन देण्याची जबाबदारी शासनावर आहे. मात्र, शासनाकडून समायोजनही होत नाही व वेतन मिळण्यासाठी शिक्षकांना वेठीस धरले जात आहे. शिक्षक आत्महत्या करण्याचा विचार करतात हे गंभीर आहे. याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, माझी जी अर्धा तास चर्चा आहे ती अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाच्या संदर्भात आहे. केवळ अतिरिक्त शिक्षकच नाहीत तर प्राथमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी असा माझा विषय आहे. या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मला मंत्री महोदयांकडून तीन विषयांवर उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, पहिला विषय असा आहे की, राज्यात आरटी कायदा लागू झाल्यानंतर शासनाने अनुदानित प्राथमिक शाळांना एक लिपिक आणि एक शिपाई अशी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे आता पर्यंत मंजूर केली होती. त्यासाठी 500 विद्यार्थी संख्येची मर्यादा होती. आता 500 नव्हे तर 1000 विद्यार्थी संख्या आहे. शाळांमध्ये लिपिक, शिपाई हे शिक्षकेतर कर्मचारी काम करीत

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते...........

होते. परंतु, आरटीमध्ये या पदांच्या संदर्भात कोणतीही तरतूद नसल्याने ही सर्व पदे शासनाने रद्द केली आणि या सर्व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविले. अनेक ठिकाणी 15-20 वर्षे नोकरी केलेले हे शिक्षकेतर कर्मचारी आज अतिरिक्त ठरलेले आहेत. अनेक ठिकाणी त्यांचे पगार बंद झालेले आहेत आणि आता आपण जर एकाही शाळेला लिपिक, शिपाई देणार नाही तर मग या अतिरिक्त झालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आपण कोणत्या ठिकाणी समायोजन करणार आहात ? जो पर्यंत आपण त्यांचे समायोजन करीत नाही तो पर्यंत त्यांचे वेतन आपल्याला बंद करता येणार नाही. हा त्यांचा दोष नाही. हा शासनाच्या धोरणात्मक निर्णयाचा परिपाक आहे. त्यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु राहिले पाहिजे आणि त्यांच्या समायोजनाची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, खाजगी प्राथमिक शाळांमध्ये आरटीच्या आधारे संच मान्यता झाल्यामुळे अनेक शाळांमध्ये शिक्षक अतिरिक्त ठरले. अतिरिक्त शिक्षकांसाठी जर खाजगी प्राथमिक शाळांमधील शिक्षकांना खाजगी प्राथमिक शाळांमध्ये जागा उपलब्ध नसतील तर शासनाच्या दिनांक 4 डिसेंबर, 2012 च्या शासन निर्णयानुसार त्यांचे समायोजन अन्य ठिकाणी करण्याची तरतूद आहे. मग जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या शाळा आहेत. प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन करताना मराठी माध्यमाच्या शाळांमधील जवळपास 95 टक्के शिक्षकांचे समायोजन झालेले आहे. परंतु, गुजराती, सिंधी माध्यमाच्या शाळेतील जे शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत, त्यांचे समायोजन करण्यासाठी कोठे वावच नाही. कारण, त्या शाळा बंद पडलेल्या आहेत. ज्या शाळा सुरु होत्या त्या शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. मग त्या शिक्षकांचे समायोजन कोठे करण्यात येणार आहे ? शासनाने यावर असा पर्याय काढलेला आहे की, ज्यांची मातृभाषा गुजराती आहे, ज्यांची मातृभाषा सिंधी आहे आणि आता त्यांचे गुजराती किंवा सिंधी माध्यामाच्या शाळांमध्ये समायोजन करता येणे अशक्य आहे. ते हिंदीमध्ये अध्यापन करु शकतात, ते हिंदी विषय चांगल्या पद्धतीने बोलू शकतात आणि शिकवू शकतात. म्हणून या शिक्षकांचे हिंदी माध्यमाच्या शाळांमध्ये समायोजन करण्याची आवश्यकता आहे. शासनाने सर्व नगरपालिका, महानगरपालिकांना आदेश दिलेले आहेत. परंतु, शासनाने आदेश देऊन देखील

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते...........

अद्याप आयुक्त, नगर शिक्षण मंडळे या शिक्षकांना समायोजित करुन घेत नाहीत. म्हणून गुजराती आणि सिंधी माध्यमाच्या शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे तातडीने हिंदी माध्यमाच्या शाळांमध्ये समायोजन करण्याच्या संदर्भात आपण कोणती कार्यवाही करणार आहात आणि ते आपल्या आदेशाचे पालन करीत नसतील तर संबंधित प्रशासनाला किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला आपण जे 50 टक्के अनुदान देतो ते अनुदान तरी आपण बंद करणार आहात काय ?

सभापती महोदय, माझा तिसरा विषय असा आहे की, ज्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन नवी मुंबई महानगरपालिकेत झाले ते शिक्षक तेथे हजर होण्यासाठी गेले. परंतु त्यांना तीन महिने हजर करुन घेण्यात आले नाही आणि त्या तीन महिन्यांचे वेतन जिल्हापरिषदही देत नाही आणि संबंधित महानगरपालिका देखील देत नाही. असे 18 ते 20 शिक्षक आहेत. त्यांना नवी मुंबई महानगरपालिकेकडून किंवा ठाणे जिल्हापरिषदेकडून पगार मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी आदरणीय शिक्षण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, संच मान्यतेपूर्वी सुद्धा अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात जागा रिक्त असताना अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन न करता खुल्या बाजारातून शिक्षकांची भरती केली, लाखो रुपये घेण्यात आले आणि त्या शिक्षकांना संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे. एका बाजूला अतिरिक्त शिक्षक प्रतिक्षा यादीवर आहेत आणि दुसऱ्या बाजूला तुम्ही शिक्षकांच्या नवीन नियुक्तीसाठी मान्यता देत आहात, हा विरोधाभास आहे. ते अधिकारी आज मजेत आहेत. त्या अधिकाऱ्यांना काहीही त्रास नाही. जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक असताना देखील शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या नवीन नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. म्हणून असा गैरप्रकार करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. मी मागील तीन वर्षापासून या संदर्भात पाठपुरावा करीत आहे. परंतु, अद्याप एकाही शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. त्यामुळे तो प्रकार आजही सुरु आहे. म्हणून शासन त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहे ?

सभापती महोदय, मी जे विषय मांडलेले आहेत त्या संदर्भात मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांनी सातत्याने विशेषत: मुंबई, ठाणे, कोकण पट्ट्यातील शिक्षकांच्या हिताचे प्रश्न मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे मराठवड्यातील शिक्षकांच्या हिताचे प्रश्न मांडतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांनी तीन महत्वाचे प्रश्न मांडलेले आहेत. त्यातील पहिला मुद्दा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील आहे. एक तर उच्च न्यायालयाने संच मान्यतेला जैसे थे परिस्थिती ठेवावी असे आदेश दिल्यामुळे सर्व परिस्थिती आता तशीच आहे. आता या सर्व विषयांमध्ये आपण माध्यमिक शाळांसाठी चिपळूणकर समिती किंवा 2310 लेखाशीर्ष निर्माण केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांनी प्राथमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मुद्दा मांडलेला आहे. मी मागील बैठकीत त्यांना आश्वस्त केले होते आणि आताही सांगू इच्छितो की, अशा पद्धतीने कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन थांबविले जाणार नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

कोणीही बेकार किंवा बेरोजगार होण्याचा मुद्दा नाही. हे खरे आहे की, ऑफलाईन पगार केल्यामुळे अडचणी निर्माण होतात. दिनांक 14.10.2014 च्या पत्रकान्वये ऑफलाईन वेतन देण्याचा कालावधी 30 जूनपर्यंत वाढविला आहे. या संदर्भात नक्की दखल घेऊ. दुसरा मुद्दा शिक्षक अतिरिक्त झाल्याबद्दलचा मांडला आहे. अतिरिक्त शिक्षक महापालिकांच्या शाळांमध्ये पाठविल्यानंतर महापालिका, विशेषत: नगर शिक्षण मंडळ आम्ही बाहेरुन आलेले शिक्षक घेणार नाही असा ठराव करतात.

मी या मंडळांचे जोरदार समर्थन खालच्या सभागृहात केले होते. ते समर्थन लंगडे कुठे पडते? अशा काही महापालिकांमधील शिक्षण मंडळे आम्ही बाहेरुन आलेले शिक्षक घेणार नाही, आम्हाला आमचे शिक्षक भरायचे आहेत, आपले सगळे भरुन भरायचे आहेत, त्यामुळे अतिरिक्त झालेले शिक्षक आम्ही स्वीकारणार नाही, आमच्यावर पालकांचा दबाव आला असे म्हणतात. कोणते पालक त्यांच्याकडे गेले याचा पत्ता नाही. परंतु असे काही वातावरण निर्माण करायचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो विषय मांडला त्याबाबत दिनांक 28 नोव्हेंबर, 2014 च्या परिपत्रकाप्रमाणे ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी रिक्त पदावर शिक्षकांचे समायोजन करण्यास नकार देतील त्या रिक्त पदांचे वेतन अनुदान थांबविण्याची कार्यवाही आम्ही करणार आहोत. शासन महापालिकांना 50 टक्के अनुदान देते. महापालिका अतिरिक्त झालेले शिक्षक सामावून घेत नाही, पालकांचा दबाव आला, बिंदू नामावली आरक्षणाचे कारण पुढे केले जाते. महाराष्ट्रामध्ये नोकऱ्यांच्या बाबतीत अमुक टक्के आरक्षण मिळाले पाहिजे अशी तरतूद आहे. परंतु एकत्रितपणे करता येणार नाही म्हणून महाविद्यालय स्तरावर नामावली तयार केली आहे. ज्यावेळी शिक्षक अतिरिक्त ठरतात आणि दुसऱ्या शाळांमध्ये पाठविले जातात, त्यांच्या संदर्भात राज्याच्या एकूण स्ट्रक्चरमध्ये नामावली पाळली जाते. त्या शाळेची नामावली डिस्टर्ब होत नाही. परंतु या राज्याचा विचार करता ज्या जातीला जे आरक्षण दिलेले आहे ते मिळतेच आहे. ते आरक्षण डिस्टर्ब होत नाही. त्या संस्थेचे झाले तरी त्यामुळे बिंदू नामावलीचे कारण देऊन महापालिका समायोजन करण्याचे टाळतात. त्या महापालिकांना या पध्दतीने टाळता येणार नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, शेवटी जो मुद्दा मांडला आहे, त्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून महापालिकेकडे समायोजन केले तरी सहा-सहा महिने वेतन मिळाले नाही, महापालिका वेतन देत नाही किंवा जिल्हा परिषद वेतन देत नाही असे सांगण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकेचे आयुक्त यांची संयुक्त बैठक घेऊन हा विषय निकाली काढू. त्या शिक्षकांना वेतन देऊ. 3-3 वर्षे अतिरिक्त होऊन झाली असतील तर त्याची ठोस माहिती द्यावी, अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करु सभागृहाचे माननीय सदस्य जी माहिती देतात ती सत्य गृहित धरली जाते. लोकप्रतिनिधी जागरुक आहेत, चुकीच्या गोष्टी होऊ देत नाहीत हे दाखवून देण्याची ही संधी आहे.

-------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अर्धातास चर्चेसंबंधी**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी विधीमंडळ सचिवालयाला विनंती आहे की, ज्यावेळी विशेष बैठकीमध्ये एकाच वेळी मोठया प्रमाणात प्रलंबित असलेल्या अर्धातास चर्चा विचारात घेण्यात येतात, त्यावेळी एकाच खात्याशी संबंधित असलेल्या अर्धातास चर्चा सलगपणे घेण्यात याव्यात. जेणेकरुन त्या त्या विभागाच्या मंत्र्यांना ते कामकाज आटोपून खालच्या सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला उपस्थित राहणे सोयीचे होईल.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.गिरीष बापट : शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित अर्धातास चर्चा अगोदर घेण्यात याव्यात, त्यानंतर माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या विभागाशी संबंधित अर्धातास चर्चा घेण्यात याव्यात.

-----

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : भारत संचार निगम लिमिटेड, अलिबागच्या उप विभागीय कार्यालयाने ग्रामपंचायतीची (ता.अलिबाग, जि.रायगड) कराची रक्कम न भरल्याबाबत

**मु. शी.** : भारत संचार निगम लिमिटेड, अलिबागच्या उप विभागीय कार्यालयाने ग्रामपंचायतीची (ता.अलिबाग, जि.रायगड) कराची रक्कम न भरल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 668 ला दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "भारत संचार निगम लिमिटेड, अलिबागच्या उप विभागीय कार्यालयाने ग्रामपंचायतीची (ता.अलिबाग, जि.रायगड) कराची रक्कम न भरल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 668 ला दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, निमसरकारी संस्थांच्या ज्या मालमत्ता आहेत त्यावर नगरपालिका आणि ग्रामपंचायतीने कर आकारणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. असे असताना अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात 2000 सालापासूनचा थकित कर 28.52 लाख रुपये भरणा करण्याबाबत भारत संचार निगम लिमिटेडला कळविले आहे. मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात याच विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी असे उत्तर देण्यात आले होते की, नगरपालिकेमध्ये आम्ही हा प्रस्ताव पाठवू. चेंढरे ग्रामपंचायत आणि अलिबाग नगरपालिका अगदी शेजारी आहेत. परंतु ही मालमत्ता चेंढरे ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे. महामंडळाची मालमत्ता ही सरकारी मालमत्ता नाही. सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर कर भरावा लागतो. कायद्यात स्पष्ट म्हटले आहे की, सरकारच्या मालकीच्या जमिनी वा इमारत अगर नफ्याच्या कारणाकरिता उपयोगात आणल्या जात असो किंवा नसो त्या सरकारी मालमत्ता होत नाही. भारत संचार निगम लिमिटेड हा केंद्र सरकारचा अंगिकृत उपक्रम आहे. त्यांच्या मालमत्तेवर कायद्याने कर लावण्याचा ग्रामपंचायतीला हक्क आहे. ग्रामपंचायती आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या पाहिजेत.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

त्यांना मालमत्तेवरील कर हे उत्पन्नाचे साधन असते. चेंढरे ग्रामपंचायतीचे क्षेत्र अलिबाग नगरपालिकेपेक्षा मोठे आहे. अलिबाग नगरपालिकेची लोकसंख्या चेंढरे ग्रामपंचातीच्या लोकसंख्येपेक्षा 4000 ने कमी आहे. अलिबाग नगरपालिकेचा बोजा या ग्रामपंचायतीवर पडतो. अलिबाग शहर हे सरकार कर्मचाऱ्यांचे शहर गणले जाते. शहरामध्ये बहुतांश मालमत्ता शासनाच्या आहेत. त्या सर्व मालमत्ता नागरीकरणामुळे चेंढरे ग्रामपंचातीमध्ये आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीची तेवढी आर्थिक क्षमता नाही. या अर्धातास चर्चेच्या निमित्ताने चेंढरे ग्रामपंचायतीला घरपट्टी आकारण्याचे आदेश राज्य सरकारने तातडीने द्यावेत अशी मी विनंती करतो.

------

...6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या योग्य आहेत. चेंढरे ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढले पाहिजे या दृष्टीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील की, सदर ग्रामपंचायतीचे सरपंच, तालुक्याचे गटविकास अधिकारी आणि बीएसएनएलचे अधिकारी यांची एकत्रित बैठक बोलावण्यात यावी. या संदर्भातील अपील गटविकास अधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित आहे. त्या संदर्भात स्थायी समितीकडे विषय गेला तर वेळेचा अपव्यय होईल. म्हणून तातडीने बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : शासनाने आदेश द्यावेत. स्थायी समितीला दर कमी जास्त करण्याचा अधिकार आहे. स्थायी समितीपुढे कोणतेही अपील करण्याचा कर धारकांना अधिकार नाही.

नंतर आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खंबीरपणे निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने आदेश द्यावेत यासाठीच मी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, शासनातर्फे तातडीने बैठक घेण्याचे आदेश संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येतील. यात शासनाचा दुसरा विभाग देखील गुंतलेला आहे. बीएसएनएल हे डिपार्टमेंट देखील शासनाचेच आहे. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. आता आम्ही सगळी प्रोसेस सुरू केलेली आहे. त्यातून सकारात्मक निर्णय होईल अशी आशा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने बैठकीचे आयोजन करू नये. राज्य शासनाला आदेश देण्यामध्ये कोणती अडचण आहे ?

(उत्तर आले नाही.)

......

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : गोदापात्रातील (ता.पैठण,जि.औरंगाबाद) पाणी सोडताच आपेगाव आणि गेवराई तालुक्यातील(जि.बीड) कुरणपिंप्री, गावाला जोडणारा पूल खचल्याच्या घटनेबाबत.

**मु. शी**. : गोदापात्रातील (ता.पैठण,जि.औरंगाबाद) पाणी सोडताच आपेगाव आणि गेवराई तालुक्यातील(जि.बीड) कुरणपिंप्री, गावाला जोडणारा पूल खचल्याच्या घटनेबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1220 ला दिनांक 8 डिसेंबर 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गोदापात्रातील (ता.पैठण,जि.औरंगाबाद) पाणी सोडताच आपेगाव आणि गेवराई तालुक्यातील(जि.बीड) कुरणपिंप्री,गावाला जोडणारा पूल खचल्याच्या घटनेबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1220 ला दिनांक 8 डिसेंबर 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अवये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, बीड आणि औरंगाबाद जिल्ह्याला जोडणारा हा अतिशय महत्त्वाचा पूल आहे. कुरणपिंप्री ता.गेवराई, व आपेगाव ता.पैठण या गावांना जोडणारा गोदावरी नदीवरचा पूल दिनांक 8.11.2014 रोजी अचानक खचल्यामुळे या भागातील दळणवळणाची कामे ठप्प झालेली आहेत. सन 2002 मध्ये या पुलाचे काम पूर्ण झालेले आहे. या पुलाच्या कामावर कोट्यवधी रुपये खर्च झालेले आहेत. दीड दोन महिन्यांपूर्वी पाणी सोडल्यामुळे तो पूल मोठ्या प्रमाणावर खचला. त्यामुळे या भागातील दळणवळण ठप्प झालेले आहे. मी येथे स्पेसिफिक प्रश्न विचारून माझी अर्ध्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

तासाची चर्चा पूर्ण करणार आहे. सदर पूल खचल्यानंतर शासनाने चौकशीसाठी सी.पी.जोशी नियुक्त केली होती. या पुलाचे लाईफ 80 वर्षाचे असताना तो केवळ 8 वर्षातच खचल्यामुळे सी.पी.जोशी यांची समिती नियुक्ती करण्यात आली. या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, या समितीचे निष्कर्ष काय आहेत ? त्याच बरोबर या पुलाचे काम नव्याने सुरू करण्यासंबंधी शासन कोणती पावले उचलणार आहे ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मांडलेला आहे. गोदवरी नदीवर आपेगाव पूल आहे. हा 290 मीटर लांबीचा पूल असून त्यामध्ये 126 गाळे आहेत. यातील 42 गाळे हे क्षतिग्रस्त झाले आहेत. त्याची चौकशी करण्यासाठी सी.पी.जोशी समिती नियुक्त करण्यात आली होती. या भागातून अती प्रमाणात वाळू काढण्यात आल्यामुळे हा पूल खचला आहे. हा पूल राफ्टवर बनविण्यात आला होता. राफ्टच्या खालील रेती अवैधरित्या काढण्यात आली होती. त्यामुळे पूल ढासळला. या पुलाचे काम दिनांक 10.4.2013 रोजीच करण्यात आले होते. या पुलावर 195 कोटी रूपये खर्च झालेला आहे. औरंगाबाद व बीडला जोडणारा हा महत्त्वाचा पूल आहे. बजेटमध्ये आपण या पुलाचे काम प्रस्तावित केले आहे. त्यामुळे ताबडतोब पुलाचे काम सुरू करून तो लोकांसाठी खुला केला जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या पुलाच्या कामाचे टेंडर दिनांक 30 मे 2015 च्या अगोदर काढण्यात येणार आहे काय ? तसेच सी.पी.जोशी समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सी.पी.जोशी समितीचा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल. आता फक्त 30 मे 2015 पूर्वी टेंडर काढण्याचा प्रश्न राहिला आहे. अर्थसंकल्पामध्ये आपण या पुलाच्या कामासाठी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

-----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : नाशिक जिल्ह्यातील मौजे गोवर्धन,महादेवपूर,गंगापूर व पाथर्डी (ता.नाशिक) येथील मिळकतींबाबत

**मु. शी.** : नाशिक जिल्ह्यातील मौजे गोवर्धन,महादेवपूर,गंगापूर व पाथर्डी (ता.नाशिक) येथील मिळकतींबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न □मां□ 1155 ला दिनां□ 8 डिसेंबर 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय,नाशिक जिल्ह्यातील मौजे गोवर्धन,महादेवपूर,गंगापूर व पाथर्डी (ता.नाशिक) येथील मिळकतींबाबत या विषयावरील तारां□त प्रश्न □मां□ 1155 ला दिां□ 8 डिसेंबर 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अवये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, नाशिक शहरामध्ये श्री.जेम्स ॲन्थोनी नावाचा एक सन्माननीय गृहस्थ होता. तो आता या जगात नाही. तो वारला आहे. या श्री.जेम्स ॲन्थोनीकडे नाशिक जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील अनेक आय.ए.एस., आय.पी.एस.अधिकाऱ्यांनी करोडो रूपये दिले होते. या श्री.जेम्स ॲन्थोनीने हे पैसे नाशिक जिल्ह्यातील जमिनींमध्ये गुंतविले. सन्माननीय श्री.जेम्स ॲन्थोनी याने शेतकरी असल्यासंबंधीचा खोटा दाखला दिला होता. मी गेल्या दोन अधिवेशनापासून हा प्रश्न विचारीत आहे. त्याची चौकशी सुरूआहे, संबंधित दाखला खोटा आहे अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,श्री.जेम्स ॲन्थोनी यांची नाशिक जिल्ह्यातील कुर्डोली, गोवर्धन, महादेवपूर, गंगापूर, पाथर्डी येथील जमीन सरकार जमा करण्यात येणार आहे काय, तसेच, ज्या आय.ए.एस. व आय.पी.एस.अधिकाऱ्यांनी करोडो रूपये या जमिनीमध्ये गुंतविले आहेत, त्या अधिकाऱ्यांची चौकशी होणार आहे काय व अज्ञात इमले आहेत त्याची खातरजमा शासन करणार आहे काय ?

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शेत जमीन असल्याचा खोटा दाखला दिल्याचे निदर्शनास आलेले आहे. 40 आर जमिनीचा खोटा दाखला दिला होता. नंतर त्यांनी मी केरळ मधील शेतकरी असल्याचा दाखला दिला आहे. तो ही बनावट आहे की काय याची तपासणी सुरू आहे. त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यांनी शेकडो एकर जमीन घेतलेली आहे. आता फक्त एकाच दाखल्याची छाननी होणे बाकी आहे. ती छाननी आम्ही लवकरात लवकर करीत आहोत. या संदर्भात चौकशी झाली आहे. संबंधित तलाठी मयत झाला आहे. सर्कल सेवानिवृत्त झाला आहे. त्यांनी दिलेल्या दाखल्याची चौकशी आम्ही 15 दिवसाच्या आत करणार आहोत. खोटे दाखले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. पण आणखी खात्री झाल्यानंतर संपूर्ण शेत जमीन कूळ कायदा 1948 च्या कलम 84 अनुसार ही सरकार जमा करण्यात येईल.

..........

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या भूखंडावर झालेले अतिक्रमण

**मु. शी.** : नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या भूखंडावर झालेले अतिक्रमण या विषयावरील तारांकित प्रश्न □मां□ 3832 ला दिनांक 19 मार्च 2015रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.प्रकाश गजभिये,वि.प.स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय,नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या भूखंडावर झालेले अतिक्रमण या विषयावरील तारां□त प्रश्न □मां□ 3832 ला दिां□ 19 मार्च 2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने नागपूरच्या एका महत्त्वाच्या बाबीकडे प्रकाश टाकू इच्छितो. आम्हाला अभिमान वाटावा असे आशिया खंडातील सर्वात मोठे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे सुरू झालेले आहे. 61 वर्षापूर्वी या देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी या महाविद्यालयाची पायाभरणी केली होती.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

यांनी या महाविद्यालयाचा पायाभरणी समारंभ नागपूर येथे घेतला होता. 218 एकर जागेवर हे महाविद्यालय प्रस्तापित आहे. परंतु खेदाची बाब अशी आहे की, 27 मार्च, 1953 रोजी मेडीकल कॉलेजच्या जागेचे भूमिपूजन झाल्यानंतर या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण आतापर्यंत काढण्यात आलेले नाही. अतिक्रमण काढण्यासाठी गव्हर्मेंट मेडीकल कॉलेज प्रशासनाने आतापर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. आपल्या सरकारच्या माध्यमातून नागपूर येथे एम्स होत असल्यामुळे मी आपले अभिनंदन करतो. एम्ससाठी हे ठिकाण अतिशय उपयुक्त आहे. मला या निमित्ताने मंत्री महोदयांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या भुखंडवरील अतिक्रमण हटवले जाणार आहे काय, या ठिकाणी गेल्या 30-35 वर्षापासून ज्या लोकांनी अतिक्रमण केले आहे त्यांचे पुनर्वसन केले जाणार आहे काय ? या ठिकाणच्या 218 एकर जागेला सुरक्षा भिंतीची आवश्यकता आहे त्यामुळे 218 एकरावर सुरक्षा भींत बांधली जाणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये साहेबांनी नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. 62 वर्षापूर्वी भूमिपूजन झालेल्या जागेवर गेल्या 30-35 वर्षापासून मटन मार्केट,टीबी वॉर्ड, धोबीघाट,अनाधिकृत दुकाने आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संकुल अशा प्रकारे या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या जागेवर अशा प्रकारे अतिक्रमण होणे हे अतिशय दुर्दैवी बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी या अर्धातास चर्चेच्या निमित्ताने जे मुद्दे मांडले असल्यामुळे त्यासंदर्भात स्थानिक प्रशासनासोबत बैठक घेऊन अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन करुन ही जागा मोकळी करण्याचा नक्की प्रयत्न करण्यात येईल. तसेच या जागेवर पूर्ण संरक्षण भींत उभारण्याच्या संदर्भातील विचार आम्ही पॉझिटीव्हली करु. परंतु अतिक्रमण होत असतांना त्या ठिकाणचे प्रशासन काय करीत होते याचा शोध आम्हाला घ्यावा लागणार आहे. 30-35 वर्षापासून या ठिकाणी अतिक्रमण झालेले असल्यामुळे या अतिक्रमण धारकांचे दुसरीकडे पुनर्वसन केल्याशिवाय ते तेथून जाणार नाही त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा विचार स्थानिक महानगरपालिका

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे......

आणि जिल्हा परिषद यांच्या समोर घेऊन हा विषय सोडवू एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या वैद्यकीय महाविद्यालयाचा विकास होणे आवश्यक आहे. या महाविद्यालयात एकंदर 400 जागा रिक्त आहेत. या ठिकाणी वर्ग 1 ते वर्ग 4 पर्यंतच्या 200 पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. या ठिकाणी एम्स येत असल्यामुळे या ठिकाणी 400 पदांची जाहिरात केव्हापर्यंत काढली जाणार आहे आणि ही पदे 31 मे पूर्वी भरली जाणार आहे काय ? यासंदर्भात आपण जी कमिटी स्थापन करणार आहात त्या कमिटीमध्ये नागपूरच्या स्थानिक आमदारांना विश्वासात घेऊन या ठिकाणचा विकास करणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सर्वांना विश्वासात घेऊनच हे शासन काम करीत आहे. एमपीएससीच्या माध्यमातून या ठिकाणच्या जाहिराती देण्यात आलेल्या आहेत.मेडिकल कॉन्वील ऑफ इंडियाचा फास आपल्या भोवती आवळत चालला आहे.त्यामुळे एमपीएससीच्या माध्यमातून जाहीरात काढण्यात आली आहे. परंतु जाहिरातीच्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करुन ही पदे शासन वेळेत भरेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**उप सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** :राज्यातील विनाअनुदान तत्वावरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**मु. शी.** :राज्यातील विनाअनुदान तत्वावरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत या विषयावरील तारांकि□त प्रश्न□ □मां□ 3250 ला दि□ां□ 12 मार्च, 2015 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, राज्यातील विनाअनुदान तत्वावरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत या विषयावरील तारांकि□त प्रश्न□ □मां□ 3250 ला दि□ां□12 मार्च, 2015 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□ुमती□ □ि□म 92 अ□न्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, या राज्य सरकारने कायम विनाअनुदान धोरण सन 2001 मध्ये स्वीकारले होते. परंतु त्यापूर्वी या राज्यातील शिक्षण शास्त्र महाविद्यालयाला विनाअनुदान तत्वावर परवानगी दिली होती. त्यामुळे या महाविद्यालयांना अनुदान द्यावे यासाठी मी आमदार झाल्यापासून सातत्याने प्रयत्न करीत आहे. या विषयाच्या संदर्भात संघटनेने मोर्चे काढले,वेळोवेळी धरणे आंदोलने केले होते व यासंदर्भात आम्ही या सभागृहात प्रश्नही उपस्थित केले होते. आघाडी सरकार असताना हा प्रस्ताव मंत्री मंडळाच्या पुढे विचारार्थ पाठविण्यात आला होता. परंतु त्या बाबतीती पुढे काय झाले हे आम्हाला माहिती नाही. आता आपले सरकार आलेले आहे. त्यामुळे जे मागे झाले नाही ते आम्ही करुन दाखवले हे सांगण्यास आपल्याला चांगले वाटेल. त्यामुळे सन 2001 पूर्वी कायम विनाअनुदान धोरणापूर्वी जी महाविद्यालये या राज्यात उघडली गेली त्या महाविद्यालयाला अनुदान देण्याच्या बाबतीत आपण मंत्री मंडळाच्या पुढे जाऊन निर्णय घेणार आहात काय ? आपल्या राज्यात बी.एड. कॉलेजेसची गरज नाही असे आपण मागच्या एका प्रश्नामध्ये नमूद केले होते. यासंदर्भात लोक एनसीटीमध्ये अर्ज् करतात, एनसीटी त्यांना परवानगी देते. यामध्ये आता आपल्या हातामध्ये काही राहिलेले नाही. लोक कोर्टात गेल्यामुळे कोर्ट तुम्हाला परवानगी देण्यास सांगते व त्यानुसार आपल्याला परवानगी द्यावी लागते. बी.एड.कॉलेजची या राज्यात गरज नाही असे आपण सांगितलेले असताना परवानगी न देण्याच्या बाबतीत आपण कोणता धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे ?

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केलेला आहे. शिक्षण विभागाच्या संदर्भात मी मागच्या वेळेला सांगितले होते की, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ज्यावेळेस हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला त्यावेळेस वित्त विभागाने, सदर प्रस्ताव 24/11/ रोजी मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विसंगत आहे असे सांगितल्यामुळे हा प्रस्ताव नामंजूर झाला होता. हा प्रस्ताव पुन्हा दिल्या असल्या कारणाने हा प्रस्ताव वित्त विभागाने मान्य केला नाही. मंत्री मंडळाने महाविद्यालयांचा निर्णय कायम विनाअनुदानित तत्वावर एकदा निर्णय घेतल्यानंतर आता पुन्हा यासंदर्भात निर्णय देण्याचा प्रश्नच येत नाही.

सभापती महोदय, बी.एड.च्या बाबतीत सर्व्हे घेण्यात आलेला असून त्यासंदर्भातील आकडेवारी मी वाचून दाखवतो. सन 2007-2008 च्या आकडेवारी प्रमाणे सन 2011-2012 मध्ये वाढीव शिक्षणाची एकूण गरज 26931 होती. बी.एड.ची क्षमता 46734 होती व यामध्ये 19803 एवढा फरक होता. हा जो सर्व्हे आहे तो अगोदरचा आहे. आता जो सर्व्हे घेण्यात आला होता तो देखील एक्सेस आहे. त्यामुळे आम्ही सांगितले आहे की, जर शिक्षक एक्सेस होणार असतील तर त्याला मान्यता देऊन उपयोग काय ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, कायम अनुदान धोरण 24/11/2001 रोजी घेण्यात आलेले आहे. परंतु 2001 पूर्वीचे एकंदर 89 महाविद्यालये आहेत त्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात मंत्री महोदय सहानुभूतीपूर्वक विचार करुन हा प्रस्ताव मंत्री मंडळापुढे नेणार आहात काय, वित्त विभागाने प्रस्ताव नाकारला असला तरी मंत्री मंडळ निर्णय घेण्यामध्ये सक्षम असते. त्यामुळे या 89 महाविद्यालयांना कायम अनुदान देण्याच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहेत काय ?

श्री. रविंद्र वायकर : या विषयाच्या संदर्भात शासन नक्की सहानुभूतीपूर्वक विचार करेल.

**उप सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : राज्यातील शिधावाटप पत्रिकामध्ये निर्माण होणारी गोंधळाची परिस्थिती

**मु. शी.** : राज्यातील शिधावाटप पत्रिकामध्ये निर्माण होणारी गोंधळाची परिस्थिती यासंबंधी श्री.जयंत पाटील,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

***"राज्यातील शिधावाटप पत्रिकांमध्ये निर्माण होणारी गोंधळाची परिस्थिती, शिधावाटप पत्रिकेसाठी आधार कार्डाचा वापर अनिवार्य ठरविणे, या नवीन धोरणामुळे प्रत्यक्ष ज्या लाभार्थीला शिधापत्रिकेची गरज आहे त्याला आधार कार्ड न मिळाल्याने त्याची होणारी कुचंबणा, तसेच राज्यातील अनेक भागात लोकसंख्येपेक्षा जास्त शिधापत्रिका वाटप झाल्याचे निदर्शनास येऊन देखील यासंबंधी निर्णय न घेणे, सबब शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."***

सभापती महोदय, राज्यातील शिधापत्रिकेच्या संदर्भात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. दारिद्रय रेषेखाली व्यक्तींचा सर्व्हे 1987 साली झाला होता. शिधापत्रिकेच्या संदर्भात शासनाकडे कोणत्याही प्रकारचा नवीन सर्व्हे नाही. शिधावाटप पत्रिका देतांना विधवा महिलांना, अपंग व्यक्तींना वेगळी कॅटेगरी आहे. त्यामुळे शिधापत्रिकेच्या संदर्भातील सर्व्हे 6-6 महिन्यात होणे गरजेचे आहे. स्त्री कधीही विधवा होऊ शकते किंवा व्यक्ती अपंक केव्हाही होऊ शकतो. त्यामुळे 6-6 महिन्यात शिधापत्रिकेचा सर्व्हे होण्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शिधापत्रिकेच्या संदर्भात सहा किंवा बारा महिन्यांनी सर्व्हे झाला पाहिजे.

सभापती महोदय, केसरी रंगाच्य कार्डावरील धान्य 31/12/14 पासून बंद झाले आहे. यासंदर्भात अर्थसंकल्पात 200 कोटी रुपयांची तरतूद करुन सर्वांना धान्य पुरवण्याची व्यवस्था केली जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते त्यामुळे यासंदर्भात नेमकी काय परिस्थिती आहे याची माहिती मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. रायगड जिल्हयाची लोकसंख्या 25 लाख असून शिधापत्रिका 30 हजार आहे अशी माहिती शासनाने लिखित स्वरुपात दिलेली आहे.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

तेव्हा आपण आधार कार्ड अनिवार्य केले पाहिजे. ज्याच्याकडे आधार कार्ड असेल त्यालाच शिधावाटपपत्रिका असे सूत्र करुन त्याची शंभर टक्के अंमलबजावणी केली पाहिजे. आधार कार्ड असल्याशिवाय शिधापत्रिका मिळणार असा निर्णय सरकारने घेतला तर ज्यांनी आधार कार्ड काढलेले नाही ते आधार कार्ड काढतील असे मला वाटते.

सभापती महोदय, शिधावाटपपत्रिकेद्वारे मतदार यादीमध्ये नाव नोंदविले जात असल्यामुळे एकाच व्यक्तीचे नाव मुंबईतील मतदार यादीमध्ये नाव असते, पुण्यातील मतदार यादीमध्ये असते, रायगडच्या मतदार यादीमध्ये असते. आपण मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी शिधावाटप पत्रिके ऐवजी आधार कार्ड अनिवार्य केले पाहिजे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. नागपूरच्या अधिवेशनात देखील मी हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. माझ्या मतदार संघामध्ये समुद्रालगतच्या जमिनीमध्ये समुद्राचे खारे पाणी शिरुन तेथे मॅनग्रोव्हज आले आहेत. त्या जमिनीचा सर्व्हे करताना त्या जमिनीचे उत्पन्न धरले गेले. त्या ठिकाणी जमीनच नाही तर उत्पन्न कोठून मिळणार ? हशीवडे, रेवस, शिर्की या भागांचा पुन्हा सर्व्हे करुन ज्या ठिकाणी शेतीचे नुकसान झालेले आहे त्यांना स्वस्त दरात रेशन धान्य मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येईल काय ?

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात पाच-सहा प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या भागामध्ये खार जमिनीचा प्रश्न निर्माण झालेला आहे आणि त्याबाबत सर्व्हे करण्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपल्याकडे उत्पन्नावर आधारित एपीएल आणि बीपील रेशनकार्ड मिळते. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे एक "विशेष बाब" म्हणून पुढील दोन महिन्यात विशेष पथक पाठवून त्या भागाचा सर्व्हे करण्यात येईल.शेती न पिकल्यामुळे ज्यांचे उत्पन्न कमी झालेले आहे आणि ज्यांचे रेशनकार्ड एपीएल असेल त्यांना बीपीएल कार्ड देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आधार कार्ड अनिवार्य करण्याबाबत सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, आधार कार्ड ग्राह्य धरता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. केंद्र सरकारने एक चांगली योजना आणली होती. राज्यामध्ये 2 कोटी 37 लाख रेशनकार्डस्धारक आहेत. आपण त्यावर इंपोज करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्या संदर्भात संगणकीकरण चालू आहे. हे संगणकीकरण करीत असताना ग्रामीण भागामध्ये तहसीलदार आणि शहरी भागामध्ये रेशन दुकानदार यांना नवीन फॉर्म वाटण्यात आले आहेत. त्यांना या कामासाठी एका फॉर्मसाठी पाच रुपये देणार आहोत. म्हणजे एका दुकानदाराने दिवसाला 100 फॉर्म्स भरुन घेतले तर त्याला दिवसाला 500 रुपये मिळणार आहेत. आधार कार्ड नोंदणीकरिता केंद्र सरकारचे 100 रुपये प्रोत्साहनपर मिळतातच शिवाय अधिक पाच रुपये मिळणार आहे. आता 2 कोटी 37 लाख रेशनकार्डसधारकांची नावे संगणकामध्ये फीड करणार आहोत. हे काम झाल्यानंतर संगणकातील डी-डयुप्लेकशन सिस्टीममध्ये जाऊन ज्यांची नावे, गाव, वय सारखी असतील ती नावे आपोआप डिलीट होणार आहेत. पुढील तीन आठवड्यात फॉर्म वाटण्याचे आणि गोळा करण्याचे काम चालू होईल.

सभापती महोदय, आपण बायो-मेट्रीक सिस्टीमचा देखील वापर करणार आहोत. त्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यासाठी साधारणतः तीन-चार महिने लागतील. या कामासाठी बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. म्हणजे दुकानदाराकडे डयुप्लीकेट कार्डस येतात आणि दुकानदार ती कार्डस स्वतःकडे ठेवून त्या कार्डसद्वारे रेशन उचलून त्याचे ब्लॅक मार्केटींग करतात, अशा गोष्टीस आळा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

बसणार आहे. आपण दोन लोकांचे थम इम्प्रेशन घेणार असल्यामुळे दोन लोकांना रेशन दुकानात जाऊन धान्य आणता येईल. तिसऱ्या व्यक्तीला धान्य आणता येणार नाही. यामुळे जवळपास 30 टक्के अन्नाची बचत होईल असे अभ्यासातून पुढे आले आहे. तेव्हा ही योजना शासन तातडीने राबविणार आहे. महसूल विभागाकडून जास्त कर्मचारी घेऊन या विभागामध्ये रिक्त पदे भरणार आहोत. कामाचे संगणकीकरण, गोडावून्स बांधणे, द्वारपोच योजना अशा विविध योजनांद्वारे अन्न धान्य वितरण व्यवस्था सक्षम करणार आहोत तसेच गरीब लोकांना धान्य मिळण्यासाठी याचा उपयोग होईल असे वचन आपणास देतो.

**उप सभापती** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.45 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**पुणे महानगरपालिकेने वाहतूक नियोजन, नवे उड्डाणपूल तसेच पाणी पुरवठा इत्यादी नवे प्रकल्प प्रस्तावित केल्याबाबत**

**(१) * २८५५ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने वाहतूक नियोजन, नवे उड्डाणपूल तसेच पाणी पुरवठा आदि कामांकरिता माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नवे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे नवे प्रकल्प कोणकोणते आहेत,
(३) असल्यास, याकरिता किती निधीची तरतूद केली आहे,
(४) सदरचे प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाहतूक नियोजन, नवे उड्डाणपूल याकरिता तरतूद प्रस्तावित केली असून, असे प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या मंजूरीच्या प्रक्रियेत आहे.

तथापि, पाणी पुरवठा विभागाकरिता कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.

(२) व (३) वाहतूक नियोजन व नवीन उड्डाणपूलांचे प्रस्तावित प्रकल्प व त्यासाठी केलेली आर्थिक तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

१) वाहनतळ सुधारणा - रुपये २.२० कोटी
२) नवीन सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करणे - रुपये २.०० कोटी
३) चौक सुधारणा - रूपये ४.५० कोटी
४) वाहतूक पोलिस विभागामार्फत सुचविणेत आलेली कामे - ३.०० कोटी
५) पुणे मेट्रो प्रकल्प - २५.०० कोटी
६) मुंढवा स.नं.८९ व ७१ दरम्यानचे पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४ मी. एचसीएमटीआर (High Capacity Mass Transit Route) साठी रेल्वे ओलांडणी पूल बांधणे - रुपये ४.५० कोटी
७) घोरपडी येथे रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधणे - रुपये ४५ लाख
८) पौड रस्त्यावर चांदणी चौक येथे उड्डाणपूल बांधणे - रुपये ४५ लाख
९) हॅरिस पुलाजवळ नवीन पूल बांधणे - (पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा संयुक्तपणे) - रुपये ९० लाख

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2855....

श्री.देवेंद्र फडणवीस....

१०) नगर रोड येथे हरिभाऊ देसाई चौकात भुयारी मार्ग बांधणे- रुपये ९० लाख

११) कात्रज बायपास चौकात उड्डाणपूल व भुयारी मार्ग बांधणे- रुपये ४५ लाख

१२) पु.ल.देशपांडे उद्यानासमोर पादचारी पूल, भुयारी मार्ग बांधणे-रुपये ७५ लाख

१३) मुठा नदीवर डेंगळे पूलानजिक नवीन पूल बांधणे - रुपये २.२५ कोटी

उपरोक्त नमूद केलेली तरतूद ही प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात एका वर्षाकरिता लागणा-या रकमेनुसार प्रस्तावित आहे. सदर सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी ही पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेच्या मान्यतेनंतरच हाती घेणेत येणार आहे.

(४) प्रस्तावित प्रकल्पांना मुख्य सभेने मान्यता दिल्यानंतर सदर कामांच्या प्रकल्पीय तरतूदी पूर्वगणनपत्रकाद्वारे निश्चित करुन, निविदा मागविताना या प्रकल्पांचा कालावधी निश्चित करणेत येणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने ज्या कामांचा लेखी उत्तरामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे ती कामे पूर्णपणे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील आहेत. लेखी उत्तरातील क्रमांक-7 मध्ये "घोरपडी येथे रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधणे" या कामाबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. वास्तविक पाहता हे काम गेल्या 20 वर्षांपासून प्रलंबित आहे. पूर्वी त्या ठिकाणी पाणी पुरवठ्यासाठी कालव्यातून जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव होता. सभापती महोदय, आपण मंत्री असताना या विषयी सभागृहात चर्चा झाली होती. या कामासाठी 523 कोटी रुपयांची गरज आहे. मी स्पेसिफिक विचारते की, या कामाच्या बाबतीत सरकारने काय उपाययोजना केली आहे ? तसेच या प्रकरणी शासन हस्तक्षेप करु शकते काय किंवा या पाणी पुरवठा योजनेसाठी निधीची काय तरतूद केली जाणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा मूळ प्रश्न महापालिकेच्या नियोजनाच्या बाबतचा आहे. या विकास कामांच्या बाबतीत सविस्तर माहिती लेखी उत्तरात नमूद केलेली आहे. पाण्याच्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, पुणे महापालिकेने या संदर्भात वेगवेगळे प्रस्ताव तयार केले आहेत. पाणी पुरवठ्याचे प्रस्ताव ज्यावेळी राज्य सरकारकडे मान्यतेसाठी येतात त्यावेळी राज्य सरकार त्या प्रस्तावांना तातडीने मान्यता देते. पण हे काम शेवटी पुणे महापालिकेनेच करावयाचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2855....

श्री.देवेंद्र फडणवीस....

महोदय, सन्माननीय सदस्यांनी घोरपडी येथील उड्डाणपुलाचा उल्लेख केला आहे. या निमित्ताने सांगतो की, हा पूल संरक्षण विभागाच्या हद्दीतून जातो. या विषयी कॅन्टोनमेंट बोर्डाशी अंतिम चर्चा सुरु आहे. तसेच माननीय केंद्रीय संरक्षण मंत्री श्री.मनोहर पर्रीकर यांच्यासोबत सुध्दा या विषयी चर्चा केलेली आहे. त्यांनी या विषयी सकारात्मक दृष्टिकोन घेतलेला आहे. त्यामुळे या संदर्भातील निर्णय लवकरच होईल. तसेच पाणी पुरवठ्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या विषयी महापालिकेला सूचना देण्यात येतील की, त्यांनी हे काम तातडीने हाती घ्यावे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, प्रश्नोत्तराच्या तासाच्या सुरुवातीलाच राखून ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक-3292 चर्चेला घ्यावयास हवा होता. परंतु त्यापूर्वीच प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्नावर चर्चा सुरु झाली. त्यामुळे आता बुधवार, दिनांक 25 मार्च, 2015 रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ व इतर वि.प.स. यांचा "पुणे शहराच्या प्रस्तावित रिंग रोडचे काम अतिशय धिम्या गतीने सुरु असल्याबाबत" या विषयावरील प्रश्नावर चर्चा घेण्यात येईल.

**पुणे शहराच्या प्रस्तावित रिंग रोडचे काम अतिशय धिम्या गतीने सुरू असल्याबाबत**

(६) ***३२९२ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या प्रस्तावित रिंग रोडचे काम अतिशय धिम्या गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील उच्च क्षमता द्रुतगती प्रकल्पांतर्गत वर्तुळाकर मार्गाच्या (एच.सी.एम.टी.आर.) आखणीची सुमारे ३२ किलोमीटर मार्गाची प्रक्रिया पूर्ण झाली असून या रस्त्यासाठी लागणाऱ्या सुमारे ७६ हेक्टर जागेपैकी केवळ ३० टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत, या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिंगरोडचे काम जलद गतीने सुरू करण्यासाठी भूमी संपादन करून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहराच्या उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू असून, पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर टप्याटप्याने रस्ता विकसित करण्याचे काम सुरू आहे.

(२) उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) या प्रकल्पासाठीच्या सुमारे ३३.८० किलोमीटर मार्गाची आखणीची प्रक्रिया पूर्ण झालेली असून, या रस्त्यासाठी लागणा-या सुमारे ६८.०३ हेक्टर जागेपैकी २१ टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याने, सदर भागातील रस्त्याचे अलाईनमेंट बदलण्यासाठीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या नियोजन समितीकडे दाखल केलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3292....

श्री.देवेंद्र फडणवीस....

(३) उच्च क्षमता द्रुतगती मार्गासाठीच्या एकूण ६८.०३ हेक्टर क्षेत्रापैकी १४.०७ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून, त्यावर रस्ता विकसित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२८.४७ हेक्टर जागा शासनाच्या विविध विभागाशी संबंधीत असून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागांकडे पाठविण्यात आलेले आहेत. सदर क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

तसेच २५.४९ हेक्टर जागा खाजगी असून त्यापैकी १५.८१ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केले असून त्यांच्या कार्यालयामार्फत सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरू आहे. सदर खाजगी क्षेत्रापैकी ९.६८ हेक्टर क्षेत्राचे टप्याटप्याने भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, पुणे शहराच्या प्रस्तावित रिंग रोडचे काम अतिशय धिम्या गतीने सुरु आहे. या प्रकल्पासाठी केवळ 21 टक्के जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. उर्वरित 28 टक्के जागा शासनाच्या वेगवेगळ्या विभागाच्या अखत्यारीत आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अन्य विभागाकडे असलेली जागा किती दिवसांत संपादित केली जाणार आहे ? हा प्रकल्प झाल्यास किमान 8 ते 10 लाख वाहनांच्या वाहतुकीला फायदा होणार आहे. परंतु दरम्यानच्या काळात अशी चर्चा सुरु आहे की, हा प्रकल्प रद्द करण्यात येणार आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, खरोखरच हा प्रकल्प रद्द केला जाणार आहे काय, नसल्यास, या प्रकल्पासाठी आवश्यक ती जमीन किती दिवसांत संपादित केली जाणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, मी सुरुवातीलाच सांगतो की, हा प्रकल्प रद्द करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनापुढे नाही. हा प्रकल्प निश्चितपणे पूर्ण केला जाईल. या निमित्ताने सांगू इच्छितो की, या प्रकल्पासाठी 28.47 हेक्टर सरकारी जमीन आणि 25 हेक्टर खाजगी जमीन संपादित करुन, त्या ठिकाणी एलिव्हेटेड रोड करावयाचा आहे. खाजगी मिळकतीमध्ये 15.81 हेक्टर क्षेत्राचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. उर्वरित 9.68 हेक्टर जमिनीसंदर्भात प्रस्ताव पाठविण्याबाबतची कार्यवाही पुणे महापालकेतर्फे सुरु झाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3292....

श्री.देवेंद्र फडणवीस....

यामध्ये अडचण एवढीच होती की, नवीन भूसंपादन कायदा आल्यानंतर वाढीव मोबदला मिळेल म्हणून लोकांची जागा देण्याची तयारी नव्हती. या कामाच्या भूसंपादनासाठी 1500 कोटी रुपये लागतील, अशी स्थिती होती. मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने टीडीआर बाबत नवीन धोरण तयार केले आहे. सदरहू धोरणावर हरकती व सूचना मागविल्या आहेत. पुणे महापालिकेचे मत आहे की, सदरहू धोरणामुळे आता या प्रकल्पासाठी आवश्यक ती जागा तातडीने अधिगृहीत करता येईल. तसेच खाजगी जमिनीचे अधिग्रहण तातडीने पूर्ण करण्यात येईल. तशाप्रकारचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. सरकारी जागेमध्ये साधारणपणे काही ऑब्जेक्शन्स आहेत. सरकारी जमिनीबाबत कारागृह आणि संरक्षण विभागाचे ऑब्जेक्शन आहे. मागच्या काळात निर्णय झाला की, याचे अलाईनमेंट बदलावयाचे आहे. त्यामुळे नवीन अलाईनमेंट गृहीत धरुन पुण्याच्या डी.पी. मध्ये ते सुचविलेले आहे. सभापती महोदय, पुण्याच्या डी.पी. च्या बाबतीत समिती गठीत करण्यात आलेली आहे. सहा महिन्यात डी.पी. शी संबंधित असलेली समिती अहवाल सादर करणार आहे. तद्नंतर तो डी.पी. अंतिम होईल. परंतु मी सूचना दिल्या आहेत की, इतके दिवस थांबण्याची गरज नाही. समिती टप्प्याटप्प्याने नियमानुसार काम करु शकते. पुणे शहराला या रस्त्याची आश्यकता आहे हे लक्षात घेऊन, समितीने दोन महिन्याच्या आत स्पष्टपणे या संदर्भातील अहवाल पाठवावा, असे सांगितले आहे. जेणेकरुन नवीन अलाईनमेंटच्या पोर्शनला तरी तातडीने मान्यता देता येईल आणि त्या जमिनीचे अधिग्रहण करता येईल. दोन महिन्यात डी.पी. च्या समितीकडून अहवाल मागविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील दोन महिन्यात या विषयी कार्यवाही करुन निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुण्यात दोन रिंग रोड आहेत. त्यापैकी एक रिंग रोड आयुक्तांच्या आणि दुसरा रिंग रोड जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येतो. हे खरे आहे की, रिंग रोडचे जे अलाईनमेंट आहे त्या ठिकाणी काही इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे सदरहू अलाईनमेंट बदलण्यात येईल, असे माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्टेटमेंट आम्ही वाचले होते. मी विचारु इच्छिते की, सदरहू अलाईनमेंट बदलण्यात येणार आहे हे

..7..



ता.प्र.क्र.3292....

श्रीमती दिप्ती चवधरी....

खरे आहे काय ? तसेच महापालिकेकडून करण्यात येणारे भूसंपादन निधीअभावी रखडले आहे हेही खरे आहे काय ? तसेच आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीत असलेल्या दोन्ही रिंग रोडच्या भूसंपादनाचे काम जलद गतीने करण्यासाठी शासन जिल्हाधिकारी आणि आयुक्तांना योग्य ते आदेश देणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या संदर्भातील अलाईनमेंट चेंज केली आहे व ती नवीन डी.पी. मध्ये समाविष्ट होणार आहे. पुण्याच्या डी.पी. सोबत ती अलाईनमेंट मंजूर होईल. तसेच हे काम जलद गतीने करण्यासाठी संबंधितांना आदेश देण्यात येतील. तसेच भूसंपादनाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, नवीन टीडीआर धोरण केल्यामुळे महापालिकेला सदरहू जमीन तातडीने अधिगृहीत करता येईल.

--------

...8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात सायबर गुन्ह्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ**

(२) * **३७९४ श्री.विजय गिरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह इतररमोठ्या शहरामध्ये सायबर गुन्ह्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे विविध पाहणीत आढळल्याने सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच दाखल गुन्ह्यांवर तातडीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्याननिदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात विशेषतः मुंबईत हजारो लोक ऑनलाईन व्यवहार पंसत करीत असल्याने याचा फायदा काही भामट्यांनी उचलला असून जस्ट डायल ही कंपनी प्लंबरपासून ते गुप्तहेरांचे क्रमांक नोंदवून सेवा प्रदान करीत असते. झुबेर खान नावाच्या सराईत चोराने जस्ट डायलमध्ये चार वेगवेगळया नावांनी आपण मेकॅनिक असल्याची नोंद करून अनेक जणांना फसविल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणाची चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करुन त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी शिवडी पोलीस ठाणे येथे दि. १०.७.२०१४ रोजी आरोपी नामे झुबेर खान याचे विरुध्द गुन्हा नोंद क्र. ८२/२०१४, कलम ४०६, ४२० भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपीस दि.९.१.२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी सद्यस्थितीत जामिनावर असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) राज्यात पोलीस कार्यालयात सायबर गुन्हे रोखण्याकरिता सायबर सेल कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. सर्व पोलीस ठाण्यामध्ये नागरिकांच्या बैठका आयोजित करुन त्यांना सायबर गुन्ह्यांची माहिती समजावून सांगून त्यांच्यामध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागृकता निर्माण करण्यात आलेली आहे. क्रेडीट कार्ड व डेबीट कार्ड वापरतांना होणाऱ्या धोक्यांबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. इंटरनेट व फेसबुकचा वापर

..9..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3794....

श्री.देवेंद्र फडणवीस....

करीत असलेल्या मुलांवर लक्ष ठेवण्याबाबत सुचित करण्यात येते. राज्यातील सर्व सायबर कॅफेंना त्यांच्याकडे आलेल्या ग्राहकांचे ओळखपत्र, नाव, पत्ता अशा बाबींची माहिती संकलित करण्याबाबत बंधनकारक केले असून त्यांचे उल्लंघन करण्यावर वेळोवेळी योग्य ती कारवाई केली जाते. सायबर क्षेत्रातील विविध मान्यवर व तज्ञ यांना आमंत्रित करुन जनतेमध्ये सायबर विषयी जनजागृती करण्यात आली आहे. वृत्तपत्र, शाळा कॉलेजमध्ये तसेच हौसिंग सोसायटयांमध्ये सेमिनार आयोजित करुन लोकांमध्ये यासंबंधी जनजागृती करण्यात येत आहे.

दि. १३.०२.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण बघता त्यांवर आळा घालण्यासाठी सायबर क्राईम विंग तयार करणे, तसेच त्याकरिता निवडलेल्या १००० अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, पोलीसांच्या प्रशिक्षणात सायबर प्रशिक्षण असे एक महिन्याचे विशेष प्रशिक्षण सुरु करणे, तसेच सायबर क्राईमच्या अनुषंगाने आवश्यक त्या विशेष तांत्रिक प्रशिक्षणाकरिता तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे, माहिती तंत्रज्ञान केंद्र स्थापन करणे, माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ७८ मध्ये दुरुस्ती करणे, सदरहू गुन्ह्यांचा निकाल त्वरीत लागावा ह्याकरिता जलद न्यायालय स्थापन करणे, जनजागृतीचे कार्यक्रम राबविणे, CERT (Computer Emergency Response Team) च्या स्थापनेसाठी केंद्र शासनास केलेल्या विनंतीचा पाठपुरावा करणे, तसेच ह्या सर्व बाबींसाठी आवश्यक त्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे या बाबींवर चर्चा करण्यात आली असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरच्या बैठकीच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबईत सायबर गुन्ह्याच्या प्रमाणात पाच पट वाढ झाली आहे. सर्रासपणे विदेशातून मोबाईलवर +2, +5 या कोडवरुन अनेक फोन येतात. समोरच्या व्यक्तीकडून सांगितले जाते की, अमुक खात्यावर अमुक रक्कम जमा केल्यास तुम्हाला अमुक इतकी रक्कम मिळेल. या माध्यमातून अनेकांची फसवणूक केली जाते. या विषयी पोलीस स्टेशनमध्ये पहिल्यांदा तक्रार केल्यानंतर त्याची दखल घेण्यासाठी विभाग नव्हता. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, सायबर गुन्ह्यांची संख्या पाहता प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदवून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-10

SJB/ ST/ AKN/ AKN/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:00

ता.प्र.क्र.3794....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, 2013-14 या वर्षात सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. 2013 मध्ये 937 आणि 2014 मध्ये 2696 सायबर गुन्हे रजिस्टर झाले आहेत. इंटरनेट युजर्सची आणि त्यावर काम करणाऱ्या कंपन्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे हे गुन्हे मोठ्या प्रमाणात घडत आहेत. मी निदर्शनास आणून देतो की, मुंबईत सायबर गुन्हे नोंद करुन घेतले जातात. याशिवाय सायबर सेल सुध्दा काम करीत आहे. परंतु या यंत्रणांना अजून सक्षम करणे आवश्यक आहे. म्हणून राज्य सरकारने निर्णय घेतला आहे की, 1000 अधिकारी/कर्मचाऱ्यांना सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी त्यांची कायमस्वरुपी टीम तयार करणार आहोत.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3794....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

राज्यात पूर्वी सायबर गुन्हे पोलीस स्टेशनला नोंदवून घ्यायचे नाहीत. आता सर्व ठिकाणी ते गुन्हे नोंदवून घेण्यास सुरूवात केली आहे. आपण सक्षमीकरण देखील सुरूकेले आहे. आव्हान मोठे आणि नवीन आहे, ते रोज वाढत आहे. आपण सायबर गुन्ह्यांना रिस्पॉन्स देण्यासाठी कार्यवाही सुरूकेली आहे. मी काल देखील चर्चेच्या उत्तरात सांगितले आहे की, राज्यात सर्ट शाखा उघडण्याचा निर्णय केला आहे. आपण तशी विनंती केली आहे. त्यामुळे हे गुन्हे आपण आटोक्यात आणू शकू.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सायबर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावाच्या उत्तराच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले. परंतु त्यावेळी वेळेअभावी सायबर गुन्ह्यांचा मुद्दा मांडणे राहिले. सायबर गुन्ह्याच्या संदर्भात आयटी ॲक्ट होता. केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये कलम 66 अ होते. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने हे कलम रद्द केले आहे. सदर गुन्ह्यांमुळे विध्वंस माजेल, व्यक्तिगत स्वरूपात हानी पोहचेल असे वाटले. सभापती महोदय, अशा घटनांमध्ये लगेच अटक करता येत होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे आणि सरकारही त्या बाजूने आहे हे गृहीत आहे. कलम 66 अ रद्द झाल्यामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये होणाऱ्या शिक्षांच्या प्रमाणात अडचणी तयार झाल्या आहेत. कारण बाकीची सर्व कलमे दखलपात्र आहेत. सायबर गुन्ह्यांमध्ये कशा पध्दतीने पीडितांना संरक्षण देता येईल यासाठी शासन नवीन एखादा कायदा करण्याच्या संदर्भात अभ्यास करून निर्णय घेईल का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, केंद्र सरकार या संदर्भात नवीन निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. सदर बाबतीतील कायदा झाल्यानंतर याचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, अजून एकाही गुन्ह्याचे कन्व्हिक्शन झालेले नाही. त्यामुळे या कायद्यात ज्या काही मूलभूत अडचणी आहेत त्या दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कार्यवाही सुरूकेली आहे. केंद्र सरकारच्या हे लक्षात आले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारणा केल्यानंतर यामध्ये बदल होईल. कॉम्पिटंट ऑथोरिटी पीआयला केले आहे. 10 वर्षांत सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. अडचण अशी आहे की, पीआय तेवढे प्रशिक्षित नाही. मात्र पीएसआय अधिक प्रक्षिशित आहेत.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3794....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

कारण पीएसआय त्या जनरेशनचे असून ते असे गुन्हे हॅण्डल करणारे आहेत. त्यामुळे असे बदल त्यामध्ये करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या स्तरावर सर्व बदल करण्याची मोहिम सुरूआहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सायबर गुन्हे नव्याने उदयाला आलेले आणि वेगाने पसरणारे आहेत. सायबर गुन्हे सर्वदूर पसरलेले आहेत. सदर बाबतीत शासनाने कशा पध्दतीच्या उपाययोजना केल्या आहेत या संदर्भात आपण सविस्तर उत्तर दिले आहे. कायद्यात कोणते बदल हवे आहेत हेही आपण सांगितले आहे. सायबर गुन्हा हा फक्त तेवढ्यापुरता मर्यादित न राहता इतर सर्व गुन्ह्यांशी जोडला जातो. इतर गुन्हे करण्यासाठी सायबर गुन्ह्याचा जास्त उपयोग होतो. सर्व गुन्ह्यांमध्ये हा कम्पोनन्ट असल्याचे पुढील काळात आपल्या लक्षात येणार आहे. त्यामुळे केवळ 1 हजार अधिकारी/कर्मचारी एवढ्यापुरता हा प्रश्न राहणार नाही. संपूर्ण पोलीस दलाला सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात वारंवार ओरिएन्टेशन करणे, प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. आपला मुद्दा बरोबर आहे. पीएसआय यांची जनरेशन चांगली आहे. पीआय झाल्यानंतर शिकण्याची क्षमता कमी असते. आपण या संदर्भात तज्ज्ञांचे सहाय घेणार आहात का, यासाठी तज्ज्ञांचे जिल्हावार पॅनेल निर्माण करणार आहात का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि याची चिंता सरकारला आहे, विशेषतः माननीय मुख्यमंत्र्यांना जास्त आहे. सायबर गुन्ह्यांचे डिटेक्शन व्हावे यासाठी 1 हजार प्रशिक्षित व्यक्तींची नियुक्ती करण्याचा मानस व्यक्त केला आहे. आपण म्हणता ते ठीक आहे. परंतु त्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत सायबर गुन्हे वाढत जातील. आपण मधल्या काळात वेगळ्या संस्थांकडून, खाजगी एजन्सींकडून सायबर गुन्ह्यांचे डिटेक्शन करण्यासाठी मदत घेणार का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपल्याला नवीन कर्मचारी नियुक्त करायचे नाहीत. आपण आपल्याकडे असलेल्या फोर्समधील लोक आयडेंटिफाय करीत आहोत, त्यांना प्रशिक्षण देत आहोत. हे तातडीने करणे शक्य आहे. आपण सांगितले तेही शासनाच्या विचाराधीन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3794....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

आहे. दरम्यानच्या काळात आवश्यकता असेल तर काही एजन्सींची, काही आऊटसोर्सड् एजन्सींची मदत देखील घेण्यात येईल. आपण सेल सुरू केला आहे, लॅब सुरू केली आहे, ते इफेक्टिव्हली काम करीत आहेत. आपण तेच अधिक चांगल्या पध्तीने कसे करता येईल या संदर्भातील काम सुरु केले आहे. किमान जिल्ह्याच्या ठिकाणी तशा लॅब कशा करता येतील हा आपल्या समोर विचार आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, जुबेर खान सारख्या एका चोरट्याने जस्ट डायल संकेतस्थळावर 4 वेगवेगळी खाती ओपन करून लोकांची फसवणूक केली आहे आणि तत्संदर्भात गुन्हाही रजिस्टर झाला आहे. संकेत स्थळावर सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीची देखील तेवढीच जबाबदारी आहे. राज्यात असे अनेक लोक आहेत जे या कंपनीची फसवणूक करतील आणि तशा लोकांकडूनही लोकांची फसवणूक होईल. त्यामुळे संकेतस्थळाची या संदर्भात जबाबदारी आहे. शासन त्या संदर्भात काही कारवाई करणार आहे का, कंपनीच्या विरूध्द कारवाई करणार आहे का, कंपनीला काही सूचना देणार आहे का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय योग्य मुद्दा मांडला आहे. आपण या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. संबंधित कंपन्यांवर जबाबदारी टाकण्यात येईल. कंपनीकडे प्रत्येक व्यक्ती रजिस्टर होतो, तेव्हा त्याचे व्हेरिफिकेशन केले पाहिजे असे बंधन कपंनीवर टाकण्यात येईल. आपण ठरवून दिलेल्या मानकांप्रमाणे व्हेरिफिकेशन केले नाही तर कंपनीवर देखील कारवाई करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी सायबर सेलला व्हिजीट केली आहे. आपण किती प्रशिक्षित स्टाफ भरणार आहात ? अजूनपर्यंत 1 हजार अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षित झालेले नाहीत. सदर ठिकाणी असणाऱ्या एसीपी मोरे यांची 6 वर्षे पूर्ण झाली असतील. तेथील यंत्रणा फार कमी प्रमाणात आहे. मुख्य सर्व्हरमधून माहिती घ्यायची असेल तर ती सिंगापूरहून घ्यावी लागते, त्याला कालावधी लागतो. गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. सभापती महोदय, ते हेलिकॉप्टरमधून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3794....

श्री. किरण पावसकर ....

फिरत आहेत आणि आपण बैलगाडीतून फिरत आहोत अशी स्थिती निर्माण झाली आहे. मी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात बोलत नाही. मला आपणास एवढेच विचारावयाचे आहे की, सायबर सेल सक्षमीकरणासाठी लागणारी यंत्रसामुग्री देण्यासाठी अर्थसंकल्पात किती रकमेची तरतूद केली आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सदर बाबतीतील प्रस्ताव मान्य केले आहेत. नॅस्कॉमशी या संदर्भात संधान साधले आहे. नॅस्कॉमने सायबर लॅब पूर्ण इक्विप करण्याच्या संदर्भात ज्या आवश्यक गोष्टी सांगितल्या आहेत त्यांच्यासाठी तरतूद केली आहे. शासन सर्व यंत्रसामुग्री घेत आहेत. आपण एक हजार स्ट्रेन्थ तयार करीत आहोत. आपण विशिष्ट नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता नॅसकॉम व डीएससीआय या दोन संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण सुरू केले आहे. राज्यात 4416 अधिकारी व 5972 कर्मचारी यांना सायबर गुन्ह्यांचा तपास करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्याचे काम सुरूकेले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, पोलीस दलातील भरतीच्या वेळी फिजिकल फिटनेस टेस्टचे महत्व मोठे असते. आपण सांगितले आहे की, एक हजार व्यक्तींना या संदर्भात तयार करण्यात येईल. तो मुद्दा बरोबर आहे. परंतु या सर्व प्रोसिजरला किती वेळ लागणार आहे ? सभापती महोदय, हवालदारापासून आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना या संदर्भात बंधन असले पाहिजे. ग्रामीण भागातील हवालदार असो किंवा पोलीस अधिकारी असो सर्वांना सायबर गुन्ह्यांचे महत्त्व समजले पाहिजे. आपेण त्या अनुषंगाने अभ्यासक्रमात बंधन घालणार का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे. किमान काही जण तरी भरती होताना सर्व निकषांवर त्यांना काही प्राधान्य देता येईल का ते तपासून पाहण्यात येईल आणि तशी कार्यवाही करण्यात येईल.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अंधेरी (मुंबई) येथील कूपर आ ण कामगार हॉस्पिटलमधून टिबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मळत नसल्याबाबत

**(३)** * ३८१२ **श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गज भये, श्री. करण पावसकर, श्री.जगन्नाथ शंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती वद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. वक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमर संह पं डत** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु बईतील अंधेरी येथील कूपर आ ण कामगार रुग्णालयामधून टीबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर दोन्ही रुग्णालयांमधून पूर्णक्षमतेने उपचार मळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप,कोणतीही कार्यवाही केली नसल्यास वलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस : (१)** बृहन्मुंबई महानगरपाल केच्या कूपर रुग्णालयासंदर्भात हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपा लकेच्या अखत्यारीतील कूपर रुग्णालयातून टी.बी. (क्षयरोग) च्या रुग्णांना पूर्ण क्षमतेने उपचार मळण्याची व्यवस्था उपलब्ध आहे. अंधेरी येथील कामगार रुग्णालय राज्य शासनाच्या अखत्यारीत नसून ते केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारीत असून त्यावर राज्य कारभार वमा महामंडळ, नवी दिल्ली यांचे नियंत्रण आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य वभागाने आयुक्त, राज्य का**मगार** वमा योजना यांना दिल्या आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, उत्तराच्या क्रमांक 1 मध्ये म्हटले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कूपर रूग्णालयासंदर्भात हे खरे नाही. सभापती महोदय, मुंबई

शहरात वातावरण बदलत आहे. टिबीचे रूग्ण मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पारंपारिक ड्रग्जंना रेजिस्टन्स करणारे टिबीचे प्रकार तयार झाले आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3812........

श्री.प्रकाश बिनसाळे.......

आपण असे सांगितले आहे की, कुपर रुग्णालयामध्ये पूर्ण क्षमतेने उपचार करण्यात येत आहेत. माझा प्रश्न हा आहे की, किती क्षयरोग रुग्णांवर उपचार करण्याची क्षमता कुपर रुग्णालयामध्ये आहे ? कुपर रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण सेवेसाठी क्षयरोगाचे एकूण किती रुग्ण येतात, त्यांची संख्या किती आहे आणि उपलब्ध सोया-सुविधा तेवढ्या रुग्णांसाठी पुरेशा आहेत का, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या डॉक्टरांची आणि अन्य कर्मचारी वर्गाची संख्या योग्य प्रमाणात आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, कुपर रुग्णालयामध्ये सन 2014 मध्ये संशयित रुग्णांच्या झालेलया तपासणीत 3456 क्षयरोगग्रस्त रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी सीईटी-1 व सीईटी-2 च्या रुग्णांची एकूण संख्या 474 एवढी होती. यामधील एमडीआरचे 13 आणि एक्सडीआरचा एक रुग्ण आढळून आला. मुंबईचा विचार केला तर मुंबईमध्ये 3107 संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी एमडीआरचे 3020 रुग्ण आणि एक्सडीआरचे 256 रुग्ण आढळून आले.

सभापती महोदय, Revised National Tubercuolosis Control Programme (RNTCP) च्या माध्यमातून निश्चित केलेल्या मानकानुसार कुपर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. त्या सोबतच मुंबई महानगरपालिकेने 6 Gene Expert Technology केंद्र सुरु केली असून आणखी 2 केंद्रे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. ही लेटेस्ट टेक्नॉलॉजी आहे. आता ती मुंबईमध्ये 6 ठिकाणी सुरु झाल्यामुळे त्याचा फायदा होत आहे. दोन नवीन ठिकाणी या टेक्नॉलॉजीची केंद्रे आपण सुरु करीत आहोत. कुपर रुग्णालय हे के-वेस्ट वॉर्डमध्ये येते. साधारणपणे हायपर सेन्सिटिव्हीटी क्षयरुग्णांमध्ये के-वेस्ट वॉर्ड नाही. तरी तेथे ही व्यवस्था करण्यात आली होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3812........

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात क्षयरोगाचे प्रमाण फार वाढत चालले आहे. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, एच.आय.व्ही.च्या रुग्णांवरील उपचारासाठी जगभरातून मोठ्या प्रमाणावर निधी गोळा झाला. त्यासाठी आर्थिक मदत मिळाली पाहिजे. त्याला आमचा विरोध नाही. परंतु, आज क्षयरोगाचे प्रमाण बघितल्यानंतर त्यासाठी देखील मोठ्या प्रमाणावर निधी दिला गेला पाहिजे. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत प्रत्येक रुग्णालयांना आवश्यक डॉक्टर्स, दोन-तीन नर्सेस, टेस्ट लॅब यासाठी आवश्यक निधी देणे गरजेचे आहे. जेणेकरुन क्षयरोगग्रस्तांना मोफत औषधोपचार मिळू शकेल. यासाठी शासन निधीची तरतूद करणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, राज्य सरकारने 'आरोग्यवर्धिनी', हा नवीन कार्यक्रम सुरु केला असून या विभागाचे माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत यांनी या संदर्भातील सर्व माहिती या सभागृहाला दिलेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील सर्व रुग्णालयांना आपण औषधांचा पुरवठा करीत आहोत. त्याचप्रमाणे यासाठी लागणारी सर्व यंत्रसामुग्री आपल्याकडे उपलब्ध आहे, त्याची काहीही कमतरता नाही. फक्त एवढेच आहे की, संशयित क्षयरोगाचा रुग्ण त्या ठिकाणापर्यंत आला पाहिजे.

सभापती महोदय, क्षयरोगग्रस्तांना सस्टेंड अशा प्रकारची औषधे घ्यावी लागतात. असे लक्षात आले आहे की, शासन मोफत औषध देत असले तरी अनेक रुग्ण अर्ध्यावरच औषधे घेणे सोडून देतात. त्यामुळे या संदर्भातील जनजाग्रुती निर्माण करण्याची आवश्यकता आहे आणि ते काम आपण आरोग्यवर्धिनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून करीत आहोत. औषधांसाठी किंवा यंत्रसामुग्रीसाठी निधीची कमतरता नाही. आपल्याला हे काम मिशन मोडवर करावे लागणार आहे आणि ते काम आपण आरोग्यवर्धिनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून करीत आहोत.

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या ३४ गावांचा महापालिकेत समावेश करण्याबाबत**

(४) * **३२८५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या ३४ गावांचा महानगरपालिकेत लवकरच समावेश केला जाणार असुन त्यांचा पायाभूत विकास करण्यासाठी किमान एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे परंतु याकरिता तीन हजार कोटी रुपये आवश्यक असल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांचा मुलभूत विकास करण्यासाठी राज्य शासनाने काही ठोस पावले उचलली आहेत काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदरचा तपशिल उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिका हद्दीलगतची ३४ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करणेबाबत शासनाने दिनांक २९.५.२०१३ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्यानुसार प्राप्त हरकती व सूचनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्यासमोर झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने प्राप्त अहवाल तपासण्यात येत आहे. तसेच सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले असून, त्या विभागाचे अभिप्राय विचारात घेवून ३४ गावांच्या समावेशनाबाबत निर्णय घेण्यात येईल.

अधिसूचनेप्रमाणे गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत हद्दीत करावयाचा झाल्यास या भागातील पायाभूत सोयी सुविधाकरीता पुणे महानगरपालिकेने १००% अनुदानाची आवश्यकता कळविली आहे.

समावेशनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, पुणे शहराच्या भोवताली असलेल्या 34 गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यापूर्वीच 23 गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यांचा ताण ही महानगरपालिका सहन करीत आहे. नवीन प्रस्तावित 34 गावातील इमारत आराखड्याला नगररचना विभागाने अगोदरच परवानगी दिलेली असल्यामुळे आता महानगरपालिकेला टॅक्सच्या माध्यमातून पैसे उभारता येणार नाहीत. राज्य शासन एल.बी.टी.रद्द करणार असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणारा हा पैसाही आता मिळणार नाही. या संदर्भातील एस्टिमेटेड कॉस्ट साधारणपणे 3 ते 4 हजार कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही 34 गावे महानगरपालिकेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3285.......

श्री.अनंत गाडगीळ......

समाविष्ट करणार आहात का ? तसे शासनाच्या विचाराधीन नसेल तर तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, या 34 गावांसाठी शासनाने वेगळी महानगरपालिका तयार करावी. तशा प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हे खरे आहे की, 34 गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्राप्त झाला आहे. हा प्रस्ताव प्रथम ग्राम विकास विभागाकडे जातो. नियमानुसार ग्राम विकास विभागाला यावर सुनावणी घ्यावी लागते आणि त्या विभागाची मते नोंदवून तो प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठवावा लागतो. हा प्रस्ताव सध्या या स्टेजला आहे. या प्रस्तावावर ग्राम विकास विभाग निर्णय करीत आहे. त्यांचा निर्णय झाल्यानंतर तो नगरविकास विभागाकडे येईल. त्यावेळी या सर्व गोष्टींचा विचार करुन नगरविकास विभाग आपला निर्णय घेईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले तेही खरे आहे. मुळामध्ये या 34 गावांचा एरिया एक्झिस्टिंग पुणे शहरापेक्षा मोठा आहे आणि तो सर्क्युलर पध्दतीने आहे. या गावांची वेगळी नगरपालिका किंवा महानगरपालिका तयार करावयाची म्हटली तर पुणे शहरामधून कोठुनही बाहेर पडावयाचे म्हटले तर या नगरपालिकेमधूनच जावे लागेल, अशी भौगोलिक रचना आहे. त्यामुळे अशा प्रकारची महानगरपालिका किंवा नगरपालिका तयार करावी किंवा नाही, याचा विचार आपल्याला करावा लागेल. या 34 गावांची वेगळी नगरपालिका केली जाऊ शकते. करता येणार नाही, असे नाही. तो धोरणात्मक निर्णय आहे. तत्पूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर आपण मेरिटनुसार निर्णय करु.

सभापती महोदय, या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामे होत आहेत आणि ती नियमित करण्याच्या दृष्टीने आपल्याला निर्णय करावा लागेल. या संदर्भात दोन्ही सभागृहातील पुण्याच्या

सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन सध्याची महानगरपालिकेची बांधकाम नियमावली त्या ठिकाणी लागू करावी किंवा कसे करायचे, याचा निर्णय घेण्यात येईल.

...5....



ता.प्र.क्र.3285.......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये नागरीकरण मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे. ही वाढ होत असताना अनेक नगरपालिकांचे रुपांतर महानगरपालिकांमध्ये, ग्रामपंचायतींचे रुपांतर नगरपालिकांमध्ये करावे लागत आहे.

सभापती महोदय, सरकारने असा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे की, नगरपालिका क्षेत्राच्या आजुबाजूच्या 10 ते 15 किलो मीटर क्षेत्रात टाऊन प्लॅनिंगची बंधने लागू होतील.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय चायना येथे जाऊन आले आहेत. मी देखील वर्षातून 3 ते 4 वेळा चायना येथ जात असतो. तेथील बंदरांमध्ये असलेली टेक्नॉलॉजी मी माझ्या व्यवसायासाठी वापरीत असतो म्हणून मी 3 ते 4 वेळा चायना येथे जातो आणि तेथील लोकही अलिबागमध्ये येत असतात, हे मी मुद्दाम येथे स्पष्ट करीत आहे.

सभापती महोदय, चायनामध्ये शहराच्या आजूबाजूला 50 किलो मीटर क्षेत्रात इमारत बांधकामांवर अनेक बंधने घातली गेली आहेत. तशा प्रकारच्या नियंत्रणांची आज आपल्या राज्याला आवश्यकता आहे. या संदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्राच्या आजूबाजूच्या 5 ते 10 किलो मीटर क्षेत्रात किंवा शासन ठरवेल अशा क्षेत्रात विकास आराखड्याची बंधने नगर विकास विभागाच्या माध्यमातून आणली गेली पाहिजेत. ग्राम पंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका या सर्व ठिकाणी असे बंधन असले पाहिजे. अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक चांगली सूचना या ठिकाणी केली आहे.

सभापती महोदय, आज आपण रिजनल प्लॅन तयार करीत आहोत आणि त्या माध्यमातून त्या भागातील रेग्युलेशन करीत असतो. महाराष्ट्रामध्ये आपण सर्व रिजनल प्लॅन तयार करु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, सर्व रिजनल प्लॅन तयार केले तर हा प्रश्न निर्माण होणार नाही.

...6.....

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-6

SRR/ ST/ AKN/ प्रथम श्री.मंगेश...... 12:20

ता.प्र.क्र.3285.......

सभापती महोदय, पेरिअर्बन किंवा ज्या ठिकाणी अर्बनायझेशन होणार आहे, तो सर्व भाग रिजनल प्लॅनमध्ये कव्हर होतो. त्याची विकास नियंत्रण नियमावली आपल्याला तयार करता येते. आता आपण पी.एम.आर.डी.अे.स्थापन केली आहे. त्या माध्यमातून आपल्याला हेच करावयाचे आहे. नागपूरला आपण मेट्रोचा रिजनल प्लॅन तयार केला आणि समितीने तो सजेशन, ऑब्जेक्शनला दिला आहे. मागील काळात आपण फ्रिंज एरियाचा निर्णय घेतला. पण नंतर पुढे काहीच केले नाही. असे करुन चालणार नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3285...

श्री.देवेंद्र फडणवीस...

याबाबत नियोजनाची प्रक्रिया लॉजिकली करावी लागणार आहे. जे रिजनल प्लॅन आहेत ते पूर्ण करायचे आहेत. आरपी पूर्ण करताना बांधकामाची स्टॅटेजी तयार करावी लागणार आहे. सर्व आरपी प्राधान्याने पूर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे. यामध्ये मोठी गॅप असल्यामुळे दरम्यानच्या काळात मी असे सांगितले होते की, यातील काही भाग आऊटसोर्स करुन तातडीने आरपी तयार केला पाहिजे. आज महानगरपालिका व नगरपरिषदा किंवा इतर शहरांच्या बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीकरण होऊन त्यातून बेकायदेशीर बांधकामे होत आहेत. याबाबत आळा घालणे ग्रामपंचायतीला शक्य नाही. हे सर्व रिजनल प्लॅन तातडीने तयार करण्याची कार्यवाही शासन करीत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेत 34 गावांचा समावेश करण्याच्या धोरणात्मक निर्णयाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. गेल्या 10 ते 15 वर्षापूर्वी काही गावे महानगरपालिकेत समाविष्ट केली होती. परंतु तेथील गावकऱ्यांनी विरोध केल्यामुळे याबाबत सरंगी समिती नियुक्त करण्यात आली होती, त्या समितीने दिलेल्या अहवालानुसार शासानाने गावे वगळण्याचा निर्णय घेतला होता. आता या 34 गावांमध्ये वगळण्यात आलेल्या गावांचा समावेश करण्यात येणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, गावे समाविष्ट केल्यामुळे तेथील पायाभूत सोई सुविधा निर्माण करण्यासाठी 100 टक्के निधी मिळावा अशी मागणी पुणे महानगरपालिकने केली आहे. ती रक्कम किती आहे, मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, राज्यातील सर्व रिजनल प्लॅन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. रायगड जिल्ह्यात देखील रिजनल प्लॅन गेल्या 20 ते 25 वर्षापासून आहे. तरी देखील शहरा लगतच्या बांधकामांवर बंधने घातली गेली नाहीत. रिजनल डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये झोनिंग केले जाते. प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या झोनिंगमध्ये बांधकाम करण्यासाठी नियमावली तयार करावयाची असते ती करण्यात आली नाही. त्यामुळे जी अनधिकृत बांधकामे होतात, त्यांचा प्रश्न सुटतो अशातला भाग नाही. रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन करताना नियमावली तयार करुन बंधने घातली गेली पाहिजे. नगरपालिकांच्या बाजूला आज ग्रामपंचायती आहेत, त्यांच्यावर जरुर बंधने घातली गेली आहेत. तरी देखील टाऊन

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3285...

श्री.सुनील तटकरे...

प्लॅनिंग विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. नगरपालिकांतील कामे पूर्ण होत नसल्यामुळे त्यांच्याकडून बाहेरची कामे कशी होतील. यासंदर्भात सरकारकडून विहित कालावधीत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेत 34 गावांचा समोवश करण्याची प्रक्रिया सुरु आहे, मागील काळात जी 15 गावे वगळ्यात आली होती, त्यांचा समावेश या गावांमध्ये आहे. महानगरपालिकेने ठराव करुन तसा प्रस्ताव पाठविला आहे. त्यासंदर्भातील निर्णय मेरिटवर घेण्यात येईल. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ज्या वेळी गावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न होतो, त्यावेळी त्या गावांचा विरोध असतोच, कारण त्यांच्या स्वायत्तेचा प्रश्न निर्माण होतो. तेथील ग्रामपंचायत संपुष्टात येते, जिल्हा परिषद व पंचायत समिती संपुष्टात येते. शहरीकरणाचा विचार करुन कॉन्शियस निर्णय करावा लागतो. याबाबत महानगरपालिकेने केलेल्या मागणीचा विचार करुन तसा निर्णय केला जाईल.

सभापती महोदय, या गावांच्या विकासासाठी 100 टक्के निधी मिळावा अशी मागणी महानगरपालिकेने केली आहे. माझ्याकडे आता नक्की आकडा नाही. परंतु अंदाजे 3000 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. 200 कोटी रुपये प्राप्त होतात. सदर प्रस्ताव नगर विकास विभागाकडे आल्यानंतर त्यांची छाननी केली जाईल. इतका मोठा एरिया डेव्हलप करतांना नियोजन करण्यात येते. त्यातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असतो. तो निधी अकाऊंट फॉर केलेला नाही. यासंदर्भातील आवश्यक तो एकत्रित निर्णय घेण्यात येईल. रिजलन प्लॅन तयार करताना डीसीआर तयार करण्यात येतो. परंतु त्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. ही यंत्रणा अत्यंत कमजोर झालेली आहे. ही यंत्रणा सक्षम करण्याचा विचार राज्य शासन करीत आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेत 34 गावांचा समावेश करण्यात येत आहे. ज्या गावांचा समावेश करण्यात येणार आहे, त्या गावांच्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, त्या गावांची पिण्याच्या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3285...

ॲड.जयदेव गायकवाड...

पाण्याची अतिरिक्त मागणी होती, ती मागणी कोठून पूर्ण करणत येईल ? ही गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी व महसूल आयुक्त यांचे काय अभिप्राय आहेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, अद्याप हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे आलेला नाही. सदर प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे आहे, या प्रस्तावाला जोपर्यंत अंतिम मान्यता मिळत नाही, तोपर्यंत तेथील निवडणुका नियमानुसार घ्याव्या लागणार आहेत. यासंदर्भात जे अभिप्राय देण्यात आले आहेत, त्यांची तपासणी ग्रामविकास विभाग करीत आहे. कायद्याने असे अपेक्षित आहे की, ग्रामीण संस्थांचे अभिप्राय तपासून त्यावर ग्रामविकास विभागाने मत नोंदवावे. ग्रामविकास विभागाचे अभिप्राय आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, 34 गावांच्या समावेशाचा हा प्रश्न आहे. काही दिवसांपूर्वी नागपूर येथील काही गावांचा समावेश नागपूर महानगरपालिकेत करण्यात आला आहे. तेथे विकासाची काम करीत असताना किती निधी लागतो, याची आपणाला माहिती आहे. या ठिकाणी सिवरेज प्रोजेक्ट तयार करावा लागणार आहे. 2013 मध्ये प्राथमिक अधिसूचना शासनाने प्रसिध्द केली आहे. त्या गोष्टीला दोन वर्षे झाली आहेत. या दोन वर्षात शासनाने कोणती तयारी केली आहे. महानगरपालिकेत 34 गावांच्या समावेशाबाबत आरक्षण, गावठाण मंजुरी, विवक्षित क्षेत्र विकास परवानग्या आणि विकास नियमावलीबाबत शासनाची काय भूमिका आहे. सिवरेज ट्रीटमेंट व वॉटर ट्रिटमेंटसाठी एसटीबीओ तयार करावे लागेल त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत त्यांनी थोडी घाई केली आहे. याबाबत शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. ग्रामविकास विभागाकडून हा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे आल्यानंतर गावे समाविष्ट करण्याचा निर्णय होईल तेव्हा महानगरपालिकेला सूचना देऊन सिवरेज ट्रीटमेंट, वॉटर ट्रीटमेंट व वॉटर ऑगमेंटेशन याबाबत नियोजन केले जाईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांची प्रत्येक जिल्ह्याची रिजनल प्लॅनची संकल्पना अतिशय चांगली आहे, अनेक जिल्ह्यातील रिजनल प्लॅन इन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-4

VVK/ AKN/ ST/ प्रथम श्री.रोझेकर... 12:30

ता.प्र.क्र.3285...

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

ॲक्टिव्ह आहेत. सन्माननीय सदस्यांनी कॉलर झोनचा उल्लेख केला आहे. डीपी नंतर आरपी सुरु होतो. आरपी मध्ये देशातील नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बांधकामे होत आहेत. अशा बांधकामांना परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 18 प्रमाणे जिल्हाधिकारी यांना आहेत. प्रत्येक नगरपालिकेच्या बाहेरील आरपीमध्ये व ग्रामपंचायतीत तेथील ग्रामसेवक व सरपंच खिशात शिक्के ठेवतात व तीन किंवा चार एफएसआयचा शिक्का मारुन देतात. माझा प्रश्न असा आहे की, हा एरिया अर्बनमध्ये कधी समाविष्ट होणार आहे. हा एक वेगळा भाग आहे, यासाठी भरपूर वेळ लाणार आहे. त्यानंतर ग्रामीण व शहरी भागाच्या वेगवेगळ्या बैठका घ्यावा लागतील. तेथील आरपी प्रलंबित आहे. प्रत्येक शहराचे नागरिकरण कॉलर झोनमध्ये प्रस्तावित असलेला विकास आराखडा यांचा विचार करुन अनधिकृत बांधकामे होणार नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना नियम 18 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या संदर्भात साशंकता होती एनएची परवानगी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागण्यात येत होती. या परवानगीमध्ये एक कॉलम टाकला जात होता की, तेथील प्राधिकरण म्हणजे ग्रामपंचायतीची मान्यता घ्यावी लागेल. त्याचा दुरुपयोग करुन सरपंचांकडून शिक्के मारुन घेतले जात होते व नंतर कोर्टात सांगितले जात होते की, एनएच्या ऑर्डरमध्ये तशी परवानगी देण्यात आली आहे. आता ही साशंकता दूर करण्यात आली आहे. नागपूर येथील अधिवेशनात नवीन कायदा मंजूर करण्यात आला आहे. जुन्या कायद्यानुसार ग्रामपंचायतीला गावठाण एरियात कोणतेच अधिकारी नव्हते. आता नवीन कायद्यानुसार ग्रामपंचायतीला गावठाणाचे अधिकार देण्यात आले आहेत. गावठाणाबाहेरील अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. तशा सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात येतील. नगर रचना विभागाच्या मदतीने यावर नियंत्रण ठेवावे, अशा देखील सूचना त्यांना देण्यात येतील.

-------------

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाची कामे जलद गतीने करण्याबाबत**

**(५) * ३४८४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूरर:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा भरण्यासाठी कमी कालावधी शिल्लक राहिला असताना सर्वच कामे मंदगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांचे निर्देश डावलून सिंहस्थ कुंभमेळयामध्ये नाशिक शहरात कायमस्वरुपी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याऐवजी तात्पुरते सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळयाची कामे जलद गतीने होण्यासाठी तसेच नाशिक शहरात कायमस्वरूपी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबतचा आतापर्यंतचा अनुभव व सिंहस्थ कुंभमेळयाचा कालावधी विचारात घेता तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास गृह विभागाने त्यांच्या दिनांक ३/१२/२०१४ व दिनांक ०१/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
(३) सिंहस्थ कुंभमेळयाचे आयोजन व अंमलबजावणी संदर्भात दिनांक २८/१२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती, मा.पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती, व जिल्हाधिकारी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

यांशिवाय मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने वेळोवेळी घेतलेल्या व घेतल्या जाणाऱ्या निर्णयाची कालबध्द व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या हेतूने अपर मुख्य सचिव (सा.बां.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये केंद्रीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने मान्यता दिलेल्या आराखडयातील कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असून, त्यानुसार कायमस्वरुपी कामे मार्च २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत असून, तात्पुरत्या स्वरुपातील कामे कामाच्या स्वरुपानुसार जून २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3484.........

श्री.देवेंद्र फडणवीस........

सीसीटीव्हीच्या कामासंदर्भात गृह विभागाच्या दिनांक २०/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मे.प्राईसवॉटर कुपर यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतची निविदा प्रक्रिया पोलीस आयुक्त, नाशिक यांचे स्तरावर राबविण्यास मान्यता दिली आहे तसेच पोलीस आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली खरेदी व तांत्रिक समिती स्थापन करण्यासा मान्यता दिली आहे. गृह विभागाकडील दिनांक ३/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत ई-टेंडर दिनांक ११/०२/२०१५ रोजी प्रसिध्द केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, संबंधित तारांकित प्रश्न नाशिक शहरातील पायाभूत सुविधांच्या संदर्भातील नसून सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देशभरातून नाशिक येथे जे लाखो, करोडो भाविक येणार आहेत त्यांच्या दृष्टीकोनातून हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाला विशेष न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे. मी मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीकोनातून नाशिक जिल्ह्यात जेवढा निधी येणे अपेक्षित होते तेवढा निधी आलेला नाही. त्यामुळे कामे संथगतीने तर सुरु आहेतच, परंतु आज पर्यंत जी कामे होणे अपेक्षित होते ती देखील झालेली नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये आता पर्यंत राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून किती निधी देण्यात आलेला आहे आणि त्यापैकी किती निधी खर्च झालेला आहे ? अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी जो निधी देण्याचे जाहीर केलेले आहे तो निधी यापूर्वी जाहीर केलेल्या निधीच्या व्यतिरिक्त आहे काय ? तसेच, आपण हा निधी आता देऊ केला असेल तर या निधीतून संबंधित कामे कुंभमेळ्याच्या प्रथम स्नानापूर्वी पूर्ण होतील काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी ज्यावेळी नाशिक येथे साधूमहंतांची भेट घेतली त्यावेळी साधूमहंतांनी प्रशासकीय कामकाजावर नाराजी व्यक्त केली होती. संबंधितांनी ती बाब मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. आम्ही त्या संदर्भात सुधारणा करु, असे सांगण्यात आले होते. परंतु, आज पर्यंत तेथील साधूमहंतांचे कोणतेही समाधान झालेले नाही. आजही साधूमहंत नाराजी

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3484.........

श्री.जयवंतराव जाधव........

व्यक्त करुन बहिष्कार टाकण्याची भाषा करीत आहेत. म्हणून मुख्यमंत्री महोदय स्वत: त्या ठिकाणी येऊन या संदर्भातील संपूर्ण नियोजन करुन देणार आहेत काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या संदर्भात जी जी कामे सूचविण्यात आली होती त्याचा एक आराखडा तयार करण्यात आला आणि उच्च स्तरीय समितीने तो आराखडा मंजूर केलेला आहे. आम्ही देखील त्याचा आढावा घेतला आणि त्या आराखड्यानुसार अपेक्षित सर्व निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, निधीची कोणतीही कमतरता नाही. आपल्याला आराखड्यातील 311 कामे पूर्ण करावयाची होती. त्यापैकी 15 कामे पूर्ण झालेली आहेत आणि 207 कामे पूर्णत्वाच्या स्टेजवर आहेत. ही कामे पूर्ण होत आहेत. जवळपास 45 कामे अशी आहेत की ती कामे आपल्याला पर्वणीच्या काळात करावयाची आहेत. ती 45 कामे निविदा प्रक्रियेमध्ये आहेत. त्यातील 42 कामे पर्वणीच्या काळात करावयाची असल्यामुळे ती कामे आता सुरु करण्यात आलेली नाहीत. ती कामे त्याच काळात केली जातील. ही सर्व कामे रेग्युलराईज आहेत. ही गोष्ट खरी आहे की, ती कामे गतीने करावी लागत आहेत. आपल्याला कल्पना आहे की, या संदर्भात हायकोर्टात याचिका दाखल झाली होती. हायकोर्टाने कामांच्या संदर्भात समाधान देखील व्यक्त केलेले आहे. हायकोर्टाचे या संदर्भातील म्हणणे मी विधानसभा सभागृहात वाचून दाखविले होते. या संदर्भातील एकूण जो काही निधी आहे तो वेगवेगळ्या विभागाचा निधी आहे. त्यामध्ये नगर विकास विभागकडून 1,062 कोटी रुपये आणि इतर विभागांकडून 1,406 कोटी रुपये असा एकूण 2,629 कोटी रुपयांचा एकूण आराखडा आहे. यावर्षी निधीची किती मागणी होती असा प्रश्न आपण विचारला होता. यावर्षी 312 कोटी रुपयांची मागणी होती. आपण 312 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. ही कामे महत्वाची असल्यामुळे या कामांसाठी निधी थांबविण्यात आलेला नाही. ज्या ज्या वेळी निधीची मागणी केलेली आहे त्या त्या वेळी आपण संपूर्ण निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिक येथे प्रत्येक 12 वर्षांनी कुंभमेळा होतो. प्रत्येक कुंभमेळ्याच्या वेळी अशी आश्वासने दिली जातात की, कुंभमेळा त्या शहराच्या एकूण विकासासाठी महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे जी कामे हाती घेण्यात येतात ती दूरदर्शी प्लॅनिंग करुन पुढील काळात तेथील नागरी वस्तीसाठी देखील उपयुक्त ठरतील अशा पद्धतीनेच करावीत. परंतु, आपण नाशिकमध्ये होणाऱ्या कामांचा आढावा घेतला तर ती कामे तात्पुरत्या स्वरुपाची दिसतात. त्यामुळे ती कामे पुढे किती काळ टिकू शकतील, अशी शंका निर्माण होते. आपण उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, दिनांक 31 मार्च, 2015 पर्यंत पूर्ण झालेल्या कामांचा अहवाल आपल्याकडे आलेला आहे. कुंभमेळा वर्षभर भरणार आहे. त्यामुळे नाशिक महानगरपालिकेची जी एकूण लोकसंख्या आहे त्याच्या काही पटीने लोक केवळ पर्वणीच्याच दिवशी नाही तर वर्षभरात तेथे येणार आहेत. त्यामुळे या दृष्टीकोनातून जी कामे करावयाची आहेत त्या कामांसाठी जी निधीची तरतूद करावयास पाहिजे ती आपल्या नियोजनामध्ये दिसत नाही. या निमित्ताने नाशिक शहरात आता वेगवेगळे सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. एखादा इव्हेन्ट असेल तर लोक अगोदर पासूनच तेथे येतात. आज संपूर्ण देशातून नाशिक शहरात येणाऱ्या भिकाऱ्यांची संख्या वाढत आहे आणि त्यांनी मोक्याच्या जागांवर कब्जा केलेला आहे. ते त्यांचे महात्म्य वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्याचा स्थानिक नागरिकांना त्रास होत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे वगैरे जी यंत्रणा आहे ती तर आवश्यक आहेच. परंतु, अशा प्रकारे तेथील लोकसंख्येवर होणारे जे आक्रमण आहे त्यासाठी काही उपाययोजना आपण आपल्या आराखड्यात अंतर्भूत करणार आहात काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर हा आराखडा तयार करण्याची संधी नवीन सरकारला मिळाली नाही. जुन्या सरकारने तो आराखडा तयार केला होता आणि बहुतांशी तो चांगला आराखडा होता. त्या आराखड्यामध्ये काही थोडे फार बदल करण्याची आवश्यकता होती. वेळे नुसार जे बदल करता येतील तेवढेच बदल आम्ही केलेले आहेत. कारण, आमच्या हातामध्ये खूपच कमी कालावधी होता. आपण जी एक सूचना केली ती योग्य आहे. शेवटी, कुंभमेळ्याचे जे प्लॅनिंग आहे ते खूप अगोदर केले पाहिजे. त्यामुळे राज्य सरकार हा कुंभमेळा संपल्यानंतर दोन वर्षात या प्लॅनिंगला सुरुवात करेल. कारण, पुढील

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

काळामध्ये लॉंग टर्मचे प्लॅनिंग केले पाहिजे. प्रत्येक वेळी साधूग्रामच्या जागेचा प्रॉब्लेम येतो. ते म्हणतात आम्ही साधूग्रामसाठी जागा देणार नाही, हे म्हणतात की आम्ही जागा घेऊ. मग ती जागा अधिग्रहीत करावी. आपल्याला या संदर्भात कधी तरी निर्णय करावा लागेल की, ती जागा अधिग्रहीत करुन त्या जागेच्या संदर्भात ज्या काही गोष्टी करावयाच्या आहेत त्या आपल्याला कराव्या लागतील. राज्य शासन याबाबतीत खूप सकारात्मक आहे. माझी आपल्या माध्यमातून सर्व लोकप्रतिनिधींना विनंती आहे की, आपण कुंभमेळा योग्य प्रकारे ब्रॅंड करु शकलो तर जगाच्या पाठीवर पर्यटनाच्या दृष्टीने आपण नाशिक आणि महाराष्ट्राला एक महत्वाचे स्थान देऊ शकतो. म्हणून आहे त्यामध्ये अडचणी जरुर आहेत. आपण साधूंचा उल्लेख केला. जवळपास सर्व साधूंबरोबर चर्चा झालेली आहे. त्यांना काही गोष्टी बऱ्यापैकी मान्य आहेत, काहींना त्या मान्य नाहीत. माझी अशी विनंती आहे की, आपण या संदर्भात एकत्रितपणे निर्णय घेतलेले आहेत. जे निर्णय घेतलेले आहेत ते मागील काळात घेतलेले आहेत. आम्ही त्यालाच मान्यता दिलेली आहे. काही साधू बोर्डावर नसतील तर आपल्याला त्यांची समजूत घालावी लागेल आणि एक पॉझेटिव्ह मेसेज की, कुंभमेळ्याचा जो ब्रॅंड आहे तो ब्रॅंड जर आपल्याला एस्टॅब्लिश करता आला तर पुढील काळात महाराष्ट्रात आणि विशेषत: नाशिक जिल्ह्याला याचा खूप फायदा होणार आहे. त्या दृष्टीने राज्य सरकार कोठेही कमतरता पडू देणार नाही. माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांकडून अपेक्षा आहे की, आपण सर्वांनी हा ब्रॅंड तयार केला पाहिजे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या संदर्भात तेथे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. ज्यांनी टेंडर कोट केलेले आहे ते इलिजिबलच नाहीत आणि जे इलिजिबल आहेत त्यांचे पेपर फाडून फेकून दिले, ते बघितले देखील नाहीत. म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी याची विशेष चौकशी लावून ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी हे सर्व चुकीचे नियोजन केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करुन आपण या संदर्भात पुर्नप्रक्रिया राबविणार आहात काय आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी किती खर्च झालेला आहे ?

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मुळात याचे जे नियोजन आहे ते योग्य प्रकारे झालेलेच नाही. नाशिक हे महत्वाचे शहर आहे. त्यामुळे तेथे कायम स्वरुपी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावयास पाहिजे होते. त्यानंतर मी स्वत: निर्णय घेतला आणि सांगितले की, त्या ठिकाणी कायम स्वरुपी सीसीटीव्ही कॅमेरेच बसविले पाहिजेत. त्यानंतर विभागाने मत सांगितले की, मुंबई, पुणे अशा सर्व ठिकाणचा अनुभव पाहता आम्हाला या कालावधीत कायम स्वरुपी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे शक्य नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3484....

श्री.देवेंद्र फडणवीस....

आम्ही अंडरग्राऊंड केबलिंग करु शकत नाही, ओव्हरहेड केबलिंग करावे लागेल, त्याकरिता 3 महिन्यांचा कालावधी असल्यामुळे हे काम करु शकत नाही असे सांगितल्यामुळे तो निर्णय बदलण्यात आला. कारण ही रिस्क घेता येत नाही. त्यामुळे टेम्पपरी सीसीटीव्ही लावण्यास परवानगी दिली. त्याची निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली आहे. पीडब्ल्यूसी कंपनीला सल्लागार म्हणून अपॉईंट केले असून त्यांच्या अंतर्गत विप्रो सारख्या चांगल्या कंपनीला काम दिले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केली आहे. याबाबत तक्रारी असतील तर निश्चितपणे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांची समिती नियुक्त करुन या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी केली जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सीसीटीव्ही यंत्रणा कायमस्वरुपी बसविण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी दिलेले निर्देश पाळण्यात आले नाहीत. त्याची कारणे उत्तरात नमूद केली आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा भाडे तत्वावर बसविण्यास मंजुरी देणारा दिनांक 3.12.2014 चा गृह विभागाचा शासन निर्णय व सीसीटीव्ही बसविण्याच्या कामाकरिता मे.प्राईसवॉटर कूपर या कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करणारा दिनांक 20.1.2015 चा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर जनतेसाठी उपलब्ध का करुन देण्यात आला नाही? टेंडर प्रक्रियेबद्दल संशय निर्माण होतो. चौकशी करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या गोष्टी सुरुवातीपासून झालेल्या नाहीत. त्यामुळे दाट शंका निर्माण होते. या सगळया गोष्टीची चौकशी व्हावी आणि शासन निर्णय संकेतस्थळावर का आले नाहीत याचे उत्तर द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, चौकशीमध्ये याचाही समावेश केला जाईल.

----------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विक्रोळी (पूर्व) येथील (मुंबई) हरियाली गावातील विकासकाने येथील डीपी रोड बंद केल्याने विद्यार्थी आणि रहिवाश्यांना मोठया प्रमाणात होत असलेला त्रास**

**(६) * ३५७८ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतीश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पूर्व) येथील (मुंबई) हरियाली गावातील एका विकासकाने येथील डीपी रोड बंद केल्याने येथील विद्यार्थी आणि रहिवाश्यांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे, जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रहदारीचा रस्ता बंद करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच,विद्यार्थी आणि रहिवाश्यांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर डीपी रोड पूर्ववत वाहतुकीसाठी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (५)
बृहन्मुंबई महानगरपालिकेने मौजे हरियाली येथील न.भू.क्र. २५२ ते २५५, २७६, २७७, २७९, २८२, २८४ व २८५ या क्षेत्रावर अभिन्यास मंजूर केलेला आहे. ज्या ठिकाणी विकास योजना रस्ता बंद करण्यात आलेला आहे ती जागा न.भू.क्र. २८३ पैकी असून ती मंजूर अभिन्यासाचा भाग नाही. सदर जागा खाजगी मालकीची असल्याने त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही बृहन्मुंबर्इ महानगरपालिकेने सुरु केलेली आहे. सध्या अभिन्यासातील मोकळया जागेमधून विद्यार्थी ये-जा करीत आहेत. विकास योजना रस्त्याखालील न.भू.क्र. २८३ पैकी खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करणेबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात येत आहेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पाचही उपप्रश्नांबाबत एकच उत्तर देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, न.भू.क्रमांक 283 हा अभिन्यासाचा भाग नाही. न.भू.क्र.252 ते 255, 276 ते 282 व 284, 285 हे अभिन्यासाचे भाग असून न.भू.क्र.283 चा त्यात समावेश नाही. तांत्रिकदृष्टया उत्तर योग्य असले तरी तेथील नागरिकांच्या वापरासाठी आवश्यक असणारा रस्ता बंद झाल्याने त्यांची गैरसोय झालेली आहे. यापुढे कोणत्याही विकासकाची योजना मंजूर करीत असताना त्या ठिकाणी असलेला रस्ता पूर्ववत वाहतुकीसाठी सुरु करण्याचे बंधन घालण्यात येईल काय? तेथील नागरिकांचा त्रास कमी होण्यासाठी खाजगी भूखंड संपादनाची प्रक्रिया किती दिवसात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पूर्ण होईल?





ता.प्र.क्र.3578.....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, न.भू.क्र.283 ही जागा खाजगी असल्यामुळे ती अभिन्यासाचा भाग नाही. खाजगी जागा असली तरी तो डी.पी.चा भाग आहे. खाजगी जमीन डी.पी.रस्त्याकरिता घ्यावयाची असेल तर भूसंपादन करावे लागते, म्हणून ती कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या काळात त्या व्यक्तीने तेथे अतिक्रमण केले होते, तो रस्ता वापरण्याची आवश्यकता होती, त्यामुळे ते अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस देण्यात आली. ती नोटीस मिळाल्यानंतर त्यांनी कोर्टाकडून स्टे घेतला. आम्ही सूचना दिल्या आहेत. आवश्यकता असेल तर तातडीने वरच्या कोर्टात जाऊन घेतलेली स्थगिती दूर करावी. दरम्यानच्या काळात भूसंपादनाला कोणतीही स्थगिती नसल्यामुळे महापालिकेने भूसंपादनाबाबत पाठपुरावा सुरु केला असून ती प्रोसेस पूर्ण करुन हा रस्ता डी.पी.चा भाग म्हणून संबोधण्यात येईल.

-----------------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ठाणे महानगरपालिकेने स्थानिक स्वराज्य संस्था कर (एलबीटी) वसूल करण्यासाठी सल्लागार नेमल्याबाबत**

(७) * **३५२५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने सन २०१४ मध्ये स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसूल करणे व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासंदर्भात सल्ला देण्यासाठी २५ सल्लागारांची नेमणूक केली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सल्लागारांच्या नियुक्तीसाठी रक्कम रुपये २ कोटीचा खर्च महानगरपालिकेला करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बेताचीच असल्याने महानगरपालिकेने सदरचा २ कोटीचा खर्च करणे, आर्थिकदृष्ट्या कितपत संयुक्तिक आहे, तसेच प्रकरणाधिन सल्लागारांचे नियुक्तीनंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात किती वाढ झाली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम २९ मधील तरतूदीप्रमाणे नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी नमुना E II मध्ये दाखल केलेल्या विवरणपत्रांची नियम ३३ मधील तरतुदीप्रमाणे छाननी करणे अपेक्षित आहे. तथापि, या कामाकरीता महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना, पुर्वानुभव नसल्याने अशा विवरणपत्रांच्या छाननीच्या कामात या विषयामधील तज्ञ व्यक्तींचा सल्ला आवश्यक वाटल्याने, विवरणपत्रांच्या छाननीत व करनिर्धारणेत महापालिकेच्या महसूलाची कोणत्याही स्वरुपात संभाव्य हानी होऊ नये, या उद्देशाने अशा सल्लागार नियुक्तीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने अंमलात आणणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापि अद्याप पर्यंत अशा सल्लागारांची नियुक्तीचे आदेश बजाविण्यांत आलेले नाहीत.
(२) महापालिकेकडे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील एकूण ११३८० विवरणपत्रे आजपर्यंत प्राप्त झालेली असून अशा विवरणपत्रांची छाननी व करनिर्धारणा करणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील प्राप्त झालेले व २०१४-१५ आर्थिक वर्षातील प्राप्त होणाऱ्या विवरणपत्रांच्या छाननीच्या कामासाठी अंदाजीत रक्कम म्हणून रुपये २ कोटींच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.
(३) स्थानिक संस्था कर नियम २०१० नियम २९ मधील तरतूदीप्रमाणे प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची, नियम ३३ मधील तरतुदीप्रमाणे छाननी करुन करनिर्धारणा करणे आवश्यक असल्याने तसेच अशा छाननीमधून महापालिकेच्या महसुलाची संभाव्य हानी होऊ नये या करीता सदरचा खर्च अनिवार्य आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, एलबीटीच्या वसुलीकरिता ठाणे महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पूर्वानुभव नसल्यामुळे सल्लागाराची नियुक्ती केल्याचे म्हटले आहे. किती महापालिकांमध्ये एलबीटी वसुलीसाठी सल्लागाराची नियुक्ती केली आहे, ठाणे महापालिकेमध्ये सल्लागार नेमण्याची गरज का भासली? एलबीटी सल्लागार निविदा प्रक्रिया एक महिन्यापूर्वी झाली. 2013-14 मध्ये 1 कोटी आणि 2014-15 मध्ये 2 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद ब्लॉक का करुन ठेवली गेली? या रक्कमेतून शहराची विकास कामे करता आली असती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3525.....

ॲड.निरंजन डावखरे....

सभापती महोदय, एलबीटी वसुलीसाठी ज्यावेळी सल्लागार नेमला जातो तो ह्युमन रिसोर्ससाठी असतो. ऑनलाईन शॉपिंगमधील एलबीटी वसुलीसाठी कोणतेही माध्यम नाही. सर्व महापालिकांनी ऑनलाईन शॉपिंग कंपन्यांना पत्र दिले, परंतु त्यांनी त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे ऑनलाईन कंपन्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मुख्यत: तेथे जे मनुष्यबळ आहे ते जकात वसुली करणारे होते. त्यामुळे एलबीटीची विवरणपत्रे समजून घेणे आणि त्यावर कार्यवाही करणे या संदर्भातील विशेषज्ञ त्यांच्याकडे नाहीत. त्यामुळे एलबीटी विवरणपत्र सादर झाल्यानंतर विशेषज्ञ नसल्यामुळे त्यात चोरी असेल किंवा काही लपविण्यात आले असेल तर त्यांना शोधता येत नव्हते. म्हणून हा निर्णय झाला आहे. 2013-14 मध्ये 11380 विवरणपत्रे दाखल झाली आहेत. त्यामुळे ही विवरणपत्रे योग्यप्रकारे तपासण्यात आली तर त्यातून मौठया प्रमाणात एलबीटी मिळू शकतो. या धारणेंतर्गत हे करण्यात आले आहे. त्यांना अजून नियुक्ती देण्यात आलेली नाही. परंतु महापालिकेने प्रस्ताव मंजूर केला आहे. राज्य शासनाचे यावर कोणतेही बंधन नाही. महापालिकांनी स्वत: निर्णय घ्यायचा आहे. काही महापालिकांनी सनदी लेखापाल नेमले आहेत, काही महापालिकांनी कॉस्ट अकाऊंटन्ट नेमले आहेत. टेक्नीकल मॅनपावर घेण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांना वेगळी परवानगी मागण्याची गरज नाही.

सभापती महोदय, ऑनलाईन शॉपिंगच्या संदर्भात जी बाब निदर्शनास आणून दिली आहे ती तपासण्यात येईल आणि जे आवश्यक असेल ते केले जाईल.

श्री.सुनील तटकरे : 2013 पासून स्थानिक स्वराज्य संस्था कर लागू झाला. 2013-14 या वर्षामध्ये महापालिकेला एलबीटीच्या माध्यमातून किती उत्पन्न मिळाले, 2014-15 या आर्थिक वर्षात किती उत्पन्न मिळाले? ठाणे महापालिका स्थापन होऊन अनेक वर्षे झाली आहेत. त्यानंतर स्थापन झालेल्या महापालिकांमध्ये एलब्ीटी वसुली करण्यासाठी यंत्रणा चांगल्यापैकी असू शकते तर ठाणे महापालिकेमधील कर्मचा-यांना प्रशिक्षण देऊन वसुली करण्यामध्ये अडचण काय आहे?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.6

SGB/ AKN/ AKN/ ST/ KTG/ 12:50

ता.प्र.क्र.3525.....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ठाणे महापालिकेला 2012-13 मध्ये जकात कर लागू असताना 531 कोटी रुपये उत्पन्न मिळाले आणि 2013-14 मध्ये एलबीटी लागू झाल्यानंतर 533.61 कोटी रुपये उत्पन्न मिळाले. जकात गोळा करणारे जे कर्मचारी होते ते विशेषज्ञ नाहीत. त्यांनी विवरणपत्रे तपासण्यामध्ये वेळ जाऊ शकतो. म्हणून त्यांनी अतिशय डायनॅमिक पध्दतीने व्यवस्था उभी केली आहे. कर निर्धारणाची रक्कम आहे, त्या रक्कमेच्या आधारावर मोबदला अशा प्रकारची व्यवस्था केली आहे. यामध्ये विशेषत: सनदी लेखापालांची आवश्यकता मोठया प्रमाणात भासणार आहे. कॉस्ट अकाऊंटन्ट आणि चार्टर्ड अकाऊंटन्ट नेमावे लागतील. इन्कम टॅक्स आणि सेल्स टॅक्सच्या संदर्भात अगदी खोलात जाऊन त्यांची मदत घेतली जाते, त्याच पध्दतीने विशेषज्ञ म्हणून अशा प्रकारची व्यवस्था त्यांनी उभी केली आहे.

नंतर आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3525....

श्री.देवेंद्र फडणवीस...

तथापि, महानगरपालिकेला सांगण्यात येईल की, आपल्याकडील जे कर्मचारी अर्हता प्राप्त असतील त्यांना प्रशिक्षण देण्यामध्ये कोणतीही हरकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने एलबीटी 1 ऑगस्ट पासून रद्द करण्याचे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जाहीर केले आहे. पण त्यासाठी निधीची तरतूद कुठेही केलेली नाही. 1 ऑगस्ट पासून एलबीटी रद्द केल्यानंतर शासनावर किती आर्थिक बोजा पडणार आहे, तो बोजा राज्य शासन कशा प्रकारे पर्यायी व्यवस्था करून भरून काढणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, 1 ऑगस्ट 2015 पासून एलबीटी रद्द करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. राज्याच्या तिजोरीत पैसे कसे येतील, कुठून येतील यासंबंधातील कायदा सभागृहात मांडण्यात येणार आहे. त्यावेळी यासंबंधातील सगळी माहिती आपल्याला देण्यात येईल.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी ऑनलाईन शॉपिंगचा मुद्दा उपस्थित केला होता. आपण सर्वजण ॲमेझॉन किंवा फ्लिपकार्टवरून ऑनलाईन खरेदी करतो असतो. या वेबसाईटवरून लोकांची फसवणूक होत असते. वेबसाईटवर त्यांच्या कुठल्याही कार्यालयाचा पत्ता नसतो, फोन नंबर नसतो, अधिकाऱ्याचे नाव नसते. वेबसाईटवर फक्त कॉन्टॅक्ट अस किंवा कम्प्लेंट असा एकच टॅब असतो. त्यामुळे ते कोणालाही जुमानत नाहीत. या वेबसाईटवर जाहिरात देणारा आणि माल विकणारा यात कोणतेही तारतम्य नसते. कोणीही उठून जाहिरात देत असतो, माल विकत असतो. त्यात लोकांची खूप फसवणूक होते. त्यामुळे ज्यांची वेबसाईट आहे त्यांना त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, अधिकाऱ्याचे नाव व नंबर नमूद करण्यासंबंधी शासन काही सूचना करणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वये दिलेली प्रस्तावाची सूचना**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह विभाग आहे. नागपूर मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी केलेले पलायन यासंबंधी आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात थांबावे अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, परवा सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवरील प्रस्तावाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराच्या वेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो. त्यावेळी इतर सन्माननीय सदस्य उपस्थित होते. माननीय मुख्यमंत्री हे नागपूरचे आहेत. आज नागपूरमध्येच कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत आहेत. नागपूर मध्यवर्ती कारागृहातून काल पाच कैद्यांनी गज तोडून पलायन केले आहे. या करागृहात 1993 च्या बॉम्बस्फोटातील आरोपी आहेत. कुविख्यात श्री.अरूण गवळी त्या कारागृहात आहेत. पुण्यातील बॉम्बस्फोटाचे आरोपी देखील याच कारागृहात आहेत. ज्या पाच कैद्यांनी पलायन केले आहे त्यापैकी तिघांना मोक्का लावण्यात आला होता. श्री.सोहब सलीम खान, श्री.सत्येंद्र उर्फ राहुल गुप्ता, श्री.प्रेम उर्फ नेपाली खत्री, श्री.आकाश ठाकूर, श्री.बिशनसिंग उके अशी या पाच आरोपिंची नावे आहेत. माननीय मुख्यमंत्री या राज्याचे गृह मंत्री आहेत. त्यांच्या नागपूर मधील मध्यवर्ती कारागृहासंबंधी प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल तर ते योग्य नाही. कारागृहातून गुन्हेगार पलायन करीत असतील तर ती महाराष्ट्राच्या कायदा व सुव्यवस्थेला शोभणारी गोष्ट नाही. हा प्रस्ताव मांडत असतानाच कामठी नागपूर येथे पोलिसांच्या ताब्यात असलेल्या कैद्यांनी देखील पलायन केले आहे. तसेच, संपूर्ण नागपूर शहरात दहशत बसेल अशा प्रकारचा गोळीबार काही गुंडांनी केला आहे. एका तडीपार गुंडाने नागपूरमध्ये एका तरूण मुलीला नग्न करून मारहाण केली. ज्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह खाते आहे त्यांच्या नागपूरमध्येच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जे गृहराज्यमंत्री आहेत त्यांच्या जिल्ह्यामध्ये म्हणजे नगर जिल्ह्यातील नेवासे तालुक्यातील राजेगाव येथे एक घटना घडली आहे. वारकरी संप्रदायाचा वारसा आपण महाराष्ट्रामध्ये चालवितो. हरिनाम सप्ताहाचा हिशोब मागितला

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

म्हणून एका 45 वर्षीय महिलेवर सामुहिक बलात्कार करण्यात आला. या सर्व बाबी अतिशय गंभीर आहेत. त्यामुळे आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. आज नागपूर, नगर, मुबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली येथील कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. काल जय महाराष्ट्र या टी.व्ही वाहिनीवर ज्या मध्यवर्ती कारागृहातून कैदी पळालेत तेथील श्री.कांबळे नावाच्या कर्मचाऱ्याने कारागृहामध्ये काय चालले आहे, कशा प्रकारे पार्ट्या होत आहेत हे सांगितले. कारागृहामध्ये जे श्रीमंत कैदी आहेत त्या प्रत्येकाकडे मोबाईल आहेत. त्यांनी वाहिनीवर सांगितले की, आपल्याला धाड टाकायची असेल तर ती या यंत्रणेमार्फत न टाकता बाहेरच्या लोकांकडून धाड घालण्यात यावी. एवढा भयंकर प्रकार नागपूर कारागृहामध्ये सुरू आहे. एका कैद्याने त्याच्या जन्मदिनाची पार्टी तेथील जेलरच्या ऑफिसमध्ये दिली होती. या पार्टीला त्याच्या नातेवाईकांसह सर्व गोतावळा उपस्थित होता. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये अशा प्रकारे कायद्याचे धिंडवडे निघत असतील तर ते महाराष्ट्राला शोभणारे नाहीत. तेव्हा आम्ही नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिली आहे त्याअनुसार सर्व कामकाज बाजूला ठेवून त्यावर चर्चा करावी अशी विनंती करतो.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अत्यंत गंभीर असा प्रश्न माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेला आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली नवीन सरकार आले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह विभाग आहे. आज नागपूर शहरात गुन्ह्यांचे प्रमाण प्रचंड वाढत असल्याचे दिसून येत आहे. मागच्या आठवड्यामध्ये नागपूरमध्ये पाच घटना घडल्या आहेत. नागपूरमध्ये एका व्यापाऱ्याची भर दिवसा लूट करण्यात आली. महिलांवर अत्याचार सातत्याने वाढलेले आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे ......

नागपूरमध्ये व मराष्ट्रामध्ये महिलांवर अमानुष अत्याराच्या घटना घडलेल्या आहेत. नागपूर मध्यवर्ती कारागृहातून 5 कैदी पळाल्याचा उल्लेख या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी केलेला आहे. या ठिकाणावरुन पळून गेलेल्या कैद्यापैकी 3 कैदी हे मोकामध्ये शिक्षा भोगत असलेले कैदी होते.

सभापती महोदय, एका कॉन्स्टेबलने मुलाखत देतांना सांगितले होते की, अधिकाऱ्यांकडून व कैद्यांकडून वापर केलेले हजारो मोबाईल त्या ठिकाणच्या विहिरीमध्ये सापडून येतील.

सभापती महोदय, नगरच्या घटनेच्या संदर्भात मी काल या सभागृहात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती त्यासंदर्भात शासनाने निवेदन करावे असे आपण निदेश दिले होते. नगरमध्ये 4 नराधमांनी मुलाच्या समोर, नवऱ्याच्या समोर महिलेवर बलात्कार केला होता. नागपूरच्या मध्यवर्ती जेलमधून आरोपी पळून गेले, नागपूर येथील कामठी येथून सुध्दा अशाच प्रकारे आरोपी पळून गेलेले आहेत. आज सुध्दा सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यातून एक आरोपी फरार झाल्याची माहिती समोर आलेली आहे. राज्यातील जनतेला विश्वास देण्याचे काम शासनाने केले पाहिजे. परंतु या शासनाचा गृह विभागावर कोणत्याही प्रकारचा अंकुश राहिलेला नाही. गृहविभागावर जर अंकुश राहिला तर अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत. प्रशासन कमकुवत होत आहे, संपूर्ण राज्यामध्ये गुन्हेगारांना वाव मिळतो आहे. नागपूर शहरामध्ये घरफोडया होत आहेत, महिलांवर अत्याचार होत आहेत.

सभापती महोदय, मागच्या काळामध्ये नाशिक येथील जेलमधून एक आरोपी पळून गेला होता. त्यावेळेस मुख्यमंत्री श्री.शरद पवार साहेब होते. एक आरोपी जर जेलमधून पळून जात असेल तर जनतेचा आपल्यावरील विश्वास उडेलच परंतु जनतेचा या संपूर्ण व्यवस्थेवरीलही विश्वास उडेल असे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. त्यावेळेस 1 कैदी पळून गेल्यांनतर त्यांनी 11 लोकांना 311 अनुसार कायमस्वरुपी काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळेस मी गृह राज्यमंत्री होतो हा निर्णय मी त्यावेळेस सभागृहात जाहीर केला होता. आज नागपूर जेलमधून 5 आरोपी पळून गेले असून त्यातील 3 गुन्हेगार हे मोकामध्ये शिक्षा भोगत असलेले गुन्हेगार होते. अशा प्रकारे आरोपी पळून जात असतील तर रोज अशाच प्रकारे अनेक आरोपी पळून जातील.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे ......

असेच चालु राहिलेतर गुन्हेगांराचे प्रात्साहन वाढेल. गृह विभागाचे गुन्हेगारांवर नियंत्रण राहणार नाही. लागेल तेवढे पैसे देऊन काही गुन्हेगार पळून जात आहेत. यामुळे गुन्हेगांराना वाव मिळेल. असे असतांना यासंदर्भात शासनाने कोणताही कठोर निर्णय घेतलेला नाही. कायदा आणि सुव्यवेवस्थेच्या संदर्भात गृह विभाग फेल्यूअर ठरले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाचा पदभार दुसऱ्या मंत्र्यांकडे सोपवून त्यांनी यासंदर्भात राजीनामा द्यावा अशी मागणी करतो. या ठिकाणी आम्ही उपस्थित केलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत सदनात तात्काळ चर्चा घडवून आणावी अशी अपेक्षा मी या निमित्ताने करतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांनी नियम 289 प्रस्तावाची सूचना दिली असून त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये आरोपी नेत असतांना ते आरोपी लेडीज बारमध्ये नेऊन नाचत असतात. आज ज्या पध्दतीने पोलीस वागत आहेत ते या राज्याला शोभणारे नाही. आरोपींना कोर्टात नेत असतांना किंवा एका जेलमधून दुसऱ्या जेलमध्ये नेले जात असताना दिवसाढवळया या आरोपींना लेडीज बारमध्ये नेऊन नाचत असतील तर संबंधित पोलिसांवर कारवाई झाली पाहिजे. आजचे दिवसभराचे सर्व कामकाज बाजूला सारुन नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा झाली पाहिजे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही चर्चा महत्वाची आहे त्यामुळे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवरील चर्चेला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

**सभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या नियम 289 अन्वयेच्या दोन सूचना प्राप्त झाल्या असून त्यावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. काल मंगळवार दिनांक 31 मार्च, 2015 रोजी सन्माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे यासंदर्भात विषय उपस्थित केला होता. तसेच या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती....**

विषयाच्यासंदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय दत्त, किरण पावसकर, प्रकाश गजभिये यांची नियम 93 अन्वये सूचना प्राप्त झाली असून त्यासूचनेबाबत शासनाने निवेदन करावे असे मी काल निदेश दिले होते.

काल सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अहमदनगर येथील विषयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्यासंदर्भात सरकारने निवेदन करावे अशा सूचना दिल्या होत्या. आजही मी या नियम 289 अन्वयेच्या सूचनेवर असा निर्णय देतो की,

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)

अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.16 ते 1.36 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( स्थगितीनंतर )

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया )**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.36 ते 1.46 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** (श्री.गोपीकिसन बाजोरिया) : सभागृहाची बैठक मी पुन्हा 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.46 ते 1.56 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यात ....

(माननीय संसदीय कार्यमंत्री बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना नियम 298 वर बोलता येणार नाही.

(गोंधळ)

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, मला या संदर्भात बोलायचे आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यात सत्तांतर झाल्यापासून गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अलीकडच्या काळात विशेष करून राज्याची उप राजधानी नागपूरमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांचा मतदारसंघात गंभीर घटना घडत आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावाला उत्तर देऊन काहीच कालावधी झाला आहे आणि तरीही सतत अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर हे योग्य नाही. काल याच विषयावर सन्माननीय विरोधी पक्षनेते नियम 289 वरील प्रस्ताव कसा योग्य आहे हे सांगताना नागपूर शहरात गुंडांचे थैमान सुरूअसेल तर या विषयी सभागृहात चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, शासन चर्चेला तयार आहे.

**सभापती** : मी आपल्याला बोलण्यास संधी देतो. आपण खाली बसावे.

(गोंधळ)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. गिरीष बापट यांच्या बोलण्यावरून हे सरकार किती संवदेनशील आहे ते दिसत आहे. सरकारला विषयाचे गांभीर्य नाही. नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव हा विरोधी पक्षाचा असतो. सरकारच्या वतीने या प्रस्तावावर केव्हा चर्चा करता येईल एवढेच सांगता येईल, यापेक्षा जास्त बोलण्याचा त्यांना अधिकार नियम 289 अन्वये नाही.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

विषय गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केला की, माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विभाग सोडून इतर माननीय मंत्र्यांकडे द्यावा. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह खाते असताना नागपूरमध्ये इतके प्रकार घडत असतील तर आणखी कोणावर जबाबदारी देऊन काय निष्पन्न होणार आहे असा प्रश्न पडत आहे. (अडथळा) मी नियम 289 अन्वये हा प्रस्ताव कसा होतो हे सांगत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे........

सभापती महोदय, मी जे काही बोलत आहे, त्यामुळे तर कुणाला वेदना होत असतील तर ज्यांना हे सर्व भोगावे लागले आहे, त्यांची काय अवस्था असेल, याची तुम्ही कल्पना करावी.

सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर ताबडतोब आपण चर्चा सुरु करावी, अशी आम्ही विनंती केली आहे. सरकारच्या वतीने असे सांगितले जाईल की, चर्चा एवढ्या वाजता करु, तेवढ्या वाजता करु, असे होता कामा नये. ही बाब अतिशय तातडीची आणि गंभीर आहे.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु आहे. अधिवेशन सुरु असताना एखादी घटना घडते त्यावेळी आपण स्थगन प्रस्तावाची सूचना देत असतो आणि सभागृहातील इतर सर्व कामकाज बाजूला सारुन त्या विषयावर गांभीर्याने चर्चा करीत असतो. हा विषयही महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. नागपूर मध्ये असे घडत असेल तर राज्यातील उवर्रित भागात भविष्यात काय घडेल, याची ही झलक आहे, असे म्हटले तर वावगे ठरु नये. राज्याच्या गृह राज्यमंत्री महोदयांच्या नगर जिल्ह्यात असाच प्रकार घडला, मुख्यमंत्री महोदयांच्या मतदारसंघात असाच प्रकार घडला, मुंबई सारख्या शहरात देखील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली आहे. त्यामुळे या सर्व घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन आजच्या दिवसाचे सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर आपण चर्चा स्विकृत करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे आणि तो विषय नियम 289 चा कसा होऊ शकतो, याबाबतचे निवेदन सन्माननीय सदस्यांनी केले आहे.

सभापती महोदय, नागपूर शहरात आणि संपूर्ण महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती ढासळलेली आहे. हे नवीन सरकार आल्यानंतर अलीकडच्या काळात, काही दिवसांमध्ये कायदा व सुव्यवस्था सातत्याने घसरत चालली आहे. नागपूर या आपल्या मतदारसंघात मुख्यमंत्री महोदयांचा जो वचक पाहिजे तो संपला आहे. गृहमंत्री म्हणून जो वचक पाहिजे, तो संपला आहे. आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नागपूर शहरात दिवसाढवळ्या गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडत आहेत. उर्वरित महाराष्ट्रात देखील

...2....



श्री.सुनील तटकरे........

काही घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे यापेक्षा अधिक महत्त्वाचा विषय आज चर्चेसाठी दुसरा कोणता असू शकत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय आहे. त्या विषयावर या सभागृहात चर्चा झाली आहे. परंतु, शासनाने दिलेल्या उत्तराने कोणाचेही समाधान झालेले नाही. आज राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती बिघडलेली असेल आणि सदनामध्ये त्यावर चर्चा होणार नसेल तर कशाकरिता ही विधानपरिषद आणि विधानसभा आहे ?

सभापती महोदय, जोपर्यंत सदनामध्ये या विषयावर चर्चा सुरु होणार नाही तोपर्यंत अन्य कोणतेही कामकाज आम्ही होऊ देणार नाही, हे मी स्पष्ट करु इच्छितो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय गटनेत्यांनी प्रश्नोत्तराच्या तासानंतर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली आहे. ही सूचना नियमाप्रमाणेच आहे, त्याला आमचा काही विरोध नाही. यापूर्वी दोन वेळा सभागृहाची बैठक स्थगित झाली होती, त्याबद्दलही आमचे काही म्हणणे नाही. आपण या संदर्भात कोणता निर्णय घेणार आहात, याची आम्ही वाट बघत आहोत. थोड्या वेळापूर्वी मुख्यमंत्री महोदय सभागृहात होते. मी आपल्या निर्णयामध्ये काहीही हस्तक्षेप करणार नाही. परंतु, आपण सन्माननीय सदस्यांना एकदा, दोनदा नव्हे तीन वेळा बोलावयास दिले. मला असे म्हणावयाचे आहे की, प्रत्यक्ष चर्चेसाठी काही मुद्दे रहायला नको का ? आपण त्यांना बोलण्यास परवानगी दिली, त्याबद्दल मी काही बोलणार नाही.

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. या चर्चेला मुख्यमंत्री महोदय उत्तर देणार आहेत. परंतु, आजच्या कामकाज पत्रिकेवर विनियोजन विधेयक आहे, लक्षवेधी सूचना आहेत आणि ते विषय देखील महत्त्वाचे आहेत. विरोधी पक्षाने आग्रह धरलेल्या विषयावर उद्या किंवा परवा चर्चा घ्यावी, असे मी म्हणणार नाही. कारण, आजही सरकारची चर्चेला तयारी आहे. परंतु, आजच्या कामकाज पत्रिकेवरील महत्त्वाचे कामकाज पूर्ण करून आपण दुपारी साडेचार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वाजता ही चर्चा सुरु करु मी आपल्याला विनंती करतो की, आपण आपल्या दालनात या संदर्भात सर्व गटनेत्यांची बैठक घ्यावी आणि त्यामध्ये आपण चर्चेची वेळ ठरवू.

...3....



(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.04 ते 2.14 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक मी पुन्हा 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.15 ते 2.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : आता मी निर्णय देतो. आपल्याला कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेले कामकाज देखील पूर्ण करावयाचे आहे. म.वि.प. नियम 289 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या संदर्भात मी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले आहे. आजचा दिवस चार दिवसांच्या सुटी पूर्वीचा दिवस आहे.

माझा निर्णय असा आहे की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठकरे यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याचे कन्व्हर्जन आपण म.वि.प. नियम 97 मध्ये केलेले आहे. शासनाने म.वि.प. नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर द्यावे. आता म.वि.प. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेला सुरुवात होईल. मुख्यमंत्री महोदयांनी अल्पकालीन चर्चेला उत्तर द्यावे. आपण आवश्यकता वाटली तर आजच्या दिवसाचे जे कामकाज आहे ते मधल्या वेळेत घेऊ.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयावर बोलत नाही. विनियोजन विधेयक आणि लक्षवेधी सूचना घेण्याचे आपल्या दालनात मान्य झालेले आहे. आपल्या दालनात काय चर्चा झाली ते मी सभागृहात सांगणार नाही. परंतु, आपण आता निर्णय देताना विनियोजन विधेयक आणि लक्षवेधी सूचना घेण्याबाबत उल्लेख केलेला नाही.

**सभापती** : आपण म.वि.प. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा संपल्यानंतर विनियोजन विधेयक आणि लक्षवेधी सूचना घेण्याबाबत विचार करु म.वि.प. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेवर माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब हे दोघेच बोलतील.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लेईंग पूर्ण करुन घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी आता निर्णय झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देईन. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेला सुरुवात करावी.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे

**मु.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, जयंत पाटील, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून दिनांक 31 मार्च, 2015 रोजी पहाटेच्या सुमारास पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे, हे सर्व कैदी कुख्यात गुन्हेगार म्हणून ओळखले जाणे, त्यांच्यापैकी तिघांवर मोक्काचे गुन्हे असणे, पोलिसांवर गोळीबार करुन हे आरोपी पळून जाणे, कारागृहात कडक सुरक्षा व्यवस्था असूनही सुरक्षा रक्षकांच्या मदतीनेच या गुंडांनी पलायन करणे, या गुंडांकडे मोबाईल असल्याचे निदर्शनास येणे, एका पोलीस कर्मचाऱ्याने उघड रित्या वाहिन्यांना बाईट देऊन कारागृहात कैद्यांना केल्या जाणाऱ्या मदतीबाबत माहिती देणे, नागपूरमध्ये तडीपार गुंडाने युवतीला मारहाण केल्याची घटना घडणे, नगर जिल्ह्यातील नेवासे तालुक्यातील राजेगाव येथे हरीनाम सप्ताहाच्या वर्गणीचा हिशेब मागणाऱ्या 45 वर्षीय महिलेवर सामुहिक बलात्कार होणे, यातील प्रमुख आरोपी सत्ताधारी पक्षाशी संबंधित असल्याने त्यावर कारवाईस विलंब होणे, नागपूर शहरात गेल्या काही दिवसांपासून गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली असणे, पोलिसांचे यावर नियंत्रण नसणे, गृह विभागाकडूनही यावर कारवाई केली जात नसणे, सभागृहात सभापतींनी निर्देश देऊनही शासनाने या घटनेबाबत साधे निवेदनही न करणे, राज्यातील विशेषतः नागपूर शहर आणि नगर जिल्ह्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था."

सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती आम्ही सभागृहात मांडलेली आहे आणि आपण या विषयावर अल्पकालीन चर्चेला परवानगी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...........

सभपती महोदय, विरोधी पक्षातर्फे म.वि.प. नियम 260 अन्वये राज्यातील कायदा व सुव्यवस्था या विषयावर जो प्रस्ताव मांडण्यात आला होता त्या प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री महोदयांनी सोमवारी सकाळी उत्तर दिले. ते आत्मविश्वासाने उत्तर देत होते आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्था कशी शाबूत आहे, हे त्यांच्या उत्तरातून सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील सांगण्याचा प्रयत्न करीत होते. मुख्यमंत्री महोदय ज्या गावचे आहेत, ज्या मतदारसंघाचे ते अनेक वर्षापासून प्रतिनिधीत्व करीत आहेत त्या नागपूरमध्ये कारागृह आहे. मी "शोले" चित्रपटातील एक डायलॉग सांगतो. आपण सार्वांनी तो डायलॉग ऐकलेला असेल. हम अंग्रेज के जमाने के जेलर है, असे असनारी म्हणतो. या देशातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून नागपूर येथे इंग्रजांनी हे कारागृह बांधलेले आहे. स्वाभाविकपणे नागपूर येथील कारागृहात इंग्रेज के जमाने के जेलर नसले तरी यह इंग्रेज के जमाने के जेल है. हे कारागृह सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. या कारागृहात अनेक महत्वाच्या गुन्ह्यातील गुन्हेगार सजा भोगत आहेत. 1993 च्या बॉम्ब स्फोटातील गुन्हेगार याच कारागृहात आहे. पुणे येथील बॉम्ब स्फोटातील गुन्हेगार देखील याच कारागृहात आहे. कुविख्यात डॉन अरूण गवळी याच कारागृहात आहे आणि याच कारागृहातून काल सकाळी 7.00 वाजता 5 कैदी पळून जातात. त्या कारागृहाचा नकाशा आणि तेथील सुरक्षा व्यवस्था बघितली तर त्या 5 कैद्यांनी एका दिवसात असे ठरविले असेल की, आम्हाला जेलच्या बाहेर जायचे आहे, पळून जावयाचे आहे ? हे शक्य नाही. एवढा कडेकोट बंदोबस्त असणारे कारागृह तोडून तेथून 5 कैदी पळून गेले, हे कारागृह प्रशासनाचे आणि सुरक्षेचे अपयश आहे, हे स्पष्टपणे दिसून येते.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

सभापती महोदय, ज्या बरॅकमध्ये या गुन्हेगारांना ठेवण्यात आले होते त्याच्या सळ्या एका दिवसात कापल्या गेल्या नाहीत. सलग 10 ते 15 दिवस सळ्या कापण्याचा प्रयत्न या पाच जणांकडून झाला. हे 5 प्रमुख आरोपी या जेलमध्ये शिक्षा भोगत असताना जेलमधील एकूण कैद्यांना आणि सुरक्षा व्यवस्थेला याची कल्पना येत नाही हे यंत्रणेचे अपयश आहे. यंत्रणेच्या संमतीने या कैद्यांनी पलायन केले की यंत्रणेचे अपयश आहे हे महाराष्ट्राच्या जनतेला कळले पाहिजे.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, राज्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कायद्याचा वापर करुन चालणार नाही, कायद्याचा धाक असला पाहिजे. हा तुमच्या कायद्याचा धाक आहे का? गुन्हे उघडकीस येऊन आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण 10 टक्क्यावरुन 17 टक्क्यावर, 17 टक्क्यावरुन 24 टक्क्यावर कसा गेला हे सांगण्यात आले. ज्यांना शिक्षा झाली, जे शिक्षा भोगत आहेत ते मात्र जेलमधून निमूटपणे पळून जातात. ही घटना मुख्यमंत्र्यांच्या जिल्हयात आणि त्यांच्याच मतदारसंघात घडली आहे. हे आरोपी मोक्का कायद्यांतर्गत शिक्षा भोगत होते. या 5 आरोपींमधील शोएब खान याने मध्यप्रदेशमधील घुमा येथे सावकार अग्रवाल आणि त्यांची पत्नी यांचा गोळया घालून खून केला आणि दीड कोटी रुपयांचा ऐवज लुटला होता. त्याच्या नावावर 27 गंभीर गुन्हे नोंद आहेत. सत्येंद्र गुप्ता हा एक कैदी पळून गेला. त्याने एका तरुणाचा गोळया घालून खून केला असून घुमा येथील अग्रवाल दाम्पत्याच्या खुनातील हा एक आरोपी आहे. त्याच्यावर लुटमारीचे 34 गुन्हे नोंद आहेत. प्रेम खत्री हा मूळचा नेपाळचा नागरिक असून त्याला आर्म्स ॲक्ट अंतर्गत पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्यावर 21 गुन्हे नोंद आहेत. आकाश ठाकूर या आरोपीला गुन्हे शाखेने वाहन चोरीच्या कारणास्तव अटक केली होती. वाहन चोरीच्या स्कॅण्डलचा हा मास्टर माईंड आहे. बिशनसिंग उके हा एक कैदी पळून गेला असून त्याच्यावर खून, दरोडा, अपहरण असे 34 गुन्हे दाखल आहेत. या 5 आरोपींपैकी 3 जणांना मोक्का कायद्यांतर्गत शिक्षा झालेली होती. अशा आरोपींनी कारागृहातून पलायन करणे म्हणजे राज्यात कायदा व सुव्यवस्था किती चोख आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

सभापती महोदय, नागपूरच्या कारागृहाचे वर्णन 'अंग्रेजों के जमाने के' म्हणून झाले असले तरी हे कारागृह म्हणजे एक उत्कृष्ट रेस्टहाऊस आहे. या जेलमधून शिक्षा भोगत असलेल्या गुन्हेगारांना कोणकोणत्या सुविधा मिळतात हे जर मी सांगितले तर आपल्याला सुध्दा आश्चर्याचा धक्का बसेल. एखाद्या तीन, चार किंवा पंच तारांकित हॉटेलमध्ये जाऊन बसल्यानंतर आपण वेटरला हुकूम करावा आणि त्याने त्याची अंमलबजावणी करावी, तशा प्रकारे या जेलमध्ये आरोपींना मटण, चिकन, साबण, सेंट, सिगारेट किंवा जे जे मागितले जाईल ते आणून देण्याची खबरदारी नागपूर कारागृहातील रेस्टहाऊसमध्ये घेतली जाते. इतकेच नव्हे तर या कारागृहातील कैद्यांना दारुपासून गुटखा, गांजा, चरस, गर्द या सगळयांचा पुरवठा होतो. यंत्रणेकडून कैद्यांना या वस्तूंचा पुरवठा होतो याचा अर्थ या यंत्रणेचा काहीही धाक नाही हे स्पष्ट होते.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाने सत्तेमध्ये येण्यापूर्वी राज्याच्या जनतेला सगळया गोष्टींचा विश्वास दिला होता. तो विश्वास कुठे आहे, आज काय स्थिती निर्माण झालेली आहे? नागपूरच्या कारागृहाचे अधीक्षक वैभव कांबळे हे आहेत. या कारागृहातील एका सामान्य शिपायाने विचलित होऊन 'जय महाराष्ट्र' या दूरचित्रवाणीवर मुलाखत देऊन जाहीरपणे सांगितले की, ज्या कोणत्या कैद्याला शिक्षा भोगत असताना आपला वाढदिवस साजरा करायचा असेल त्या कैद्याच्या नातेवाईकांना अधीक्षकांच्या केबिनमध्ये बोलावले जाते आणि त्यांच्या उपस्थितीत त्या कैद्याचा वाढदिवस साजरा केला जातो. हे पोलीस शिपायाने जाहीरपणे सांगितले असल्यामुळे संबंधितांवर काय कारवाई केली जाणार आहे? कोणाला तरी तडकाफडकी निलंबित केल्याचे घोषणा करण्यात आली. जे कोणी या घटनेमध्ये धाक दाखविण्यासाठी जबाबदार होते त्यांना अगोदर निलंबित केले पाहिजे, नंतर त्याची चौकशी झाली पाहिजे. परंतु तसे होत नाही. या घटनेवर पडदा टाकण्यासाठी कोणाला तरी निलंबित केले गेले म्हणजे विषय संपला असे होत नाही.

सभापती महोदय, नगर जिल्हयातील नेवासा येथील घटना उभ्या महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. हरिनाम सप्ताहाच्या वर्गणीचा हिशोब मागितला म्हणून 45 वर्षीय महिलेवर सामुहिक बलात्कार केला जातो. नगर जिल्हयाचे रेकॉर्ड काढून बघितले तर या घटनेला पोलीस अधीक्षक जबाबदार आहेत, ज्यांच्यामुळे नगर जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आज राज्यात सामान्य जनता, महिला सुरक्षित नाहीत. नगर जिल्हयातील पोलीस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z.3

SGB/ ST/ AKN/ 14:30

श्री.धनंजय मुंडे......

सुध्दा सुरक्षित नाहीत. मागील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील प्रस्तावावर बोलत असताना मी एक मुद्दा मांडला होता. दीपक कोलते नावाचा पोलीस शिपाई ज्या आरोपीला पकडण्यासाठी गेला त्याच आरोपीने त्याचा खून केला.

नंतर 2ए.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

या खुनाला त्या पोलीस स्टेशनचे अधिकारी देखील जबाबदार आहेत. गुन्हेगाराला पोलिसांनीच पोलिसाची टीप देण्याची घटना महाराष्ट्रात कधीही घडली नव्हती. ती घटना नगर जिल्ह्यातील शेगाव पोलीस स्टेशनमध्ये श्री.दीपक कोलतेच्या बाबतीत घडली आहे. यात श्री.दीपक कोलते याचा खून झाला. तो डयुटीवर असताना आरोपीला पकडायला जात होता. आज आपला कायदा व सुव्यवस्थेसंबंधातील धाक कुठे आहे ? ज्यांचे कन्व्हीक्शन झाले आहे ते देखील पळून चालले आहेत. मोटार सायकल, ऑटो रिक्षा चालकांविरुद्ध कोर्टामार्फत दंडात्मक कारवाई केल्यानंतर आपण सांगतात की, तीन महिन्यांमध्ये 10 टक्क्याने महाराष्ट्रातील कन्व्हीक्शन रेट वाढला आहे. आम्ही सत्तेवर आल्यामुळे हा बदल झाला असे आपण सांगत आहात. आपण कोणता बदल केला आहे, आपण ऑटोचालकांविरुद्ध कारवाई केली. मोटार सायकरवर टिबल सीट होती म्हणून दंडात्मक कारवाई करुन चालकांना कोर्टात पाठविले. त्यामुळे आपला कन्व्हीक्शन रेट वाढलेला आहे.

राजे गावची सामुहिक बलात्काराची घटना ही अतिशय भयंकर आहे. युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.उमेश पाटील घटनास्थळी जाऊन आले आहेत. मी आपल्यासमोर आणखी एक विषय मांडणार आहे. तो शासनाने किती गांभीर्याने घ्यायचा हे त्यांनीच ठरविले पाहिजे. नगर जिल्ह्यात एका महिन्यात 30 ॲस्ट्रॉसिटीच्या केसेस दाखल झाल्या आहेत, तर दुसरीकडे महिलांवर बलात्कार होत आहेत. गृह राज्यमंत्री (ग्रामीण) हे नगर जिल्ह्यातील आहेत. माननीय मुख्यमंत्री नागपूरचे असून तेथे दिवसाढवळ्या माणसांना मारले जात आहे, तर गृह राज्य मंत्री हे नगरचे असून देखील तेथे दिवसाढवळ्या सामुहिक बलात्कार होत आहे. या महिलेचा गुन्हा काय होता ? या महाराष्ट्रातील प्रत्येक गावात वार्षिक एक तरी सप्ताह होतो. या महाराष्ट्राला अध्यात्माची परपंरा आहे. आम्ही सर्व विठ्ठलाची लेकरे आहोत, वारकरी आहोत. वार्षिक सप्ताहाला संपूर्ण गाव एकत्र येते. संपूर्ण गाव पैसे जमा करुन सप्ताह केला जातो. या सप्ताहाचा हिशोब या महिलेने मागितला म्हणून काही नराधमांनी एकत्र येऊन 45 वर्षीय महिलेवर बलात्कार केला आहे. आज राज्यातील

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

महिला सुरक्षित आहेत काय ? नेवासेला ही परवा घटना घडली आहे. आताच एक घटना घडली आहे. बुलढाण्यातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आले व परभणी येथे नेऊन तिच्यावर गँगरेप करण्यात आला. परभणी जिल्ह्यातील कण्हेर गावात ही घटना घडली. परवा नेवासे येथे घडलेली सामुहिक बलात्काराची घटना शांत होते ना होते तोच आज परभणी येथे देखील दुसरी घटना घडली आहे. ही पीडित मुलगी बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव मधील आहे. ही घटना 30 मार्च रोजी घडली असून ती आज उघडकीस आली आहे. नगर जिल्ह्यातील राजे गाव येथील सामुहिक बलात्काराच्या घटनेनंतर एक गंभीर बाब उघडकीस आली आहे. ज्या महिलेवर सामुहिक बलात्कार करण्यात आला त्यातील सूत्रधार हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे. त्याचे नाव श्री.लक्ष्मण घुले आहे. पोलिसांनी त्याच्या साथीदारांची धरपकड करण्यास सुरुवात केली आहे. .... (अडथळा)..... सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, आम्ही काही गोष्टी आपल्याकडे बघून शिकलेलो आहोत. जेव्हा आपण विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते म्हणून उभे होता त्यावेळी आम्ही आपल्या मागे होतो. आम्ही जर खोटे बोलत असू तर तत्संबंधातील माहिती आपण पोलीस स्टेशनकडून घ्यावी. मी हे जबाबदारीपूर्वक बोलत आहे. आपण कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जनतेला निवडणुकीच्या काळात जो विश्वास दिला होता त्यास आम्ही पात्र नाही हे या सभागृहात कबूल करावे एवढेच आमचे म्हणणे आहे. आज राज्यात भयंकर गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, पोलिसांनी एक अजब कारवाई केली आहे. ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाण्यातील ए.पी.आय.श्री.मोरे आणि कॉन्स्टेबल श्री.पोटे यांनी आरोपीला पोलीस कोठडीत न ठेवता रात्रभर पोलीस ठाण्यासमोरील पवित्रा डान्सबारमध्ये ठेवून त्यांच्या समवेत पार्टी केली. ही घटना व्हीडीओ फुटेजमुळे समोर आली आहे. आज पोलिसांची एवढी हिंमत होते. या राज्यात डान्स बार बंदीचा कायदा असताना तो मोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आरोपीला कोठडीत ठेवण्या ऐवजी तुम भी डान्स बार में हम भी डान्स बार में अशी भूमिका पोलिसांनी घेतली. अशाने राज्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहील काय, राज्यातील जनता सुरक्षित राहील काय ?

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

परवा कायदा व सुव्यवस्थेवर झालेल्या उत्तराच्या वेळी आम्हाला एका गोष्टीची अपेक्षा मुख्यमंत्र्यांकडून होती. आमचा कायदा व सुव्यवस्थेवरील प्रस्ताव हा कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येसंबंधात होता. पण मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येसंबंधातील एका शब्दाचा देखील उल्लेख नव्हता. आम्ही एखादी बाब पुराव्यानिशी सांगितली की त्यासंबंधी समोर बसणाऱ्या माननीय मंत्र्यांना राग येतो. हा आमचा त्यांच्यावर आरोप नव्हता. जी माहिती पोलीस स्टेशनमधून आली आहे तीच मी येथे मांडली आहे.

सभापती महोदय, गोरेगाव येथील श्रीमती ज्योती निर्भया या तरुण मोलकरणीला जाळून मारण्यात आले. अद्यापि, या प्रकरणी एकाही आरोपीला अटक झालेली नाही. परभणी येथे जी गँगरेपची घटना घडली त्यातील एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. असे असेल तर मग कायदा व सुव्यवस्था कशी काय अबाधित राहील ?

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, एक महत्वाचा मुद्दा आहे. या गंभीर प्रश्नाच्या संदर्भात आपण आम्हाला नियम 97 अन्वये चर्चा करण्याची संधी प्राप्त करुन दिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

सभापती महोदय, नागपूर येथील प्रकाश बागडे या तडीपार गुंडाने एका 18 वर्षीय तरुणीला नग्न करुन जबर मारहाण केली. विशेष म्हणजे ही घटना नागपूर यथील इमामवाडा पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर घडली आहे. दुसरी घटना याच नागपुरामध्ये जामीनावर सुटलेल्या तडीपार गुंडाने एका मुलीला एवढा त्रास दिला की, तिच्या आईने माझी मुलगी सुंदर दिसते म्हणून मुलीचे मुंडन केले. ही गोष्ट आपल्या पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी आहे काय ? या सगळया घटना ऐकल्यानंतर रक्त सळसळते. असे असताना आज सरकारचे रक्त का सळसळत नाही ? आजचे सत्ताधारी विरोधी पक्षात असताना सरकारवर आरोप करताना त्यांचे रक्त का सळसळत होतं परंतु आजच्या या घटना ऐकल्यानंतर, मी महाराष्ट्रात बदल घडवून आणणार असा विश्वास दिल्यानंतर आपले रक्त का सळसळत नाही ? हा सवाल माझ्यासारख्या सामान्य तरुणाच्या मनात येतो.

सभापती महोदय, गुरुवारी रात्री प्रकाश बागडे या तडीपार गुंडाने माझ्या प्रियसीची माहिती का देत नाही म्हणून एका 18 वर्षीय मुलीला जबर मारहाण केली. सदर पीडित मुलगी आणि तित्री मैत्रीण रात्री 11 वाजता इमामवाडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी गेली असताना पोलिसांनी या मुलींची तक्रार रात्रीच्या 3 वाजेपर्यंत सुध्दा नोंदवून घेतली नाही. या राज्यातील पोलीस किती कर्तव्यदक्ष आहे हे दिसून येते. या मुली तडीपार गुंडाविरुध्द तक्रार नोंदविण्यासाठी केविलवाणा प्रयत्न करतात परंतु तरी सुध्दा या मुलींची तक्रार रात्री 11 ते 3 या वेळेत सुध्दा नोंदवून घेतली गेली नाही. अशी जर परिस्थिती असेल तर या महाराष्ट्रातील महिला कशा सुरक्षित राहतील ? या महाराष्ट्रात आपण महिलांची सुरक्षा कशा प्रकारे अबाधित ठेवणार आहात ? या मुली रात्री 11 वाजता पोलीस स्टेशनमध्ये तडीपार गुंडाची फिर्याद नोंदविण्यासाठी गेल्या असतांना 3 वाजेपर्यंत त्यांची फिर्याद सुध्दा नोंदवली जात नाही. परंतु महिलांनी रात्री किती वाजेपर्यंत पोलीस स्टेशनमध्ये बसून रहावे यासंदर्भात कायद्यात तरतूद आहे. असे असतांना नागपूरच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे.....

इमामवाडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून घेतली गेली नाही तर त्या पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकावर, जबाबदार अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? त्यामुळे यासंदर्भातील माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. रात्री 3 वाजेपर्यंत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन न घेतल्यामुळे या गुंडाच्या भितीपायी या मुलींनी राजा भक्षा मंदिरात पूर्ण रात्र घालवली. शुक्रवारी सुध्दा या पोलीस स्टेशनने तडीपार गुंडाच्या विरोधात या मुलींची तक्रार नोंदवून घेतली नाही. इमामवाडा पोलीस स्टेशन हे या राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे गृहमंत्री सन्माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील आहे. "आता कोठे नेऊन ठेवला आहे नागपूर माझा" असे नागपूरकर म्हणत आहेत. आम्हाला हे शासन खरेच सुरक्षा देणार आहे काय ? अशी अपेक्षा आज महाराष्ट्रातील तमाम जनता करीत आहे. खरोखर या राज्यातील महिला सुरक्षित राहणार आहेत ? एखाद्या महिलेवर अत्याचार झाला तर पोलीस या महिलेसाठी धावून येणार आहेत ? इमामवाडा पोलीस स्टेशनच्या पोलिसांची एवढी हिंमत कशी काय होते ? दोन महिला रात्री 11 वाजता इमामवाडा पोलीस स्टेशनमध्ये तडीपार गुंडाच्या विरोधात तक्रार नोंदविण्यासाठी येतात परंतु त्यांची तक्रार 3 वाजेपर्यंतच नाही तर दुसऱ्या दिवशीही नोंदवून घेतली नाही. या पोलीस स्टेशनला कोणाचे पाठबळ आहे ? इमामवाडा पोलीस स्टेशन संवेदनशील मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात येत असेल आणि यासंदर्भातील थोडीही संवेदना त्यांच्यामध्ये नसेल तर हे शासन इमामवाडा पोलीस स्टेशनच्या विरोधात कोणती कारवाई करणार आहे ? आपण कोणत्या गोष्टीचे समर्थन करावे. उत्तर देतांना मंत्री महोदय विषय दुसरीकडेच नेतील. आज या महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था धड राहिलेली नाही. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूसही आता सुरक्षित राहिलेला नाही. आज महाराष्ट्रातील महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत. त्यामुळे याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे. आम्हाला काही गोष्टींच्या बाबतीत सांगण्यात आले आहे की, कागदोपत्री बोलतो आहे. मी पोलीस महासंचालकांच्या आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या एका विषयाच्या संदर्भात बोललो. आज मी जे काही बोललो आहे त्या सर्व गोष्टींचा पुरावा माझ्याकडे आहे. मी जे काही बोलतो ते पुराव्यानिशी बोलतो. काल नागपूरच्या तुरुगातील 5 कैद्यांनी पलायन

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे.....

केल्याची घटना ताजी असताना नागपूरमध्येच पाटणकर चौकात संध्याकाळी 7 वाजता जेन्टील नावाच्या आरोपीवर अनेक गुन्हे असताना त्याने चौकात ओपन फायर केले. मुख्यमंत्र्यांच्या गावामध्ये संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळेस हातात रिव्हालव्हर घेऊन, याचे समर्थन कोणी केले, कोणाच्या कमरेवर रिव्हालव्हर आहे याचे समर्थन आपण ज्यावेळेस करतो त्यावेळी एक गुन्हेगार पाटणकर चौकात ओपन फायरींग करतो. या एका गोष्टीचा परिणाम काय होतो याचा आपण विचार केला आहे काय ? आपण राज्याचे मुख्यमंत्री आहात व आम्हाला त्याचा आदर आहे. राज्याचे गृहमंत्री म्हणून काही गोष्टीचे समर्थन करीत असताना त्या गोष्टीचा परिणाम काय होणार आहे या गोष्टीचे आपण भान ठेवले पाहिजे. आम्हाला कोणावर आरोप करावयाचा नाही. पण काही गोष्टी आपल्याला नाकारुन चालणार नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, काल आणि आज झालेल्या घटनेच्या संदर्भात नियम 97 अन्वये चर्चा करीत आहोत. त्यामुळे या घटनेच्या संदर्भातील उत्तर आम्हाला सरकारकडून हवे आहे. आम्हाला तुमच्या उत्तरामध्ये हे नको आहे की, तुमच्या 15 वर्षात हे झाले, ते झाले ते सांगू नका. तुम्ही या महाराष्ट्राला सांगिले होते की, आम्ही सगळयात चांगले आहोत, आम्ही सगळयात उजवे आहोत. जर तुम्ही सगळयात चांगले आणि उजवे आहात तर या घटनेच्या निमित्ताने आम्हाला तुमच्याकडून उत्तर हवे आहे. बाकी गोष्टीमध्ये दोष देत बसू नका. तुम्ही जर समर्थ असाल तर ते तुम्ही समर्थपणे दाखवून द्या की, या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था आम्ही समर्थपणे करु.

यानंतर श्री. अजित......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

या सभागृहामध्ये काही प्रश्न विचारल्यानंतर ते प्रश्न अनुत्तरित राहत असतील तर ते बरोबर नाही. आज महाराष्ट्रातील विशेषत: नागपूर, अहमदनगर, मुंबई या भागातील सर्वसामान्य जनता दहशतीखाली वावरत आहे. आपल्या सुरक्षिततेसंबंधी त्यांच्या मनात प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था अस्तित्वात आहे काय, राज्यातील महिला सुरक्षित आहे काय, सर्वसामान्य जनता सुरक्षित आहे काय, त्यांच्या मनातील हे सर्व प्रश्न मी या सदनात उपस्थित केलेले आहेत. या सर्व प्रश्नांची उत्तरे सरकारकडून मिळतील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये "नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून दिनांक 31 मार्च, 2015 रोजी पहाटेच्या सुमारास पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे, हे सर्व कैदी कुविख्यात गुन्हेगार म्हणून ओळखणे जाणे " हा विषय उपस्थित केला होता. सदनापुढील कामकाज बाजूला ठेवून या महत्वाच्या विषयावर चर्चा घ्यावी असा आग्रह धरला होता. या विषयाचे महत्व लक्षात घेऊन आपण नियम 97 खाली या विषयावर चर्चा करण्यास परवानगी दिली.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात दोन्ही सदनामध्ये राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थे संदर्भात चर्चा होत असते. या चर्चेच्या माध्यमातून राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची काय परिस्थिती आहे याची माहिती राज्यातील जनतेला मिळावी असा आपल्या सर्वांचा उद्देश असतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये सत्तांतर होऊन भाजपा आणि शिवसेना पक्षाचे सरकार सत्तेवर आले. या नवीन सरकारच्या माध्यमातून सर्वांना न्याय मिळेल अशी जनतेची अपेक्षा होती. त्या दृष्टीकोनातून या सर्व बाबी लक्षात घेतल्या तर या नवीन सरकारने राज्याची किती प्रगती केली, जनतेने या सरकारवर जो विश्वास दाखविला होता त्या विश्वासाला हे सरकार पात्र ठरले का ? मागील चार-पाच महिन्यांत राज्यातील जनतेला विश्वास वाटेल असा कोणताही निर्णय या नवीन सरकारने घेतलेला नाही.

सभापती महोदय, आज राज्यातील प्रत्येक भागांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नामध्ये वाढ झालेली आहे. मग त्यामध्ये महिलांवरील अत्याचार असेल, चोरीची प्रकरणे असतील, लहान मुलांवरील अत्याचाराची प्रकरणे असतील, खुनाची प्रकरणे असतील, खंडणीचे प्रकार असतील अशा प्रकारच्या सर्व गुन्ह्यांमध्ये अलीकडच्या काळामध्ये वाढ झालेली आहे. यातील प्रत्येक विषयाच्या संदर्भात सदनात चर्चा होत नाही. परंतु राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी माननीय मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री यांचेवर असते. श्री.देवेंद्र फडणवीस यांचेकडे मुख्यमंत्री तसेच गृह विभागाचा कार्यभार आहे. तेव्हा पर्यायाने त्यांच्यावर ही जबाबदारी येते. त्यांनी सांगितले होते की, मी मुख्यमंत्री पदाची आणि गृह विभागाची जबाबदारी चांगली पार पाडू शकेन. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सोडून द्या पण आज मुख्यमंत्री महोदयांच्या नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर गुन्हे घडत आहेत. भर चौकामध्ये गोळीबार होत आहे. उद्योगपतींवर प्राणघातक हल्ले झाले. महिलांवर अत्याचार झाले. मागील आठवडयात पाच हत्या झाल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

01-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-3

AJIT/ ST/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 15:00

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, राज्यात गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. गुन्हेगारांना शिक्षा व्हावी असे राज्यातील जनतेला वाटत असते. परंतु त्यास मूठमाती देण्याचे काम या सरकारकडून झालेले आहे. ज्या कुविख्यात पाच आरोपींना पकडण्यात आले होते, त्या आरोपींनी पलायन केल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेमुळे राज्यातील जनतेचा पोलिसांवरील विश्वास उडाला आहे. नवीन सरकार म्हटल्यावर एक सक्षम नेतृत्व असले पाहिजे. नेतृत्वाचा एक दरारा असला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री, डी.जी., पोलीस आयुक्त सर्व ठिकाणी जाऊ शकत नाही. परंतु वरच्या अधिकाऱ्यांचा खात्यावर दरारा असला पाहिजे. एखाद्या गुन्हेगाराला वाटले पाहिजे अमूक एक अधिकारी आला आहे तेव्हा आता आपला अवैध धंदा बंद केला पाहिजे. गुन्हेगार लपून बसला पाहिजे. राज्यातील गुन्हेगारी कमी झाली की त्यामध्ये वाढ झाली यावरुन नेतृत्वाची कल्पना येते. माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह विभागाचा कार्यभार आहे. श्री.एकनाथराव खडसे यांना ते खाते द्यावे लागेल म्हणून त्यांनी स्वतःकडे ते खाते ठेवले आहे का ? मुख्यमंत्र्यांनी गृह खाते स्वतःकडे ठेवण्यास काही हरकत नाही. तो त्यांचा अधिकार आहे. त्या पक्षाचा तो धोरणात्मक निर्णय आहे. पण आज या गृह खात्याचे धिंडवडे निघाले आहेत अशा प्रकारचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला. यास माननीय मुख्यमंत्री जबाबदार आहेत. आपण बऱ्याच वेळा पाहतो की, जिल्ह्याचा पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त यांचा दरारा असेल तर त्या भागातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होते. त्या भागातील गुन्हेगार देखील लपून बसतात, आपले अवैध धंदे करावे लागतील अशाप्रकारची भीती त्यांच्यामध्ये निर्माण होते. परंतु आज राज्यातील दराऱ्याचा विषय सोडाच पण नागपूर शहरामध्ये पोलीस विभागाचा कोणताही दरारा राहिलेला नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

अशा वेळी कारागृहातून पाच कैदी पळून जातात आणि अद्यापपर्यंत ते सापडत नाहीत. त्यामुळे या संदर्भातील जबाबदारी कोणावर तरी निश्चित करणे गरजेचे आहे. महोदय, राज्याच्या दृष्टीने नागपूरचे मध्यवर्ती कारागृह हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मध्यवर्ती कारागृहासाठी आय.जी. ची नोमणूक करण्यात आली आहे. त्यांना आता निलंबित करण्यात आले आहे. याच आय.जी. कडे मुंबईच्या ऑर्थर रोड कारागृहाच्या अंडा सेलची जबाबदारी असताना त्यांच्यावर काही आरोपींना मोबाईल पुरविण्यात आल्याचा आरोप होता. परंतु नंतर त्यांची नागपूरला बदली करण्यात आली. नागपूर कारागृहामध्ये अरुण गवळी, याकूब मेमन, हिदायत बेग यासारखे अनेक गुन्हेगार आहेत. नागपूरचे कारागृह मजबूत असताना ते प्रशासनाने पोखरले असेल आणि काही आरोपींना पळून जाण्याची व्यवस्था केली असेल किंवा त्यासाठी प्रोत्साहन दिले असेल तर या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी कारागृहातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर येते.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री आणि मी राज्यमंत्री असताना असाच प्रकार नाशिक मध्यवर्ती कारागृहात घडला होता. नाशिक मध्यवर्ती कारागृहातून एक आरोपी पळून गेला होता. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, नाशिक मध्यवर्ती कारागृहातून आरोपी पळून गेल्यामुळे आम्ही घटनेच्या 311 कलमान्वये कारागृहातील तब्बल 11 अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित नव्हे तर सेवेतून मुक्त केले होते. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेतून मुक्त करण्याचा अधिकार घटनेच्या कलम 311 कलमान्वये राज्य सरकारला देण्यात आलेला आहे. त्यामुळे अशा घटनेच्या वेळी राज्य सरकारने कणखर भूमिका बजावली पाहिजे.

सभापती महोदय, अनेक गुन्हेगारांना पोलीस अधिकारी महत्प्रयासाने पकडतात. परंतु याच गुन्हेगारांना कारागृहामध्ये विविध सुविधा मिळत असतील, पाहिजे ते जेवण मिळत असेल, पाहिजे त्या सवलती मिळत असतील आणि वेळ प्रसंगी काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून गुन्हेगारांसाठी पळून जाण्याची व्यवस्था केली जात असेल तर, राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे हे आपण म्हणू शकत नाही. महोदय, अनेक गुन्हेगारांकडे मोठ्या प्रमाणावर पैसा आहे. ते गुन्हेगार पोलीस अधिकाऱ्यांना वाट्टेल तितके पैसे देण्यास तयार असताना, पोलीस अधिकारी त्यांच्या आमिषाला बळी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

न पडता त्या गुन्हेगारांना पकडून कारागृहात टाकतात. पोलीस अधिकाऱ्यांनी मोठ्या कष्टाने



श्री.माणिकराव ठाकरे....

पकडलेले गुन्हेगार जर पळून जात असतील तर ती राज्याच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. अकोला जिल्ह्यातील नवोदय विद्यालयात तेथील शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून गेल्या चार वर्षांपासून 45 विद्यार्थीनींवर अत्याचार केले जात होते. त्या विद्यार्थीनींनी अत्याचार करण्यास प्रतिबंध केला तर त्यांचे गुण कमी करण्याची धमकी दिली जायची. ही घटना माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात घडलेली आहे.

सभापती महोदय, नगर जिल्ह्यात जी घटना घडली ती ऐकून आपल्या अंगावर सुध्दा शहारे येतील, अशी ती घटना आहे. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे एका व्यक्तीने वर्गणीचा हिशेब मागितला म्हणून तीन-चार लोकांनी महिलेवर तिच्या मुलांसमोर आणि पतीसमोर हातपाय बांधून बलात्कार केला. महोदय, मी विचारु इच्छितो की, या राज्यामध्ये असे करण्याची हिंमत कशी होते, अशा आरोपींना राज्यात मोकळे रान कसे मिळत आहे ? महोदय, या राज्यात आपण कोणताही गुन्हा केला तरी पोलीस काहीच करु शकत नाही, अशी गुन्हेगारांची मानसिकता तयार झाली आहे. आज या गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिला नाही. राज्यकर्त्यांचा किंवा राज्याच्या प्रमुखांचा ज्यावेळी वचक असतो त्यावेळी संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम दिसून येते. अशा प्रकारचा वचक असल्यास गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. पण आज राज्यामध्ये सर्व स्तरावरील गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

सभापती महोदय, नागपूरला दोन दिवसांपूर्वी एका महिलेच्या घरात घुसून एका आरोपीने त्या महिलेला नग्न करुन मारहाण केली. त्या महिलेचा गुन्हा नोंदवून घेण्यात आला नाही. त्या महिलेची पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यासाठी जाण्याची सुध्दा हिंमत होत नव्हती. एकंदरीत राज्यात पोलीस दलावरील विश्वास उडाल्याचे चित्र आपण पाहत आहोत.

सभापती महोदय, अलीकडच्या कालखंडात 26 पोलिसांचा अकाली मृत्यू झालेला आहे. परंतु याकडे कोणीही लक्ष देत नाही. महोदय, येरवडा कारागृहाच्या अंडा सेलमधून एका आरोपीने बाहेर 2500 कॉल्स केल्याचे निदर्शनास आले. कारागृहातील एका विशिष्ट खोलीमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणीही शिरु नये म्हणून अंडा सेल निर्माण करण्यात आला. त्या ठिकाणी लहान दरवाजा असतो,

..3..



श्री.माणिकराव ठाकरे....

सभोवताली मोठी भिंत असते आणि वरच्या बाजूला मनगटाच्या आकाराएवढे गडर्स असतात. इतकेच नव्हे तर एक-दुसऱ्या गुन्हेगारांना पाहता येऊ नये अशी व्यवस्था अंडा सेलमध्ये करण्यात आलेली असते. शिवाय अंडा सेलमध्ये ठेवलेल्या गुन्हेगाराला कोणी कधी आणि केव्हा भेटावे या बाबतचे वेळापत्रक सुध्दा निश्चित करण्यात आलेले असते. परंतु याच अंडा सेलमध्ये ठेवलेल्या गुन्हेगाराकडून बाहेर 2500 कॉल्स केल्याची बाब उघडकीस येत असेल तर त्या ठिकाणची सुरक्षा व्यवस्था किती कुचकामी आहे हे दिसून येईल.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

सभापती महोदय, राज्यात आणि विशेषतः नागपूरमध्ये जे गुन्हे घडत आहेत त्यावरुन राज्याच्या जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील जनतेला प्रश्न पडला आहे की, या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था आहे की नाही ? राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत संपूर्ण राज्यात आणि या सभागृहात चर्चा सुरु आहे. या संपूर्ण घटना क्लेशदायक आहेत. राज्यात महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत.

सभापती महोदय, विरोधी पक्षाने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केली होती. त्या प्रस्तावातील पहिला विषय हा कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या हत्येबाबतचा होता. परंतु सदरहू प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्री कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या हत्येबाबत एक शब्दही बोलले नाहीत. महोदय, या सरकारला हे राज्य कोणत्या विचाराने पुढे न्यायचे आहे ? आम्हाला जनतेशी काही देणे-घेणे नाही, आम्ही आमच्या बाजूने पुढे जाऊ अशा प्रकारचा कारभार या राज्याच्या गृह विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. त्या प्रस्तावाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व प्रयत्न करण्यात येतील. शिवाय त्यांनी राज्यात कन्व्हीक्शनचा रेट वाढल्याचे सुध्दा सांगितले होते. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा रेट कमी कधी झाला होता ते अगोदर तपासावे. माननीय गृह राज्यमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. राज्यात कायदा व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सुव्यवस्था चांगली असल्याचे या राज्य सरकारकडून भासविले जात आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण 1994-95 चा रिपोर्ट काढून पहावा.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

काँग्रेस पक्षाने राज्य सोडले त्यावेळी कन्व्हिक्शन रेट 32 टक्के होता. मागच्या वेळी तुमचे राज्य 5 वर्षे राहिले तेव्हा कन्व्हिक्शन रेट 10 टक्क्यांवर आला. आरोपींवर दरारा राहिलेला नाही. आरोपींना वाटत आहे की, हे आपले राज्य आहे, आपण मोकाटपणे वागू. सभापती महोदय, खंडणीवाले मोकाट झाले आहेत. आपण त्यावेळची व्यवस्था पहा. मी उदाहरणे सांगतो. आपण येऊन फक्त 3-4 महिने झाले आहेत आणि राज्यातील कन्व्हिक्शन रेट वाढला असे सांगत आहात. राज्यात कायदा व सुव्यवस्था फार चांगली आहे हे तुम्ही सांगू लागला आहात. मी म्हणतो की, तुम्ही 2 वर्षांनी सांगा की, अशा प्रकारे राज्य चालले आहे. तुम्ही गुन्हेगारांना पाठिशी घालण्याचे काम केले, तुकचा अंकुश राहिलेला नाही. आम्ही अमुक इतक्या आरोपींना कोर्टात नेले, त्यांना शिक्षा दिली असे त्यावेळी सांगा. आपण त्यावेळी गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण सांगा. तुमचे रेकॉर्ड काही बरोबर नाही. पूर्वीचे रेकॉर्ड काढा आणि नंतर बोला. आपण सन 2004-05 पासून हेच सांगत आहात. 10 वर्षे सांगत आहेत की, गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण 2 टक्क्यांनी वाढले आहे. आज राज्यात अशी स्थिती निर्माण झालेली आहे की त्यावरून असे वाटते की, माननीय मुख्यमंत्र्यांचा, प्रशासनाचा अंकुश राहिलेला नाही. राज्यात अशाप्रकारे घटना वाढत असतील तर राज्यातील जनता हे कदापि मान्य करणार नाही, मग शासन कोणाचेही असो. राज्यात भरदिवसा हत्या होत असतील, महिलांवर अत्याचार होत असतील, बलात्कार होत असतील तर राज्यातील जनता कधीही खपवून घेणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांकडे राज्याचे गृहमंत्री पद आहे. त्यामुळे त्यांनी या संदर्भातील जबाबदारी स्वीकारली पाहिजे. काँग्रेस पक्षाचे राज्य होते त्यावेळी सातत्याने तुम्ही म्हणत होता की, अमुक एका घटनेची जबाबदारी कोण स्वीकारणार ? माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब, आपणच किती वेळा असे म्हणाला आहात की, अमुक एका घटनेत शासन राजीनामा देईल का ? आज मी विचारतो की, माननीय मुख्यमंत्री या घटनेची जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा देणार आहात का ? माननीय मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मी मागणी करतो. आम्हाला या संदर्भात प्रशासनाकडून, शासनाकडून अपेक्षा आहे. राज्यात अशा प्रकारच्या घटना कमी होतील किंवा घडणारच नाहीत असा निर्धार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

शासनाकडून होईल अशी मी अपेक्षा करतो. माननीय मुख्यमंत्री या संदर्भात समाधानकारक उत्तर देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील चर्चेवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, अहमदनगर येथे घटना घडल्यावर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी विरोधी पक्षाच्या अधिकारान्वये नियम 289 अन्वये प्रस्ताव दाखल केला. मी औचित्याच्या मुद्याद्वारे त्यावर भावना मांडल्या होत्या. मी सन 2002 पासून सभागृहात कामकाज करीत आहे. सभागृहात बऱ्याच वेळी महिला अत्याचाराच्या प्रश्नावर चर्चा झाली आहे. सर्व गोष्टीचे डॉक्युमेंटेशन आहे, कागदोपत्री आकडेवारी आहे. पुण्याला सेंटर फॉर पोलीस रिसर्च हा सीआयडी क्राईमचा भाग असणारा विभाग आहे, त्यांच्याकडील दरवर्षी किती गुन्हे नोंदविले गेले, किती गुन्ह्यांमध्ये शिक्षा झाली आणि त्याचे प्रमाण किती आहे याची माहिती www.mahapolice.com या संकेतस्थळावर अनेक वर्षांपासून उपलब्ध आहे. सन 2013 चा अहवाल पाहिला तर दिसेल की, सामाजिक स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये 4-5 टक्के शिक्षेचे प्रमाण आहे, अन्य गुन्ह्यांमध्ये 7-8 टक्क्यांपर्यंत गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण आहे. हे कागदोपत्री आहे. सन 2005, सन 2006, सन 2007, सन 2008 मध्ये काय होते ते आजही संकेतस्थळावर आहे. आजही आपण त्याची चर्चा करू शकतो. आपण सभागृहात अमक्याचे राज्य असताना किती कन्व्हिक्शन रेट होता हे सभागृहातील कार्यवृत्त तपासून पाहू शकतो. सरकारचीच आकडेवारी पाहिली तर आपल्याला या संदर्भात समजू शकते. गेल्या 10 वर्षांत बलात्कार, अत्याचार, हुंडाबळी यासारख्या गुन्ह्यांमध्ये गुन्हा सिध्द होण्याचे प्रमाण 7 टक्क्यांवर नव्हते हे सर्व ठिकाणी असलेल्या आकडेवारीवरून समोर आले आहे. आपल्याकडे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूराची सुध्दा आकडेवारी आहे.

सभापती महोदय, मी स्पेसिफिक घटना मांडणार आहे. मला सरकारकडून अपेक्षा आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना काही विषयात निवेदने दिली आहेत. काही घटनांची माहिती काल रात्री माझ्याकडे पोहचली आहे आणि त्यातील एक घटना अजुनही अप्रकाशित आहे. लातूरला काटगाव या गावात 25 मार्चला तेथील साने गुरूजी आश्रमशाळेत शिकणाऱ्या 11 वर्षांच्या मुलीचा मृतदेह मिळाला आहे. मुलीच्या मृतदेहाचे 36 तास पीएम झाले नव्हते. आई-वडिलांनी आक्रोश केला त्यावेळी पीएम झाले. सभापती महोदय, अजून गंभीर बाब अशी की, आश्रमशाळेतील शिक्षक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सतिश मोहन मोरे व विलास नागनाथ गायकवाड यांना मुलींच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे. मृतदेहाचे पीएम करण्यास 36 तास डॉक्टरांनी नकार का द्यावा हा प्रश्न पडतो. गुन्हा नोंदविल्यापासून गुन्ह्याचा प्रत्यक्षात तपास होईपर्यंत आरोपी मधल्या वेळेत साक्षीपुरावे नष्ट करतात हा आपला अनुभव आहे.

सभापती महोदय, मुरमाडीमधील 3 अल्पवयीन मुलींच्या घटनेमध्ये सुध्दा आपल्याला कल्पना आहे. अधिवेशन सुरू असताना लातुरला 25 मार्चला घटना उघडकीस आली. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे सभागृहात उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्री या संदर्भात उत्तर देणार आहेत. ज्या डॉक्टरने पीएम करण्यास उशीर केला त्या डॉक्टरवर कारवाई झाली पाहिजे अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, नागपूर शहरात काही सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी 18 वर्षे वयाच्या मुलीला उचलून नेऊन तिच्यावर बलात्कार केला. माझे तिच्याशी फोनवर बोलणे करून दिले होते. मी पाऊण तास त्या मुलीशी बोलले. महत्त्वाचा भाग त्यामध्ये असा आहे की, 26 मार्चला रात्री फोन करून मुलीला बोलावून त्यांनी तिचे अपहरण केले, विनयभंग केला. मुलगी पोलीस स्टेशनला गेली. तत्संदर्भात मला तिने गंभीर गोष्ट सांगितली. पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस अधिकारी होती. मी तिचे नाव लेखी निवेदनात दिले आहे. महिला पोलीस अधिकाऱ्याने पुरुष पोलीस अधिकाऱ्यासमोर त्या मुलीला मारहाण केली. तूच कशावरून खोटे बोलत नाहीस असे सांगून तिला पटट्याने मारले आहे, हे गंभीर आहे. किशोर कन्हेरे आणि अनेक कार्यकर्ते यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून रविवारी या संदर्भात निवेदन दिले आहे. महिला पोलीस अधिकारी गुन्हा नोंदवू नये म्हणून एखाद्या पुरुष पोलीस अधिकाऱ्यासमोर अशा पध्दतीने मुलीला मारहाण करीत असेल तर आम्ही समाजामध्ये मुलींना तोंड कसे दाखवायचे. आपण येथे पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाबाबत बोलतो. मुळात ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. प्रकाश बागडे हा तडीपार गुंड आहे. मुलीच्या वैद्यकीय अहवालाच्या संदर्भात सुध्दा रुग्णालयाशी खूप पाठपुरावा करावा लागला. सभापती महोदय, इमामवाडा पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्याने दिरंगाई केली, तिच्यावर दबाव आणला. बलात्काराचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

गुन्हा हा नॉन कम्पाऊंडेबल आहे. एखाद्या व्यक्तीने म्हटले की, माझी तक्रार नाही तरी प्रकरणे चालवावी लागतात. कोपरगावच्या कोर्टातील प्रकरण आपल्याला माहीत आहे. आश्रमामध्ये अनेक मुलींवर बलात्काराचा प्रयत्न झाला होता. मुलींवर दबाव आणून सर्वांकडून आश्रमांतील बाबांनी लिहून घेतले की, आमच्यावर तसे काही झालेले नाही. परंतु कोपरगावच्या न्यायालयाने सांगितले की, हा नॉन कम्पाऊंडेबल ऑफेन्स आहे. समोरासमोर उलट तपासणी होईल तेव्हा ते होस्टाईल आहेत की नाहीत ते रेकॉर्डवर येईल तोपर्यंत आम्ही केस चालविणार. सभापती महोदय, सदर प्रकरणातील संबंधिताला शिक्षा झाली आहे. कारण परिस्थतीजन्य पुरावा होता. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी नॉन कम्पाऊंडेबल ऑफेन्समध्ये या मुलीकडून लिहून कसे घेतले की, माझी काही तक्रार नाही. सभापती महोदय, मी मान्य करते की, तिने लिहायला नको होते. तिने सांगितले की, आम्ही घाबरून गेलो. ती परत म्हणाली की, मला मारले म्हणून मी तसे बोलले. मला तक्रार करायची आहे. तिच्या शरीरावर जखमा झाल्या आहेत. पोलिसांनी अशा नॉन कम्पाऊंडेबल ऑफेन्समध्ये पीडित लोकांनी लिहून दिले तरी त्यांना सांगितले पाहिजे की, आपण न्यायालयात जाऊन सांगावे. हा गुन्हा परत घेता येत नाही. सभापती महोदय,ही इमामवाडीची घटना आहे.

सभापती महोदय, जरीपटका पोलीस स्टेशनचीही एक घटना आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, दुसरी घटना जरीपटका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आहे. जरीपटका पोलीस स्टेशनच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते किंवा सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केलेला नाही. मी एका वेगळ्या कारणासाठी याचा उल्लेख करीत आहे. या घटनेमध्ये हॉटेलमध्ये काम करणाऱ्या 23 वर्षाच्या तरुणाने 11 ते 12 वयोगटाच्या 4 मुलींचे लैंगिक शोषण केले आणि त्यांना निर्जनस्थळी नेऊन दमदाटी केली आहे. हा प्रकार कळल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. आणखीही काही मुले या गुन्ह्यात सहभागी आहेत. जरीपटका पोलीस स्टेशनच्या हद्दीत आणखी एका घटनेमध्ये एका मुलीचे अपहरण करुन सामुहिक बलात्कार केला गेला आहे. याच जरीपटका पोलीस स्टेशनमध्ये अक्कु यादवच्या केसमध्ये महिलांनी कायदा हातात घेतला होता. कोर्टाच्या आवारात त्या गुंडाची ठेचून हत्या करण्यात आली होती. काही वर्षापूर्वी अक्कु यादवची केस झाल्यानंतर दुसऱ्यांदा अशाच पध्दतीने स्थानिक महिलांनी एकत्र येऊन एका गुंडाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला होता.. जरीपटका पोलीस स्टेशनच्या हलगर्जीपणाची राज्यासमोर आलेली ही तिसरी घटना आहे. या घटनेमध्ये परत परत लोकांना कायदा हातात घेण्याची वेळ येते, ही अतिशय दु:खाची बाब आहे. माझे असे म्हणणे आहे की, जरीपटका पोलीस स्टेशनसंदर्भात वेगळ्या प्रकारची महिला दक्षता समिती नेमणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सीताबर्डी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका 62 वयाच्या वृद्धाने एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला आहे. नागपूर शहरामधील महिला दक्षता समित्यांची पुनर्रचना करण्यात यावी, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. अनेक ठिकाणी महिला दक्षता समित्यांना पोलीस अधिकारी जुमानत नाहीत. पोलीस या महिला दक्षता समित्यांना कोणतीही माहिती देत नाहीत, त्यांना पंचनाम्याच्या वेळी, जाबजबाबाच्या वेळी बोलवित नाहीत. महिला दक्षता समित्यांमध्ये वर्षानुवर्षे काही महिला अतिशय चांगले काम करीत आहेत. परंतु, अनेक महिलांमध्ये वेगळ्या प्रकारचे शैथिल्य, वेगळ्या प्रकारची दिरंगाई आली असल्यामुळे या महिला समित्यांची पुनर्रचना झाली पाहिजे, याकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, या चर्चेत नगरच्या घटनेचा वारंवार उल्लेख झाला आहे. संबंधित महिलेशी मी संपर्क साधला आणि तिच्याशी बोलणे केले. तेथील स्नेहालय या संस्थेने त्या महिलेचे

...2....



डॉ.नीलम गोऱ्हे.......

समुपदेशन करण्यासाठी मदत केली आहे. या महिलेने मला अशी माहिती दिली की, तेथील सोनई पोलीस स्टेशनमध्ये जाऊन अगोदर सांगितले होते की, तक्रार केल्यामुळे अशा प्रकारे त्रास देण्यात येत आहे. परंतु, त्या तक्रारीच्या संदर्भात पोलीस स्टेशनने दखल न घेतल्यामुळे पुढील प्रकार घडला, अशा पध्दतीचा आक्रोश त्या महिलेने माझ्याशी बोलताना व्यक्त केला आहे. या घटनेमध्ये सोनई पोलीस स्टेशनकडून दुर्लक्ष झाले आहे, त्याबाबतची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. मी या संदर्भात नगरच्या पोलीस अधीक्षकांशी बोलले. त्यांनी असे सांगितले की, आम्ही 4 पैकी एका आरोपीला अटक केली आहे, अन्य 3 आरोपींना ताबडतोब अटक करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मला येथे सांगितले पाहिजे की, नेवासा परिसरामध्ये फार मोठ्या प्रमाणावर गुंडागर्दी वाढली आहे.

सभापती महोदय, या चर्चेत पक्षाचा उल्लेखही करण्यात आला आहे. परंतु, मला असे सांगावयाचे आहे की, यामध्ये पक्षाचा काही प्रश्न नसतो. तो एखाद्या पक्षाचा सरपंचही असेल. पण शिवसेनेचे एक कार्यकर्ते श्री.लष्करे यांचा खून एका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांने केला. या घटनेत त्या कार्यकर्त्याला 7 वर्षांची शिक्षा देखील झालेली आहे. त्यामुळे आपण असे म्हणू शकत नाही की, एखादा अपराधी या पक्षाचा होता किंवा त्या पक्षाचा होता. नयना सहानी हत्याकांड झाले, लातूरला कल्पना गिरीचा खून झाला, बलात्कार झाला. ती अमूक एका पक्षाची होती म्हणून तिच्यावर अत्याचार झाला, असे म्हणण्यापेक्षा समाजामधील कार्यपध्दती कशी बदलणार आहोत, हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनात आतापर्यंत सभागृहात एका विषयावर चर्चा झालेली नाही. स्कूल बसमध्ये लहान मुलींवर बसच्या स्टाफकडून वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार करण्याच्या घटना घडत असतात. परिवहन विभाग आणि शिक्षण विभाग यांच्या वादात गेल्या 4 वर्षापासून स्कूल बसचे धोरण अडकलेले आहे. ठाणे जिल्ह्यातील वसई, पुणे जिल्ह्यातील कोथरुड अशा अनेक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणारे ड्रायव्हर्स काम संपल्यानंतर दुसऱ्या शाळेत कामाला जातात आणि अल्पवयीन मुलींची छेडछाड करतात. अशा घटना राज्यात घडत असल्यामुळे स्कूल बसमध्ये महिला मदतनीस किंवा परिचर ठेवण्याचे आदेश सरकारने दिलेले आहेत. आपण सर्वच

...3...



डॉ.नीलम गोऱ्हे.......

जण समाजामध्ये काम करीत असतो. परंतु, कोणत्याही शाळेमध्ये अशा प्रकारे महिला मदतनीस ठेवल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळेच कोथरूडला लोकांना कायदा हातात घेण्याची वेळ आली. या संदर्भात आम्ही आर.टी.ओ.ला अनेक वेळा विनंती केली आहे. ड्रायव्हर, क्लिनर यांच्या बरोबरच एक महिला परिचारक ठेवण्याबाबत परिवहन विभाग आणि शिक्षण विभागाने एकमेकांवर जबाबदारी न टाकता शिक्षक-पालक संघालाही बरोबर घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या विषयावर चर्चा होत असताना कारागृहाबाबतचा उल्लेखही करण्यात आला आहे. सन्माननीय श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री असतानाचे एक उदाहरण सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी दिले आहे. पण मला असे वाटते की, आपण प्रोसिडिंग काढली तर कित्येक जेलमधून कित्येक आरोपी मधल्या काळात पळून गेले आहेत, हे आपल्या लक्षात येईल. नाशिकचे कारागृह अधीक्षक आणि त्यावेळचे पोलीस उप महासंचालक श्री.जवाहर सिंग या दोघांना तत्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांनी निलंबित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतरही सातत्याने जेलच्या संदर्भात अनेक वेळा पहाणी करून अनेक त्रुटी दिसलेल्या आहेत. एखादा क्रोनिक आजार बरा होण्यासाठी काही काळ लागतो. त्या पध्दतीने या व्यवस्थेत दुरूस्ती करण्यासाठी, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, राजकीय पक्षपातीपणाची जी बिजे रोवली गेली आहेत, ती उखडून टाकण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे. पण या घटनांमधून बेमुर्वतखोरपणा किंवा महिलांबाबत निग्लिजंस दिसत असेल तर त्याबाबतीत तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, लातूरमध्ये एका विधवा महिलेच्या सतीसदृष मृत्यूची घटना समोर आली आहे. सतीचे समर्थन करण्याचा प्रश्नच येत नाही. असे घडताच कामा नये, अशी आपली सर्वांची भूमिका आहे. परंतु, अशा पध्दतीने एका विधवा महिलेला पतीच्या निधनानंतर ताबडतोब मृत्यूला का कवटाळावेसे वाटले असावे, हा चिंतेचा विषय आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, या चर्चेमध्ये निदर्शनास आणल्या गेलेल्या स्पेसिफिक घटनांमध्ये कार्यवाही झालेली दिसली पाहिजे, आरोपींना ताबडतोब पकडले गेले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करते आणि थांबते.

-------------

...4....



श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य नेत्यांनी या संदर्भातील आपले मनोगत मांडले आहे. नागपूर सारख्या ठिकाणी अशा गंभीर घटना घडणे, हे महाराष्ट्र राज्याला काळीमा फासणारे कृत्य आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. नागपूर ही या राज्याची उपराजधानी आहे. नागपूर शहर हे शांततेचे प्रतिक आहे. ही दिक्षाभूमीची, संघभूमीची नगरी आहे आणि तेथे सर्व शांतताप्रिय माणसे राहतात. परंतु, आता निर्माण झालेली परिस्थिती आम्ही यापूर्वी कधी बघितली नव्हती. काही दिवसांपूर्वी गोळीबार झाला होता आणि आता परवा सुध्दा गोळीबार झाला आहे. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर असे का घडत आहे, हे कळत नाही. प्रशासनावरील पकड ढिली झाली आहे की काय, असा सुध्दा प्रश्न आम्हाला पडतो. दिवसाढवळ्या गाडीमधून गोळ्या चालविल्या जातात. कारण, पोलिसांचा धाक राहिलेला नाही. 5 कैदी जेलमधून पळून गेले आहेत, याबाबतची चौकशी होणे गरजेचे आहे. आम्हाला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार लोखंडी गज तोडून ते बाहेर पडले, भिंती उल्लंघण्यासाठी चादरीचा दोर बनविला आणि जेलमधून बाहेर पडले.

यानंतर श्री.वि.खर्चे........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

सत्ता कोणाचीही असो गुन्हेगारीला जात नसते. जे सत्तेवर असतात त्यांची ही नैतिक जबाबदारी असते. ती जबाबदारी नाकारुन चालणार नाही. आज सत्ताधारी असलेले विरोधी पक्षात असताना कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना जीवचे रान करुन भाषण करीत होते. मुख्यमंत्री महोदयांच्या घराच्या बाजूला मर्डर होतात. सोनसाखळी खेचण्याचे प्रकार घडतात, राज्यासाठी ही बाब शोभादायक नाही. एमआयडीसी हिंगणा पोलीस स्टेशनमध्ये मोबाईल तोडला व दुसऱ्या दिवशी म्हणजे 31 मार्च 2015 रोजी धीरज राणा यांची हत्या त्याच परिसरात झाली. 31 मार्च रोजीच हत्या झाली व त्याच दिवशी पाच कैदी पळून गेले आहेत. 26 मार्च रोजी इमामवाडा, 9 मार्च रोजी सीताबर्डी परिसरात व्यापाऱ्याचा खून करण्यात आला. एक दिवस जात नाही तर लगेलच दुसऱ्या दिवशी काही तरी घटना घडते. अलीकडे 15 दिवसात चार चार मर्डर होत आहेत. हे मर्डर वेगवेगळ्या प्रकारे होत आहेत. वेटर म्हणून काम करणाऱ्या तीन मुलांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. राकेश हाडगिया या तरुणाला अटक करण्यात आली व इतर आरोपी अजून मोकाट आहेत. 13 जानेवारी 2015 रोजी 30 वर्षाचा कापड व्यापारी रितेश बशवारे याची धरमपेठ भागात मुख्यमंत्री महोदयांच्या घराजवळ भर दिवसा हत्या करण्यात आली. या राज्यात जे स्वप्न पाहू शकत नाही अशा गोष्टी होत आहेत.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, अंग्रेज के जमाने के ये जेलर है. मी त्याच्या पलीकडे जाऊन सांगतो की, हमारे जेल मे सुरुंग है. नागपूर येथे प्रत्येक माणूस व महिला असुरक्षित आहे. रात्री 9 वाजल्यानंतर नागपूर येथील लोक रस्त्यावर फिरत नाहीत कारण त्यांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. नागपूर शहर सर्व सामान्य लोकांचे आहे. या शहरात कोठे गोळीबार होईल हे आता सांगता येत नाही. आज येथे गोळीबार झाला तर उद्या इंदोरा येथे गोळीबार होतो. गोळीबारात लोक मरतील अशी भिती त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. असा कोणताही दिवस निघत नाही की, वर्तमान पत्राच्या पहिल्या पानावर मर्डर, बलात्कार याची बातमी नाही.

....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, मुंबई शहरतील चेंबूर परिसरात एक वेगळीच घटना झाली आहे. दहावीत शिकणाऱ्या मुलाला एका महिलेने शीतपेयामध्ये नशेचे औषध टाकून त्याला बेशुध्द केले. 40 वर्षाच्या महिलेने त्या मुलावर अत्याचार केला. महिलेने विद्यार्थ्यावर अत्याचार करण्याची ही पहिलीच घटना आपण पाहत आहोत. पुरुषांनी महिलेवर अत्याचार केल्याच्या घटना आपण पाहतो, परंतु महिलेने पुरुषावर अत्याचार करण्याची घटना पहिल्यांदा वाचायला मिळाली आहे. हे राज्य आपण कोठे नेत आहोत असा प्रश्न मुख्यमंत्री महोदयांनी स्वतःच्या मनाला विचारला पाहिजे. पोलीस विभाग अतिशय संवेदनशील आहे. गृह खात्याचा कारभार व्यवस्थित चालला तर सर्व काही ठीक चालते. एका वेळी घरात खायला नसले तरी चालेल परंतु गुंडाच्या भितीमुळे नागपूर येथील माणूस घराच्या बाहेर निघत नाही. अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. गृह विभागाचा कारभार अतिशय सुस्थ झाला आहे. यासाठी काही तरी वेगळे नियम तयार करावे लागतील. यासाठी पोलिसांचे पाठबळ व मनुष्यबळ वाढवावे लागेल. नागपूर विभागात पोलिसांची पदे अतिशय कमी आहेत, रिक्त पदे आहेत, त्या रिक्त पदांची भरती लवकर केली पाहिजे. नागपूर येथे चार झोन तयार करण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या हद्दीत 10 झोन येतात. या 10 झोनसाठी डीसीपीची नियुक्ती केली पाहिजे. महिलांचा विशेष झोन तयार करुन तेथे डीसीपी देण्याची आवश्यकता आहे. गृह मंत्री महोदयांनी या राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली राखण्याकरिता प्रयत्न करावेत अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सुरुवातीला आपणाला विनंती आहे की, अतिशय संवेदनशील विषयावर नियम 97 अन्वये ही चर्चा असली तरी..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत. प्रमुख नेते सोडले तर मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना 10 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. आणखी पाच सन्माननीय सदस्यांना यावर विचार व्यक्त करायचे आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, पुरेसा वेळ दिला नाही तर मी विचार न मांडताच खाली बसतो. सभापती महोदय, 10 मिनिटात विचार मांडण्याचा प्रश्न नाही. सभापती महोदय, माननीय सभापती यांनी सुरुवातीला असे सांगितले होते की, तुम्ही तीन नावे द्यावीत. त्या पध्दतीने तुम्हाला संधी देण्यात येईल. असे सभापती महोदयांनी सांगितले होते.

सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. ही चर्चा येण्याचे कारण काय आहे. हे जास्त महत्वाचे आहे. एका आठवड्यापूर्वी कायदा व सुवस्थेची चर्चा सभागृहात झाली आहे. मुख्यमंत्री महोदय आम्ही मांडलेल्या मुद्यांचा आवेशाने समाचार घेतात. विधानपरिषदेत झालेल्या चर्चेतील काही मुद्दे घेऊन जसेच्या तसे उत्तर विधानसभेतील चर्चेला देण्यात आले आहे. आपण कार्यवृत्त काढून पहावे. मी हे आरोप करीत नाही मी स्वतः ते भाषण पाहिले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी आवेशाने बोलण्यास माझी हरकत नाही. प्रत्येक वाक्यातून त्यांचा असा सांगण्याचा प्रयत्न होता की, राज्यात कायदा व सुव्यवस्था किती भक्कम आहे. गेल्या आठवड्यात काय घडले आणि आज अश घटना आपल्या समोर येत आहेत, काही घटनांचा मी त्यावेळी उल्लेख केला होता. विरोधी बाकावर बसल्यावर आम्ही विरोधी आहोत म्हणून काही तरी बोलतो अशा प्रकारे त्याचा अर्थ लावून घेतला तर त्यातून आपणाला योग्य मार्ग काढता येणार नाही, असे माझे ठाम मत आहे. आम्ही सत्ताधारी पक्षात असताना कायदा व सुव्यवस्था, शेतकऱ्यांचे, कष्टकरी जनतेचे प्रश्न असतील तेव्हा आम्ही त्या विषयावर आमची मते मांडली होती. आमचे सरकार असले तरी आम्ही त्यांना जाब विचारला होता. त्याची उत्तरे घेतली होती. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, अनेक प्रश्न व अनेक घटनांचा उल्लेख आम्ही केलेला असताना मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरात त्या बाबींचा उल्लेख करण्यात आला नव्हता.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप..........

त्यांनी कन्व्हिक्शन रेट किती वाढलेला आहे हे त्यांच्या प्रत्येक उत्तराच्या भाषणातून सांगण्याचा प्रयत्न केला. कन्व्हिक्शन रेट वाढविण्यासाठी काय करावयास पाहिजे आणि काय नको, हे सर्व त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला आणि ते कदाचित योग्यही असेल. मी त्यावेळी ॲडिशनल कमिशनरचे उदाहरण दिले होते. आज ते एका पक्षाचे प्रवक्ते आहेत. त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे. त्यांचे नाव जैन आहे आणि त्यांनी पोलीस विभागातून आकडेवारी कशी दिली जाते हे वाहिन्यांवर सांगितले होते. त्यावेळी मी या संदर्भात मुद्दाम उल्लेख केला होता. पोलीस विभागाकडून जी आकडेवारी दिली जाते तशीच आकडेवारी मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणामध्ये दिली. ती आकडेवारी पोलीस विभागातून कशी दिली जाते हे त्यांनी वाहिन्यांवर सांगितले होते. मी या संदर्भात सभागृहात उल्लेख केला होता. आमची अशी अपेक्षा होती की, त्यावर काही तरी प्रकाश टाकला जाईल, त्याबाबत काही तरी बोलले जाईल. तुम्हाला राज्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे, हे मान्य न करुन कसे चालेल काय ? तुम्ही आकडेवारी द्याल, गर्जना कराल. परंतु, राज्यात खरी परिस्थिती काय आहे, हे तुम्ही आम्ही दररोज बघत आहोत.

सभापती महोदय, मागील काही वर्षात काय झाले त्या संदर्भात मी बोलत नाही. दिनांक 9 मार्च, 2015 रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले. आपल्या राज्याला परंपरा आहे, अनेक राज्यात आपल्या राज्याचा दबदबा आहे, ज्या राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे त्या राज्यात देखील आपल्या राज्याचा दबदबा आहे. ज्यावेळी अधिवेशन सुरु असते त्यावेळी पोलीस अतिशय दक्ष असतात. एखादी वाईट घटना घडून तो विषय सभागृहात उपस्थित होऊ नये आणि एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची गच्छंती होऊ नये किंवा पोलिसांवर ठपका ठेवला जाऊ नये, असे पोलिसांना वाटते. दिनांक 9 मार्च, 2015 पासून आज पर्यंत घडलेल्या काही घटना मी आपल्याला सांगणार आहे. खून, बलात्कार, खंडणी मागणे, फायरिंगच्या घटना, ज्येष्ठ नागरीकांना मारणे, लोकप्रतिनिधींनी बलात्कार केल्याच्या घडलेल्या घटनांचा त्यामध्ये समावेश आहे. तरी देखील आपण सांगणार की, महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था चांगली आहे आणि आम्ही ते ऐकून गप्प बसावयाचे ? राज्यातील कायदा व सुव्यवस्था एवढी चांगली आहे तर मग अधिवेशन कालावधीत अशा घटना का घडल्या ?

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप..........

सभापती महोदय, आपल्या राज्याने पथदर्शी कायदा बनविलेला आहे. आपण अंधश्रद्धा निर्मूलन कायदा संमत करुन स्वतःची पाठ थोपटवून घेतली. राज्यात मागील 6 महिन्यात 14 नरबळीच्या घटना घडलेल्या आहेत. प्रत्येक महिन्याला 2 ते 3 नरबळीच्या घटना घडतात. तरी देखील आम्ही म्हणावयाचे की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली आहे ? मग तुम्ही त्यांना मेडल कसे देणार आहात ? राज्याचे प्रमुख, माननीय मुख्यमंत्री हे गृहमंत्री म्हणून जर त्यांचे समर्थन करीत असतील तर यासारखी वाईट गोष्ट असूच शकत नाही. आपण सांगत आहात की, कन्व्हिक्शन रेट वाढलेला आहे. आम्ही त्याचे स्वागतच करु. कन्व्हिक्शन रेट वाढला ही चांगली गोष्ट आहे. मागील 4 महिन्यात गुन्हेगारांना शिक्षा देण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे काय, असा प्रश्न मी त्यावेळी देखील उपस्थित केला होता. गुन्हेगारांना शिक्षा देण्याच्या प्रमाणात वाढ झाली असेल तर ती चांगली गोष्ट होती. परंतु, गुन्हेगारांना शिक्षा देण्याचे काम तुमच्या हातात कोठे आहे ? तो न्यायालयाचा भाग आहे. तुम्ही पोलिसांना प्रोत्साहन दिले, पोलिसांनी चांगल्या केसेस प्लीड केल्या, मागील 4 महिन्यात कन्व्हिक्शन रेट 10 टक्क्यांवरुन 29 टक्के झाला, हे आम्ही काही अंशी मान्य करु. परंतु, स्वतःची पाठ थोपटून घेताना तुमच्या नाकाखाली, तुमच्या घराजवळ, तुमच्या नागपुरात जे काही घडले त्याची जबाबदारी तुम्ही घेणार नाही आणि जबाबदारी घेता येत नसेल तर तुम्ही फक्त स्वतःची पाठ थोपटून थांबत असाल तर या राज्यातील नागरीक आता थांबणार नाहीत.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात अक्कू यादवचा उल्लेख केला. त्याचे समर्थन अजिबात होत नाही. महिलांनी न्यायालयात घुसून मिरचीची पूड टाकून त्याला मारले. महिलांनी त्याला का मारले, हे महत्वाचे आहे. ही घटना जरीपटका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आहे. महिलांनी त्याला का मारले ? महिलांवर अन्याय अत्याचार होत होते, त्याला अजिबात पायबंद घातला जात नव्हता. म्हणून महिला न्यायालयात घुसल्या आणि त्याला मारले. मी याचे समर्थन करणार नाही. परंतु, अशा घटना घडत असताना देखील आम्ही म्हणणार की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली आहे. मग तुम्ही त्यांना कशा प्रकारे मेडल देणार आहात ?

..3...



श्री.भाई जगताप..........

उद्या या घटनेमुळे सभागृहात गदारोळ होईल याची तुम्हाला कल्पना होती. म्हणून तुम्ही त्या जेलच्या श्री.कांबळे नावाच्या अधीक्षकाला निलंबित केले. झाले संपले, तुमची जबाबदारी नाही ? तुम्ही विरोधी बाकावर बसलेले असताना स्व.आर.आर.पाटील साहेबांना उद्देशून अनेक वेळा कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याबाबतचे उदाहरण दिले. आम्हाला एका अधिवेशनात हे 100-200 वेळा ऐकावयास मिळाले. राजीनामा द्यावा, राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात येत होती. आम्ही आता आज ती मागणी करीत आहोत. मुख्यमंत्री महोदय, तुमच्या कार्यक्षमतेबद्दल आमच्या मनात शंका नाही. परंतु, आज तुम्ही ज्या पद्धतीचा कारभार चालविला आहे, विशेषत: गृह विभागाचा, हा कार्यभार तुमच्याकडून चालविला जात नाही. म्हणून मी मघाशी म्हटले की, दिनांक 9 मार्च, 2015 पासून आज पर्यंत म्हणजे दिनांक 1 एप्रिल, 2015 पर्यंतच्या कालावधीत काय घडले हे मी सांगत आहे. 4 वर्षापूर्वी काय घडले हे मी सांगत नाही. तरी देखील तुमचे टाईप केलेले भाषण येत असेल तर यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. आम्ही मागील वेळी येरवडा जेलमधील घटनेचा उल्लेख केला होता. 2,500 कॉल्स करण्यात आले हाते. एक गुन्हेगार जो अंडा सेलमध्ये आहे, ज्याला आपण थर्ड डिग्री म्हणतो, जे खतरनाक कैदी आहेत अशा कैद्यांना अंडा सेलमध्ये ठेवले जाते आणि ते तेथून पळून जातात ? तरी तुम्ही राज्यात कायदा व सुव्यवस्था किती चांगली आहे हे आम्हाला सांगण्याचा प्रयत्न करणार आहात ? मी किती सक्षमपणे हे खाते सांभाळत आहे, असे तुम्ही महाराष्ट्रातील जनतेला सांगणार आहात ? हे चालणार नाही ? लोकशाहीमध्ये आमचा हक्क आहे. तुमच्या विभागाचे मंत्री तुम्ही ठरवावेत. परंतु, अशा पद्धतीने त्यांच्यावर अनेक विभागांचे प्रेशर असेल, दबाव असेल तर त्यांनी या विभागाचा राजीनामा दिलाच पाहिजे, अशी आमची मागणी आहे, आग्रह आहे. तुमच्या विभागाचे मंत्री तुम्ही ठरवावेत. परंतु, तुमच्या गलथान कारभारामुळे राज्यात दिवसाढवळ्या खून होत असतील, दरोडे पडत असतील, बलात्कार होत असतील, लहान मुलांना पळवून नेले जात असेल, खंडणीसाठी त्यांना मारले जात असेल तर मात्र तुम्हाला हे खाते चालविण्याचा तिळमात्र अधिकार नाही, असे मला निक्षून सांगावेसे वाटते. मी मघाशी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सांगितल्याप्रमाणे 2,500 कॉल्सचा मुद्दाम पुन्हा उल्लेख करतो. कारण, मागील वेळी जी कायदा व

..4...



श्री.भाई जगताप..........

सुव्यवस्थेची चर्चा झाली त्या चर्चेला दिलेल्या उत्तराच्या वेळी त्याची साधी नोंद देखील घेतली गेली नाही. मला असे वाटते की, कालच्या नागपूरच्या घटनेमुळे आता नवीनच प्रेज तयार होईल. आज आपण राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. श्री.टकले साहेब, काय होईल याची आपल्याला कल्पना आहे काय ? काही द्या आणि सुरक्षा, असे होईल. त्या जेलमधील शिपाई मीडियासमोर उघडपणे माहिती सांगत होता. त्या पोलीस शिपायाची किती हिम्मत ? आता हे काय करतील ? त्या शिपायाला निलंबित करतील. तुम्हाला असे करता येणार नाही. तुम्ही स्वतःचे अधिकार वापरुन त्या गरीब शिपायाचा बळी देणार असाल तर ते चालणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी एक उदाहरण दिले. त्यावेळी ते गृह राज्यमंत्री होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार साहेबांनी कलम 311 नुसार कारवाई करुन 11 लोकांना डिसमिस केले. कारण, कलम 311 मध्ये तसे प्रावदान आहे. मुख्यमंत्री महोदयांनी असे पाऊल का उचलले नाही ? मुख्यमंत्री महोदयांना हे कलम माहीत नाही काय ? आमचे मुख्यमंत्री अतिशय सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित, अतिशय ज्ञान असलेले आहेत आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे. आम्ही विरोधी बाकावर बसलेलो असलो तरी आपण सर्व या सिस्टिमचे सहकारी आहोत. विधिमंडळात या विषयावर चर्चा होणार आहे याची आपल्याला माहिती नव्हती काय ? आम्ही दडपून काहीही करु, हे चालणार नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

आज आपल्याकडे आधुनिक टेक्नॉलॉजी आहे. 2500 कॉल्स ट्रॅप करता आले असते. माझा स्पष्ट आरोप आहे की, जास्तीत जास्त संघटित गुन्हेगारी ही जेलमधून चालविली जाते. आपल्याकडे असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करुन हे 2500 कॉल्स ट्रॅप का केले नाहीत? त्यामुळे कळले असते की कोणत्या डॉनबरोबर कोण बोलत आहे. परंतु शासनाला ते करायचे नाही. आज आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये दादागिरी सुरु आहे. त्यांच्यामध्ये गँगवार सुरु आहे. दोन दिवसापूर्वी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी या मुद्याबाबत अजिबात उल्लेख केला नाही. केवळ अंगुलीनिर्देश करुन चालणार नाही. निवृत्त आयपीएस अधिकारी जे.एफ.रिबेरो यांचे नाव आज मुद्दाम घ्यावे लागेल. ठाण्यामध्ये बजबजपुरी माजली होती, क्राईम रेट वाढला होता, गुंडांची दादागिरी वाढली होती. ठाण्याचे प्रतिनिधीत्व करणारे मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांना याची पूर्ण कल्पना आहे. एक व्यक्ती किती बदल घडवू शकतो हे जे.एफ.रिबेरो यांनी दाखवून दिले. निवृत्त पोलीस अधिका-यांमध्ये इनामदार, रिबेरो, मोडक, राजाध्यक्ष यांचा निश्चितपणे उल्लेख करावा लागेल. हे अधिकारी म्हणजे गुन्हेगारांना आपले कर्दनकाळ वाटत होते. आज आयपीएस अधिकाऱ्यांवर त्यांच्याच महिला सहकारी आरोप करीत आहेत. त्यांना अटक झाली. कुठे घेऊन जाणार आहात आमचा महाराष्ट्र. कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करताना फक्त विरोधक म्हणून आम्ही काहीतरी बोलतो, आरोप करतो अशा अविर्भावात उत्तर दिले जाणार असेल, आम्ही मांडलेल्या मुद्यांबाबत उत्तर दिले जाणार नसेल तर 'काय द्या आणि सुरक्षा घ्या' अशी परिस्थिती या राज्यामध्ये आली आहे असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरु नये.

सभापती महोदय, कायद्याचे धिंडवडे निघत असताना गृह विभागाचे प्रमुख आपण त्या गोष्टीचे समर्थन करता त्यावेळी यांची हिंमत वाढते. पोलिसांच्या अडचणीबाबत नक्की विचार झाला पाहिजे. ज्याच्या बाबतीत आम्ही नेहमी बोलतो. पोलिसांच्या काही समस्या आहेत. 25-25 वर्षाची जूनी वाहने आहेत. साधे चोर, डॉन आधुनिक वाहनातून पळून जातात, पाठलाग करताना पोलिसांची वाहने मागे पडतात. पोलिसांच्या घराचा प्रश्न आहे. त्यांच्या भत्त्याबाबतचा प्रश्न सोडविला त्याबद्दल आम्ही स्वागत केले आहे. परंतु त्यांच्या जबाबदारीबद्दल तुम्ही विचारणा करणार की नाही? केवळ लिपापोती करुन अमुक रेट वाढला, तो रेट वाढला हे सांगण्याचा प्रयत्न होतो. काल मुंबईमध्ये दहावीत शिकणाऱ्या मुलाचे लैंगिक शोषण केल्याची घटना समोर आली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

आहे. तो मुलगा तक्रार करण्यासाठी आई वडिलांसमवेत पोलीस ठाण्यात गेला तेव्हा तक्रार दाखल करुन घेण्याऐवजी शहानिशा करु, नंतर बघू असे सांगण्यात आले. दहावीच्या वर्गातील मुलगा काय सांगतो त्याबद्दल चौकशी करुन कारवाई करणार नाही का? आज वृत्तपत्रात बातमी आल्यानंतर लगेच उत्तर दिले जाईल की, अटक करण्यात आली असून जाब जबाब घेण्यात आला आहे, कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारे गुन्हेगारांची हिंमत वाढत असेल तर त्यांना हिंमत कोण देतो? सरकार देत आहे, तुमचे खाते देत आहे. आमचा या गोष्टीला विरोध आहे म्हणून आमचे म्हणणे आहे की, तुम्ही राजीनामा द्या.

सभापती महोदय, गृह खात्यासाठी स्वतंत्र मंत्री नेमण्यात यावा. ज्या मंत्र्यांना फक्त आणि फक्त याच खात्याची धुरा बाळगता येईल. 24 तास अलर्ट रहावे लागेल. राज्यभरात केव्हाही काहीही घडू शकते. दुर्दैवाने होत आहे. जरीपटका पोलीस ठाण्याबाबत काय म्हणावे? भरदिवसा दुपारी 12.00 वाजता फायरिंग झाले. तलवारी, बंदुका घेऊन आले आणि 12 राऊंड फायर केले. त्यात काय विशेष आहे हे मला कळले नाही. त्यांचा मतदारसंघ हेच विशेष आहे. गेल्या तीन महिन्याच्या काळात नागपूरमध्ये ज्या ज्या घटना घडल्या त्यापैकी जास्तीत जास्त घटना मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात घडल्या हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. आज या ठिकाणी उत्तर देत असताना गुळमुळीत उत्तर आम्ही अजिबात ऐकणार नाही. आम्ही ज्या ज्या घटनांचा उल्लेख केला आहे त्याबाबत समर्पक उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, मागच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावरील चर्चेला मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते त्याची प्रत माझ्याजवळ उपलब्ध आहे. योगायोग म्हणायचा की दैवदुर्विलास हे मला कळत नाही. गेल्या आठवडाभरात ज्या घटना घडल्या ते प्रश्न या ठिकाणी चर्चेला आले म्हणून कायदा व सुव्यवस्थेवर बोलण्याची आम्हाला संधी मिळाली. दिनांक 9 मार्च ते 1 एप्रिल, 2015 पर्यंत ज्या घटना घडल्या त्याचा मी उल्लेख करु इच्छितो. नंतर असे म्हणू नये की 15 वर्षाच्या काळात काय झाले, त्या वर्षात काय झाले? कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने जे अयोग्य झाले त्याचे समर्थन अजिबात होणार नाही. तेव्हाही झाले नाही, आजही होणार नाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि भविष्यात सुध्दा करणार नाही. माननीय सदस्यांनी सांगितले की, गुंडांना जात नसते, धर्म नसतो. गुंडगिरी प्रवृत्ती ठेचून काढली पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. पळवाटा काढू

..3...



श्री.भाई जगताप....

नका. तुम्ही सक्षमपणे सांगा. पोलीस खात्याला तुमची भीती वाटली पाहिजे. खात्यातील सगळया लोकांना तुमची भीती वाटली पाहिजे. त्यांना याची जाणीव झाली पाहिजे की, हे घडले नाही तर आपल्यावर कारवाई होईल.

**तालिका सभापती** : आपले भाषण सुरु होऊन 20 मिनिटे झाली आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ही गोष्ट मी मान्य करतो. मी दोन्ही सभागृहात वावरलेलो आहे. नियम 97 अन्वये चर्चा घेतली असल्याने माझ्या लक्षात आले आहे. परंतु महत्वाच्या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा होत असताना ती पाच-पाच तास चाललेली आहे.

**तालिका सभापती :** ही चर्चा मान्य होत असताना सर्व गटनेत्यांनी मान्य केले होते की, निश्चित वेळेत चर्चा संपवावयाची आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी 10 मिनिटांपेक्षा अधिक वेळ बोलू नये असे अपेक्षित आहे. आपले भाषण सुरु होऊन 20 मिनिटे झाली आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला याठिकाणी मुद्दाम सांगितले पाहिजे. 9 मार्च ते 1 एप्रिलपर्यंत 20 ते 21 दिवस उलटून गेले आहेत. या काळात राज्याच्या विविध जिल्हयांमध्ये, शहरांमध्ये जवळजवळ 42 गुन्हे घडले आहेत. तरी सुध्दा आपण म्हणता की, सर्व काही आलबेल आहे. All is well करायचे आणि आम्ही पुढे जायचे. महिलांच्या बाबतीत आज जे काही घडत आहे, छोट्या मुलांच्या, वरिष्ठ नागरिकांच्या बाबतीत जे काही घडत आहे त्याबद्दल आम्ही बोलायचे नाही? आम्ही बोलल्यानंतर तुम्ही अजिबात उत्तर द्यायचे नाही आणि आकडेवारी समोर टाकून सांगायचे की, All is well. हे चालणार नाही.

नंतर 2जे.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

नागपूर येथे दिवसाढवळ्या झालेला गोळीबार, 30 मार्च रोजी एका 45 वर्षीय महिलेवर झालेला सामुहिक बलात्कार, 29 मार्च रोजी रामनवमीच्या दिवशी झालेली दगडफेक, 23 मार्च रोजी झालेला विवाद, पनवेल येथे चर्चवर झालेली दगडफेक व त्यानंतर झालेला उद्रेक, 21 मार्च रोजी नगर जिल्ह्यातील राहाता येथील श्री.चंदन विठ्ठल लूटे या व्यापाऱ्याच्या मुलाचे अपहरण करून 30 लाख रूपयाची खंडणी वसूल करण्याची झालेली घटना, बीजीपी तालुका उपाध्यक्ष याचा 19 मार्च रोजी झालेला खून यासंबंधातील कोणतेही आरोपी अजून पर्यंत पकडलेल गेलेले नाहीत. या पक्षात काय झाले, त्या पक्षात काय झाले, 15 वर्षात काय झाले या तपशीलात जाणार नाही. पण पोलीस त्यांच्या कामात कुचराई करत आहेत हे मात्र थांबायला पाहिजे. 20 मार्च रोजी वाळू माफियांनी तहसीलदावर हल्ला केल्यामुळे सर्व तहसीलदारांनी पोलीस संरक्षणाची मागणी केली आहे. 19 मार्च रोजी प्रांत अधिकाऱ्याला वाळू माफियांनी धमकी दिली होती. मी गेल्या 15 वर्षात, 4 महिन्यात काय घडले याचा उल्लेख केलेला नाही. आपले अधिवेशन 9 मार्च पासून सुरू झाले. तेव्हा आजपर्यंत एकूण 42 घटना घडल्या असून त्यापैकी मी पंधराच घटनांचा उल्लेख केला आहे. याची जबाबदारी गृहमंत्री म्हणून घेणार नाहीत काय ? खरे म्हणजे आपण पोलिसांचे कान उपटायला पाहिजे. मी सागरी सुरक्षेवर बोललो नाही. येथे बोलण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. ते जर बोलायला गेलो तर अडीच-तीन तास कमी पडतील. काल कारागृहातून आरोपी पळून गेले आहेत. एकीकडे आपण कन्व्हीक्शनचा रेट वाढला आहे असे सांगत आहात. त्याचे मी स्वागत केले करतो. पण कन्व्हीक्टेड झालेलेच बंदी आज पळत आहेत. हे सर्व सराईत अट्टल गुन्हेगार आहेत. यासंबंधी शासनाचे उत्तर येईल की, कैदी पलायनामध्ये महाराष्ट्राचा सहावा क्रमांक आहे. पण मी येथे उल्लेख केला असल्यामुळे मंत्री महोदयांच्या उत्तरात देखील हेच सांगण्यात येईल. कारण सर्व उत्तर हे आकडेवारीवर चालते. आपल्याला आकडेवारी अवलंबून राहता येणार नाही. आज जे काही घडत आहे त्याच्या मुळाशी जायला हवे. 24 तासात काही तरी जादू होईल अशी अपेक्षा देखील आपल्याकडून नाही. सरकार प्रोॲक्टीव्ह होऊन काही तरी करत असेल तर त्याबाबतीत जाब विचारण्याचा आमचा अधिकार आम्ही शाबूत ठेवतो. कैद्यी पलायनाचा प्रकार जवळ जवळ 140



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

कैद्यांनी पाहिलेला आहे. त्यामुळे या कारागृहातील अधिकाऱ्यांना संविधानाच्या अनुच्छेद 311 अनुसार टर्मिनेट करणार आहात काय असा माझा सवाल आहे. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह मंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशा प्रकारची मागणी करतो आणि थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.............

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विद्या चव्हाण यांनी भाषणास सुरूवात करावी. त्यांनी आपले विचार अत्यंत थोडक्यात मांडावेत.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नेहमीच थोडक्यात विचार मांडत असते. मी जास्त वेळ बोलणार नाही.

**तालिका सभापती** : तरी देखील जाणीव करून देणे हे माझे काम आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, महिला सदस्य म्हणून आपण मला माझे विचार मांडू द्यावेत.

सभापती महोदय, नियम 97 अन्वये जी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

मी तत्कालीन विरोधी पक्ष नेते व विद्यमान शिक्षण मंत्री श्री.विनोदजी तावडे यांच्या तसेच सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणाचे उतारे आणले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नगरमध्ये एका महिलेवर अत्याचार झाले आहेत. त्यासंबंधीचा विषय आम्ही कालच्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेत नमूद केला होता. आता आपण कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करीत आहोत. त्यामुळे तो विषय देखील याला जॉईंट होऊ शकतो. हे दोन्ही विषय संयुक्त आहेत. त्यामुळे आपण महिलांना थोडा अधिक वेळ द्यावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती :** आपण सर्वच सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत. जेणे करून सर्वांना न्याय देता येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी येथे माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे जेव्हा विरोधी पक्षात होते त्यावेळच्या भाषणातील चार ओळी आपल्याला वाचून दखविते. राज्यातील गृह खाते अतिशय अकार्यक्षपणे काम करीत आहे. वारंवार घोषणा करून जनतेला

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

दिलासा दिला जाईल असे सांगितले जाते. आज राज्यामध्ये कोण सुरक्षित आहे, राज्यातील जनतेला असुरक्षित वाटते आहे, आज नागरी भागातील महिला सुरक्षित नाहीत, म्हातारे लोक सुरक्षित नाहीत, पोलीस कर्मचारी देखील सुरक्षित नाहीत. असे माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी म्हटले आहे. गुन्हेगाराला पकडून त्याला अटक करण्यामध्ये शासनाला अपयश येत आहे असे देखील म्हटले आहे. त्याच प्रमाणे श्रीरामपूर येथे दलित महिलेवर झालेला अत्याचार आबांच्या आशीवार्दाने झाला असे देखील त्यांनी म्हटले आहे. माझ्याकडे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे देखील भाषण आहे. माननीय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे हे तर या सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते देखील होते. त्यांचे भाषण वाचून दाखविले तर त्यातच माझा संपूर्ण वेळ संपून जाईल. महिला म्हणून मला एका गोष्टीची खूप चीड येते. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील सूचनेवर आम्हाला बोलण्यास अनुमती द्यावी अशी आम्ही मागणी केली होती. त्यावेळी माननीय मंत्री श्री.गिरीश बापट म्हणाले की, हे सर्व प्रसिद्धीसाठी करण्यात येत आहे. हे आम्ही प्रसिद्धीसाठी करीत नाही. आपण पुरुष आहात म्हणून असे बोलू शकता. आम्ही स्त्रिया आहोत. बलात्काराचे दु:ख त्या महिलेला काय होत असेल त्याची तीव्रता आम्हालाच कळू शकेल. ती पुरुषांना कळणार नाही. आज लहान लहान मुलींवर अत्याचार होत आहेत, त्यांचे खून होत आहेत. परवा मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर अत्यंत संतापजनक होते. लोणावळा येथे सात वर्षाच्या मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आली. तिच्या आई-वडिलांवर काय ओढवले असेल याचा आपण विचार करावा. मुख्यमंत्री सांगतात की, खुनी ट्रेस झाले आहेत. ते दोन-चार दिवसात मिळतील. दोन-चार दिवस उलटून गेले आहेत. आपल्याला खुनी मिळाले आहेत काय ?माननीय मुख्यमंत्र्यांनी एक तास भाषण केले. आमचे आदरणीय नेते कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या हत्येचा त्यांनी उल्लेख देखील केला नाही. पंपाने डास मारावा असे आपण लोकांना समजतात की काय ? माननीय मुख्यमंत्र्यांकडे गृह खाते आहे. आम्ही सनातनी लोकांवर संशय व्यक्त केला आहे. तशी चर्चा खुलेआम माध्यमांमध्ये आहे. who killed karkare ? या कार्यक्रमात कॉ.पानसरे यांना सनातनांनी धक्काबुक्की केली. त्याची चौकशी आपण का केली नाही असा प्रश्न विचारला

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

होता. त्याचे त्यांनी उत्तर देखील दिलेले नाही. एवढे भयंकर चालले आहे. हे आम्ही प्रसिद्धीसाठी करीत नाही. मी 30 वर्षापूर्वी फार मोठी आर्टिस्ट होती. मी प्रसिद्धीच्या क्षेत्रात गेली असते तर कुठल्या कुठे पोहोचली असती. मला प्रसिद्धी आणि पैशाची काहीही कमी नव्हती. सभागृहात येऊन प्रसिद्धीसाठी काहीच करीत नाही. आम्ही महिला आहोत. आम्हाला महिलांवरील अत्याचाराची तीव्रता जाणवते. काल टीव्ही वर कळवा येथील घडलेल्या घटनेबद्दल आईला प्रश्न विचारण्यात येत होते. आई सांगत होती की, महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस शिपाई यांनी मुलीला प्रश्न विचारले होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण .....

त्या प्रश्नांचा उच्चार या सभागृहात करणे मला शक्य होणार नाही. महिला पोलीस अधिकारी बलात्कारीत मुलीला अशा प्रकारे प्रश्न विचारु शकतात ? असे असताना त्या महिला पोलीस अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. या महिला पोलीस अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई अद्याप का झाली नाही ? महिलेला सुध्दा पीडित महिलेच्या संदर्भात अशा प्रकारे प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही. ही मुलगी जेव्हा घरी आली तेव्हा त्या मुलीने आपल्या आईला सांगितले की, आई मला सुंदर दिसावयाचे नाही, माझे केस कापून टाक. त्या मुलीचे केशवपन करण्यात आले. या घटना बिहार, उत्तर प्रदेश राजयात नाही तर महाराष्ट्रात घडत आहेत. कॉ.पानसरे यांनी सांगितले होते की, या महाराष्ट्राला तुम्ही आता पुरोगामी महाराष्ट्र म्हणू नका. असे म्हणताना त्यांना किती दु:ख झाले असेल. मुख्यमंत्री साहेबांच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य किंवा त्यांच्या कपाळावर या विषयाच्या संदर्भात एक रेष सुध्दा उमटलेली नाही. या घटनांमुळे एखाद्या माणसाची झोप उडाली असती. आम्हाला मुख्यमंत्री महोदयांकडून खूप अपेक्षा होत्या. आपण मुख्यमंत्री झाल्यानंतर आम्ही तुमची आई, पत्नी यांची मुलाखत बघितली. तुमच्या छोट्या मुलीला शाळेत घेऊन जातानाचे फोटो आम्ही वर्तमानपत्रात बघितले होते. ती मुलाखत बघून महिलांना न्याय मिळेल असे आम्हाला वाटले होते. परंतु आज राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. असे असताना आम्ही प्रसिध्दी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत. हे सर्व पाहून आमचे रक्त खवळते. महिलांवर जे अत्याचार होत आहेत ते तातडीने थांबवले पाहिजेत. ठंडा ठंडा कुल कुल होऊन चालणार नाही. आम्ही तुम्हाला ठंडा ठंडा कुल कुल होऊ देणार नाही, आमचे रक्त तापले आहे. मी सर्व आमदारांना सांगते की, मुख्यमंत्र्यांनी जर महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना, कॉ.पानसरे यांच्या मारेकऱ्यांना अद्याप पकडण्यात आलेले नाही, नागपूर येथील कारागृहातून कैदी फारार झालेले आहेत त्यांना आणि इतर ज्या घटना घडलेल्या आहेत त्या घटनांमधील आरोपींना अधिवेशन संपल्यानंतर 10 दिवसात अटक केली नाही तर आम्ही सर्व मुख्यमंत्री महोदयांच्या दालनाबाहेर बसून त्यांच्या राजीनाम्याची मागणी

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण .....

करु तुम्हाला जर गृह विभाग सांभाळता येत नसेल तर तो विभाग तुम्ही तुमच्याकडे घेऊ नका. तुमचे मंत्री कमरेला पिस्तुल लावून फिरतात. मंत्र्यांना कसली भिती वाटते ? महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहिली नाही म्हणूनच तुमचे मंत्री कमरेला पिस्तुल लावून फिरतात असाच त्याचा अर्थ होतो. आता महिला सुरक्षित नसल्यामुळे महिलांनाही एक एक पिस्तुल दिले तर त्या स्वत:चे संरक्षण करु शकतील. मंत्री त्यांच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी जवळ पिस्तुल बाळगतात. मग या महिलांचे रक्षण कोण करणार आहे ? हे जे काही चालले आहे ते भयंकर आहे.

सभापती महोदय, सर्वात चीड आणणारी घटना म्हणजे अहमदनगर येथे हरिनाम सप्ताहाचा हिशोब मागणाऱ्या महिलेच्या घरावर हल्ला करण्यात आला. महिलेच्या तरुण मुलांना बेदम मारहाण करुन त्यांना डांबून त्या महिलेवर अत्याचार करण्यात आले. अशा प्रकारच्या घटनांमुळे आम्हाला खूप दु:ख होते आहे.

सभापती महोदय, शाळेतील शिक्षीका सुध्दा आता सुरक्षित राहिलेल्या नाहीत. राहुरी येथील गट शिक्षणाधिकारी श्री.बाळासाहेब दानवे यांच्या विरोधात महिलांनी तक्रारी केलेल्या आहेत. आता या शिक्षीकांनी महिला आयोगाकडे सुध्दा तक्रार केली आहे. या विषयाच्या संदर्भात 500 शिक्षक उपोषणला बसलेले आहत. ती व्यक्ती राहूरी येथे गट शिक्षणाधिकारी म्हणून काम करीत असून ती व्यक्ती महिलांचा लैंगिक छळ करते. असे असताना या गट शिक्षणाधिकाऱ्यावर आपण कोणती कारवाई केली ?

सभापती महोदय, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. प्रशांत मोहोळ, पंचायत समिती नरखेड यांच्या विरोधात असंख्य तक्रारी करुन सुध्दा संबंधितावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. उलट त्याला प्रमोशन देण्यात आलेले आहे. असे अत्याचार होत असल्याचे महिला सांगत असताना त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक असताना त्याला तुम्ही प्रमोशन देता ? तुमचे मंत्री कमरेला पिस्तुल लावून फिरणार असतील तर ते आम्ही खपवून घेणार नाही.

सभापती महोदय, बीड येथील केज येथे स्त्रीभ्रूण हत्येचे आरोपी असलेले डॉ.अशोक थोरात यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून या संदर्भात पोलिसांनी जी कारवाई केलेली आहे त्या संदर्भात

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण .....

न्यायालयाने पोलिसांनी जी केलेली कारवाई केलेली आहे ती अत्यंत योग्य आहे, असे सांगितलेले आहे. आता ते जामिनावर मुक्त आहेत. असे असताना आमच्या महिला बालकल्याण मंत्री त्यांच्या सोबत फिरतात ? या डॉक्टरांना वैद्यकीय अधिक्षक पदावर पुन्हा रूजू करुन घेण्यात आले असून त्यांच्या विरोधात न्यायालयात साक्ष देणाऱ्या व्यक्तींवर यामुळे दबाव येणार नाही ? त्यांच्यावर तुम्ही काहीही कारवाई करणार नाही ? महिला व बाल कल्याण मंत्री संबंधित आरोपी डॉक्टरचे अशा प्रकारे समर्थन करीत असतील तर स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात आम्ही काय बोलावयाचे ? हे सरकार कोठे आणि कसे चालले आहे, हे यावरुन दिसून येते.

सभापती महोदय, गोरेगाव येथे एका मुलीला जीवंत जाळण्यात आले.शेजारच्या लोकांनी या संदर्भात साक्ष दिली. परंतु त्या संदर्भात अजून काहीही कारवाई झालेली नाही. या ज्या घटना घडत आहेत त्या संतापजनक असून चीड आणणाऱ्या आहेत. महिलांचा आणि मुलींचा सन्मान करणे तर दूरच राहिले. आम्हाला आमच्या घरामत सुखाने जगण्याचा अधिकार मिळणार आहे की नाही ? कायदा आणि सुव्यस्थेची जबाबदारी पोलिसांनी राखावयाची असताना महाराष्ट्रातील पोलीस कमिशनर काय करीत आहेत. या घटनांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री उत्तर देखील देत नाहीत. कायदा व सुव्यवस्थेवर एवढयासाठी चर्चा उपस्थित करण्यात आली की, तुम्ही आमच्यावर आरोप करुन सत्तेवर आला आहात. तुमच्या राज्यातील महिला सुरक्षित कशा राहतील यासाठी कायदा व सुव्यवस्था पुर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करावा, अशी मी अपेक्षा व्यक्त करते. असे जर झाले नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांना एकत्र येऊन वेगळे आंदोलन उभे करावे लागेल. या गुन्हेगांराना तातडीने अटक करावी, अशी मी सरकारकडून अपेक्षा करीत आहे. आपल्याकडे न्यायालय, जलद न्यायालयांची संख्या खूप कमी आहे. त्यामुळे महिलांच्या संदर्भातील प्रश्न सोडवण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी काही तरी प्रयत्न करावेत, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती पुर्णपणाने ढासळलेली आहे. हा विषय उपस्थित झाला तो नागपूर येथील घटनेच्या संदर्भात असून नागपूर आता गुन्हेगारांची राजधानी बनली आहे. एकेकाळी संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याचा कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत नावलौकीक होता. अगोदरच्या काळात गृहविभागावर शासनाचा जो वचक होता तो वचक आता बिलकूल राहिलेला नाही. गृह विभागावर शासनाचा जो धाक असावयास पाहिजे तो मुळीच राहिलेला नाही. नागपूरच्या तुरुंगातून कैदी पळून जातात. मुख्यमंत्र्यांच्या नागपूरमध्ये, मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघाच्या आजुबाजूला गेल्या 15 दिवसात ज्या घटना घडल्या त्या खरोखर क्लेशदायक आहेत. महाराष्ट्रात आता रोज लहान मुलांवर, महिलांवर अत्याचार होत आहेत. लहान मुलींवर केवळ बलात्कारच नाही तर बलात्कार करुन त्या मुलींचा खून केला जातो आणि असे प्रकार आता वारंवार होत आहेत. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास असे शब्द आपण वापरतो, तेव्हा राज्यात कायदा आणि सुव्यवस्था चांगली असली पाहिजे. या शासनाकडून आमच्या खूप अपेक्षा होत्या. हे सरकार नवीन आहे. माननीय मुख्यमंत्री तरुण आहेत, ते अभ्यासू आहेत असे चित्र रंगवण्यात आले होते. परंतु ते चित्र सपशेल फेल ठरले आहे. माननीय मुख्यमंत्री तर सपशेल नापास झालेले आहेत.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.....

सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांकडेच गृह विभागाचा कार्यभार असावा अशी एक नवीन प्रथा राज्यामध्ये पडली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनात एका महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना सदनात एकही कॅबिनेट मंत्री नसावा हे दुर्दैव आहे.

**तालिका सभापती** : कॅबिनेट मंत्री सभागृहात येतीलच, तोपर्यंत सन्माननीय सदस्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु ठेवावे.

(कॅबिनेट मंत्री सभागृहात प्रवेश करतात. )

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, फेब्रुवारी, 2015 मध्ये लोणावळा येथील कुमार रिसॉर्टवर एका सात वर्षीय मुलीवर बलात्कार होऊन तिचा खून करण्यात आला. महाराष्ट्राला लाजवणारी ही घटना आहे. आज राज्यातील महिलांवर रोज अत्याचाराच्या घटना घडत आहेत आणि त्याबाबत राज्य शासन गंभीर दिसत नाही.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने उत्तर देताना मागील पंधरा वर्षात काय घडले, इतर राज्यांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण किती आहे, त्या तुलनेत आपल्या राज्यात गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे, असे काही न सांगता आपण कोणती ठोस उपाययोजना करणार आहात याची माहिती द्यावी. महाराष्ट्राची कोणत्याच राज्याबरोबर तुलना होऊ शकत नाही. महाराष्ट्राचा एक नावलौकिक आहे. महाराष्ट्रातील पोलिसांचा एक नावलौकिक होता. महाराष्ट्रात आजवर जे गृहमंत्री झाले त्यांचा गुन्हेगारांवर एकप्रकारचा धाक व वचक होता. परंतु या सरकारचा गुन्हेगारांवर कोणताही वचक राहिलेला नाही. राज्यात रोज वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे घडत आहेत.

सभापती महोदय, आज राज्यात मोठ्या संख्येने सायबर गुन्हे घडत आहेत. एमएमएस आणि फेसबुकच्या माध्यमातून भावना भडकाविल्या जात आहेत. दोन दिवसांपूर्वी माझ्या मोबाईलवर एक अननोन नंबर आला, मी तो कॉल रिसीव्ह केला. मला मोबाईलवर टेप केलेले संभाषण ऐकायला मिळाले. ते संभाषण मी येथे सांगू शकत नाही. तो परदेशातून कॉल होता आणि टेप केलेले संभाषण हिंदी भाषेत होते. ते संभाषण लोकांच्या भावना भडकाविणारे होते. आज

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.....

अशाप्रकारच्या संभाषणाद्वारे, आक्षेपार्ह चित्राद्वारे लोकांच्या भावना भडकाविल्या जात आहेत. जाती धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वेगवेगळ्या धर्मांमध्ये आग लावण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि हे सर्व प्रकार भाजप आणि शिवसेना पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यापासून जास्त घडत आहेत. हे सरकार आपल्या पाठीशी आहे असे गुन्हेगारांना वाटत आहे. आपण काहीही केले, लोकांच्या भावना भडकाविल्या तरी चालू शकते, असे गुन्हेगारांना वाटू लागले आहे.

सभापती महोदय, राज्यातील पोलीस विभागामध्ये जवळपास 12 हजार पदे रिक्त आहेत. आज पोलिसांवर कामांचा प्रचंड ताण येत आहे. पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी सरकार कोणत्याही प्रकारचे प्रयत्न करताना दिसत नाही.

सभापती महोदय, मागील आठवड्यात अकोल्यामध्ये 49 विद्यार्थिनींवर शिक्षकाने लैंगिक छळ केल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. राज्यात रोज कुठे ना कुठे अशा प्रकारच्या घटना घटत आहेत. अशा गोष्टी ऐकायला आणि सांगायला देखील आम्हाला लाज वाटते. आम्हाला त्याच त्याच गोष्टींचा उल्लेख करण्याची शरम वाटते.

सभापती महोदय, अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रमुख डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या होऊन एक वर्ष उलटले तरी त्यातील आरोपी अजून पकडले गेले नाहीत. डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येचा विषय सभागृहात उपस्थित झाला त्यावेळी विरोधी पक्षामध्ये असलेले आणि आता सरकारमध्ये असलेल्या पक्षांनी किती आकांडतांडव केला होता. त्यांनी तत्कालीन सरकारवर किती तरी आरोप केले होते. आताचे मुख्यमंत्री असलेले श्री.देवेंद्र फडणवीस त्यावेळी सदस्य होते, आपण त्यांची भाषणे काढून वाचावीत. त्यांनी तत्कालीन सरकारबद्दल पुढीलप्रमाणे वक्तव्य केली होती, या सरकारला जेलमध्ये टाकले पाहिजे, या सरकारवर 302 चा गुन्हा दाखल केला पाहिजे. आता त्यांची ही संवेदना कुठे गेली ? गृह विभागाचा मंत्री संवेदनशील असला पाहिजे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे हसण्यावर घेतले जात आहे. आम्ही मांडलेले मुद्दे कोणीही गंभीरपणे घेत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.....

सभापती महोदय, दिनांक 20 फेब्रुवारी, 2015 रोजी कॉम्रेड गोविंद पानसरे यांचा खून झाला. परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात सरकारला यश आलेले नाही. अशा प्रवृत्तींना सरकारने ताकद दिलेली आहे असा लोकांचा समज झालेला आहे. माझी मागणी आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांना गृह विभाग सांभाळता येत नसेल, त्या विभागावर वचक ठेवता येत नसेल तर त्यासाठी मी त्यांचा राजीनामा मागणार नाही, परंतु त्यांनी या विभागासाठी स्वतंत्र मंत्री नेमावा. गृह विभागासाठी स्वतंत्र मंत्री दिला तर गृह विभागाला निश्चितपणे न्याय मिळेल आणि जनतेला देखील न्याय मिळेल. परंतु जर असे झाले नाही तर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये काही सुधारणा होईल असे मला वाटत नाही. जोपर्यंत सरकार आणि मंत्र्यांचा या विभागावर वचक राहणार नाही तोपर्यंत कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारणार नाही असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सन 2015 चे वि.स.वि. क्र.18 महाराष्ट्र विनियोजन विधेयक विचारात घेण्याबाबत**

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, गट नेत्यांच्या बैठकीत ठरल्यानुसार या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. ते 15-20 मिनिटांत सभागृहात येणार आहेत.

तसेच दुसरी बाब अशी की, विधानसभेमध्ये विनियोजन विधेयक संमत झालेले आहे. जर ते विधेयक या सभागृहाने विचारात घेतले तर बरे होईल. हे विधेयक सायंकाळी 5.00 वाजेपूर्वी विचारात घेणे गरजेचे आहे.

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेवरील शेवटचे भाषण सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे होणार आहे. त्यामुळे त्यांचे भाषण संपल्यानंतर विनियोजन विधेयक विचारात घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या चर्चेमध्ये मला सुध्दा भाग घ्यावयाचा...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आपण कृपया खाली बसावे. या चर्चेवर बोलण्यासाठी गट नेत्यांनी आपले नाव पाठविलेले नाही. त्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, विनियोजन विधेयक आज सायंकाळी 5.00 वाजेपूर्वी संमत करण्याबाबतची तांत्रिक अडचण असेल तर ते अगोदर घ्यावे. त्यानंतर मला बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** विनियोजन विधेयक

**L. A. BILL NO. XVIII OF 2015**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2016.)

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-18, दिनांक 31 मार्च, 2016 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती :** ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन 2012-2013 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन 2012-2013 या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन 2013-2014 या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे

**मु.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, जयंत प्र. पाटील, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु...)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी माननीय सभापतींनी नियमाद्वारे परवानगी दिल्याबद्दल सुरुवातीलाच त्यांना मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेवर बोलताना गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांचा घटनाक्रम सभागृहापुढे मांडला आहे. माझा या चर्चेवर बोलण्याचा क्रम शेवटी आलेला आहे. त्यामुळे मला या चर्चेवर बोलण्यासाठी दोन-पाच मिनिटे सवलत दिली तर मी आपला फार आभारी राहीन.

महोदय, अशा प्रकारचे काही विषय आले की, महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेल्या लोकनाट्यांची आठवण येते. लोकनाट्याचा अविभाज्य भाग हा 'वग' असतो. 'वग' म्हणजे राजा आणि प्रधानजींचा संवाद होय. त्या लोकनाट्यामध्ये राजा रंगमंचावर येतो आणि रंगमंचावर दोन फेऱ्या मारल्यानंतर आपला हात तलवारीच्या मुठीवर ठेवून प्रधानजींना विचारतो की, प्रधानजी, राज्याची परिस्थिती कशी काय आहे ? त्यावर प्रधानजी बाणेदारपणे उत्तर देतो की, साहेब, सगळे सुखी आहेत. त्यावर राजा विचारतो की, सगळे सुखी आहे म्हणजे काय ? त्यावर प्रधानजी सांगतात की, चोर चोऱ्या करतात, दरोडेखोर दरोडे घालतात, बलात्कार करणारे बलात्कार करतात, ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांच्या बाबतीत आपण काहीच करीत नाही, सगळे लोक शांत आहेत, त्यामुळे राज्य फार सुखात चालले आहे. महोदय, हा जो प्रकार परंपरेनुसार चालत

आलेला आहे, तो आता कोठे तरी थांबविण्याची गरज आहे. कारण हे राज्य 'लोकनाट्य' नाही.

..6..



श्री.हेमंत टकले....

हे राज्य लोकांसाठी चालवायचे आहे. सत्ता परिवर्तनानंतर हे राज्य चालविण्याची जबाबदारी आता तुमच्याकडे देण्यात आलेली आहे.

महोदय, प्रसिध्द कायद्यातील तत्त्व असे आहे की, "Action and intention must concurred to constitute a crime." क्राईम डिफाईन करण्याची व्याख्या अशा प्रकारची आहे. मी यातील 'क्राईम' हा शब्द काढून टाकतो. या राज्याची जबाबदारी आपल्याकडे आल्यानंतर आपले 'इंटेन्शन' काय आहे आणि 'ॲक्शन' काय आहे, हे तपासून बघावे असे सांगितले तर त्याबद्दल आपण इतका राग करण्याची गरज नाही. मला वाटते आपण याकडे आत्मपरीक्षण म्हणून बघितले पाहिजे. साहजिकच आपण एक कार्यक्रम घेऊन सत्तेवर आलेला आहात. त्या भूमिकेमागील आपले काही आग्रह आहेत. हे सर्व खरे असले तरी कितीही सत्ता परिवर्तने झाली असली तरी राज्य व्यवस्था ही कायम असते. राज्य व्यवस्थेतील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जी यंत्रणा असते ती जशीच्या तशी असते. परंतु आपल्या हेतूबद्दलच काही तरी गडबड आहे असे जेव्हा त्या यंत्रणेला वाटते त्या वेळी अनेकदा सोयीस्कररित्या भूमिका घेतली जाते. कदाचित सत्तेवर असलेल्यांची मर्जी संपादन करण्यासाठी आपल्या हाती असलेल्या यंत्रणेतील काही लोक त्याचा दुरुपयोग करतात आणि तो दुरुपयोग शेवटी असा अंगाशी येऊ शकतो. याची उदाहरणे म्हणजे गेल्या काही दिवसात घडलेला हा सर्व घटनाक्रम आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

आपणा सर्वांना माहीत आहे की, कै.आर.आर.आबा गृहमंत्री असताना अतिशय लोकप्रिय होते. ते सर्व प्रकारच्या कार्यक्रमांना जायचे. सर्व लोक त्यांना कार्यक्रमासाठी बोलवायचे. अशाच एका कार्यक्रमामध्ये ते गेले. त्यांना माहीत नव्हते. ते गर्दीचे ठिकाण होते. अनेक लोक व्यासपीठावर होते. त्यामध्ये कोणी तरी एक इसम होता, त्याने गुच्छ देण्याच्या निमित्ताने जवळ जाऊन फोटो काढला आणि मग तो प्रसिध्द झाला, नंतर लक्षात आले की, तो एक कुप्रसिध्द, पोलिसांना हवा असलेला गुंड आहे. आपण त्यावेळी विरोधात होता, त्यामुळे गृह खात्याचे काय चालले आहे, गुन्हेगारांना बरोबर घेऊन स्टेजवर मिरवत आहेत अशी टीका आपल्याकडून सुरू झाली. आपण त्यावेळी हे तपासले नाही की त्या प्रामाणिक गृहमंत्र्यांचे असे काही इंटेशन होते का. आपण हा भाग सोडूनच दिला. आपण जे घडले त्याबद्दल आपल्या परीने फार मोठा आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. आपण या सर्व घटनांचा क्रम पाहिल्यानंतर आपल्याला निश्चित लक्षात येईल की, आज कालच्या सिनेमासृष्टीत, टीव्हीच्या मालिकांमध्ये, नाटकांमध्ये जसे पोलीस कॅरेक्टर रंगविले जाते, त्याची आपल्याला लाज वाटली पाहिजे. रंगविलेल्या चित्रांचा दुसरा वाईट परिणाम समाज मनावर होत आहे. मराठी चॅनेलवर युनिट आठ नावाची मालिका सुरू आहे. गुन्ह्याचा तपास हे हुशार अधिकारी कसा करतात ते त्यामध्ये दाखविण्यात येते. परंतु याचे उलट होत आहे. गुन्हा कसा करावा याचे प्रशिक्षण देणाऱ्या शाळा या माध्यमातून सुरू झालेल्या आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. आपण या संदर्भात काय करू शकणार आहोत हे आपल्याला माहीत नाही. टीव्हीवरील मालिकांच्या माध्यमातून हिंसेच्या गोष्टी दाखविल्या जातात. त्यामुळे त्याबद्दल आपली नापसंती असल्याचे आपल्या यंत्रणेने बोलण्याची आता निश्चित आवश्यकता निर्माण झाली आहे. नागपूरमधील घटनांचा उल्लेख करून मी येथे पुनरावृत्ती करणार नाही. परंतु त्या घटना अतिशय गंभीर आहेत. राज्याच्या पोलीस यंत्रणेवरील सामान्य माणसाचा विश्वास उडतो त्यावेळी मॉब सायकॉलॉजी तयार होते. यंत्रणेकडून गुन्हेगाराला शिक्षा होणार नाही असे लोकांनी मनात घेतले आणि त्या मॉब सायकॉलॉजीचे मॉब व्हायोलेन्समध्ये परिवर्तन झाले तर त्याचे फार दुष्परिणाम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

संबंध राज्याला भोगावे लागतात. त्यामुळे हाही प्रकार आता दुर्लक्षित करण्यासारखा नाही. आपले राज्य आले आहे. आता आपण सातत्याने सांगणार आहात की, 3-4 महिने झाले आहेत, मागचे सर्व काही काढतो, आम्हाला फार त्रास होत आहे, सर्व स्वच्छ करायचे आहे. स्वच्छ भारत आहे आणि आता स्वच्छ महाराष्ट्र करायचा आहे. आपण फार चांगल्या गोष्टी सांगत आहात. परंतु असे सांगताना आपल्यासमोर आलेली आव्हाने स्वीकारण्यासाठी आपण काही चिंतन करणार आहोत की नाही ? आपल्याला चिंतन संपवायलाही लागेल. तुरूंगातून मोका लागलेला कैदी पळून जातो यासारखी गंभीर घटना काय असू शकते ? राज्यात तुरूंग व्यवस्था सुरू झाली आहे, ज्याला जेल मॅन्युअल कोड असे म्हणतात. त्याचे फार अवडंबर असते. जेल मॅन्युअलचा अभ्यास करून त्यामध्ये कोणते बदल करण्याची आवश्यकता आहे याचा विचार शासन करणार आहे की नाही ? मागचे सरकार असताना एकदा असाच प्रसंग आला होता. मी "गजा पलीकडचे जग" या विषयावर काही तरी लिहित होतो. मी माजी माननीय गृहमत्र्यांना विनंती केली की, मला नागपूर जेलमध्ये जाऊन ते प्रत्यक्ष पहायचे आहे. माजी माननीय गृहमंत्री त्यावेळी मला म्हणाले की, माझी तिकडे व्हिजीट आहे, तुम्ही माझ्याबरोबर या आणि तुम्हाला काय पहायचे आहे ते पहा. आम्ही सर्व जेल पाहिले, कैद्यांना भेटलो, सुरक्षा व्यवस्था कशी आहे ते पाहिले.

सभापती महोदय, जेल मॅन्युअलमध्ये एक कलम असे आहे की, जेलमध्ये बंदिस्त असलेल्या कैद्यांना सूर्यास्ताच्या आधी जेवण द्यायचे. पूर्वीच्या काळात दिवाबत्तीची सोय नव्हती. त्यामुळे त्यावेळी अंधार पडण्याच्या आधी जेवण देऊन त्यांना त्यांच्या बराकीमध्ये परत बंद करून ठेवण्यासाठी ती प्रोव्हिजन होती. मी एलईडीसंदर्भात बोलत नाही. तो पुन्हा वादाचा विषय होईल. मी म्हणतो की, आपल्याला या साध्या गोष्टी बदलता येणार नसतील तर आपण कशासाठी शासन हाती घेतले आहे ? पूर्वीचे होते तेच आम्ही करीत आहोत असे सांगणे ठीक नाही. माननीय मुख्यमंत्री आकडेवारी देतील. परंतु स्टॅटिस्टिकचे मुख्य प्रिंसिपल असे आहे की, "Statistics hides more things than reveal the reality." स्टॅटिस्टिक्सचा उपयोग सत्य समोर येण्यापेक्षा असत्य गोष्टी झाकण्यासाठी अधिक करण्यात येत आहे. त्यामुळे यामध्ये परिवर्तन दिसू द्यावे. सत्य, वास्तव समोर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

येण्यामध्ये काय अडचण आहे ? ते समोर आणले तर त्यावर मात कशी करता येईल या दृष्टीने आपल्याला विचार करता येईल. येरवडा, नाशिक, नागपूर येथे मोठे जेल आहेत आणि त्यामध्ये वेगवेगळे विभाग आहेत. तेथे अंडर ट्राईल कैदी खूप असतात, न्यायालयाची तारीख येईपर्यंत निकाल लागेपर्यंत त्यांना तेथे ठेवले जाते. पिक पॉकेटपासून किरकोळ चोरी करणारे किंवा चुकीचे सांगून आलेले अनेक लोक तेथे असतात. आपण ज्यांना क्रिमिनल असे डिफाईन करू शकणार नाही असे बरेच लोक जेलमध्ये असतात. दीर्घ काळ वास्तव्यासाठी असलेले कैदी आणि तात्पुरते आलेले ऊपरे कैदी असे जेलमधील कैद्यांमध्ये भाग असतात. तेथील सर्व यंत्रणांवरील पूर्ण ताबा जेलच्या अधीक्षकांकडे नसतो. मला येथे सिनेमांचे दाखले देण्याची गरज नाही.

परंतु तरीही माझ्या मनात कायमचा राहून गेलेला 'अपहरण' सिनेमातील प्रसंग मी सांगतो. अपहरण सिनेमातील नेता त्याच्या गाडीतून प्रेत घेऊन जाणार आहे अशी खबर पोलिसांना मिळते, त्या भागातील प्रमुख पोलीस अधिकारी नाकाबंदी करून त्याची गाडी अडवितो. त्यामुळे तो नेता संतापतो. तो मागे जाऊन गाडीची डिकी उघडतो. प्रेक्षकांना त्यामध्ये प्रेत आहे हे दिसते. नेता पुढे येऊन पोलीस अधिकाऱ्याच्या मुस्काटात मारतो आणि त्याला म्हणतो की, तू स्वत:ला कोण समजतो, तू माझी गाडी तपासणार आहे का ? नेता पोलीस अधिकाऱ्याच्या अंगावर जाऊन ओरडतो. तेवढ्यात वरिष्ठ पोलीस अधिकारी येतो आणि नेत्याला कडक सॅल्यूट ठोकतो आणि गाडी अडविणाऱ्या अधिकाऱ्याला ताड ताड बोलतो आणि तेथून निघून जाण्यास सांगतो, तद्‌नंतर प्रेत असलेली गाडी घेऊन तो नेता पुढे निघून जातो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.......

हे जे सर्व सिनेमे तयार होतात ते कपोलकल्पित नसतात. आपल्या सर्वांच्या आठवणीत अर्धसत्य, आक्रोश, वेडनेसडे हे सिमेने अजूनही असतील. या सर्व सिनेमांमधून एक गोष्ट आपल्या निश्चित लक्षात येते की, गुन्ह्याची पध्दत, गुन्हेगारी प्रवृत्ती, वाढता हिंसाचार यांना सामोरे जाण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने जी पावले उचलली पाहिजेत, त्या दृष्टीने दुर्देवाने आपल्या सरकारने गेल्या चार महिन्यात पहिले पाऊल देखील टाकलेले नाही. ठीक आहे. एवढे दिवस हे झाले नाही. पण तसे पाऊल उचलण्याची वेळ आज आली आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, गृह विभागाला एक डेडिकेटेड मंत्री असला पाहिजे. याची आवश्यकता आहे किंवा नाही, हा जरूर चर्चेचा भाग होऊ शकतो. परंतु, मुख्यमंत्री महोदयांच्या सक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करण्याचे काही कारण नाही. रोज सकाळी गृहमंत्री म्हणून, मुख्यमंत्री म्हणून आपल्याला ब्रिफिंग केले जाते आणि संपूर्ण राज्याचा आढावा आपल्यासमोर ठेवला जातो. तो लक्षात घेऊन आपण हे कसे सांभाळणार आहोत, याचा अत्यंत बारकाईने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी श्री.रिबेरो, श्री.इनामदार या सारख्या काही महत्त्वाच्या निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांचा उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. पण मी मघाशी इंटेनशनबद्दल बोललो. ज्यांचा जागतिक पातळीवर गौरव झाला, अशा रिबेरोंसारख्या माजी अतिवरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने मिडियासमोर येऊन सांगितले की, "आता मला असुरक्षित वाटावयास लागले आहे." याचे कारण असे आहे की, आज कोणत्याही धर्माच्या नावाने वातावरण बदलण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे आणि कळत, नकळत का होईना या राज्य शासनाचा त्याला पाठिंबा आहे, अशा प्रकारची असुरक्षिततेची भावना जर एकदा तयार व्हावयास लागली तर सामाजिक विघटन पार दुसऱ्या टोकाला जाण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, लोकांना ॲसिड सारख्या साध्या साध्या विद्ध्वंसक गोष्टींची उपलब्धता कशी होते, हा एक प्रश्न आहे. कोणत्या कारणासाठी सहजपणे हे ॲसिड त्यांना मिळते ? कोणी तरी सूड उगविण्यासाठी कोणावर तरी ॲसिड फेकतो, त्याला विद्रुप करतो, आयुष्यातून उठवून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

टाकतो आणि दाद मागायची म्हटली तर वेगळीच परिस्थिती समोर येते. अशाच

...2...



श्री.हेमंत टकले.......

घटनाक्रमातील एका दुर्दैवी तरुणींला मदत देण्याची योजना मागील काळात सरकारने लागू केली होती. परंतु, एका दुर्दैवी तरुणीला "आपली घटना या योजनेच्या कटऑफ डेटच्या अगोदरची असल्यामुळे तुम्हाला मदत करता येणार नाही", असे निर्बुध्द उत्तर या शासनाकडून दिले जाते आणि उच्च न्यायालयाकडून या बाबतचा जाब सरकारला विचारला जातो. याचा अर्थ असा आहे की, जेवढ्या बारकाईने समजावून घेऊन या खात्याचे प्रश्न सोडविले पाहिजेत, तेवढ्या बारकाईने ते आज सोडविले जात नाहीत. ही एक गंभीर बाब या निमित्ताने आपल्या सर्वांसमोर आली आहे.

सभापती महोदय, आपण नेहमी म्हणतो की, ट्रान्झिटमध्ये असताना, कैदी इकडून तिकडे नेत असताना काही प्रकार घडतात. अशाच एका घटनेत कैद्यांना काही कारणासाठी घेऊन जायचे होते. पण कैदी सरळ डान्स बारमध्ये पोलिसांना घेऊन गेले. नेमके कोण कोणाबरोबर आहेत, हेच समजत नाही. हा चोर पोलिसांचा खेळ चालला आहे का ? "या राज्यामध्ये अगोदर असे चालले होते, आता नाही", असे म्हणून तुमची सुटका होणार नाही. जे चुकीचे आहे, त्याचे समर्थन अजिबात करावयास नको आणि जे अयोग्य आहे, त्याचा बंदोबस्त ताबडतोबीने झाला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्कूल बसच्या संदर्भातील मुद्दा येथे मांडला आहे. परिवहन खात्याने शिक्षण खात्यावर आणि शिक्षण खात्याने परिवहन खात्यावर जबाबदारी ढकलून हे अत्याचार थांबणार नाहीत. आपला उद्देश हा आहे की, हे अत्याचार थांबले पाहिजेत, गुन्हेगारांवर जरब बसली पाहिजे आणि ही जरब बसवायची असेल तर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे 'ऑल इज वेल', या भ्रमात फार काळ आपल्याला राहून चालणार नाही. अन्यथा, परिस्थिती हाताबाहेर जाईल आणि ठिकठिकाणी त्याचे उद्रेक होतील, गुंडांना गुन्हे करण्याचे स्वातंत्र्य मिळेल, स्त्रियांवरील अत्याचार कमी होणार नाहीत, बालकांवरील अत्याचार, अन्याय थांबणार नाहीत. त्यामुळे समोर दिसत असताना जागलेपणाने या सर्व गोष्टींकडे बघितले नाही, उपाययोजना केल्या नाही तर भविष्यात आपल्या पुढे येणाऱ्या आव्हानात्मक प्रश्नांना आपण कसे सामोरे जाणार आहात, हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे पोलीस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खात्यात ज्या ज्या प्रकारच्या बदलाची आवश्यकता आहे, मनुष्यबळाची आवश्यकता आहे,

...3....



श्री.हेमंत टकले.......

आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे, त्याबाबत कार्यवाही झाली पाहिजे. सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर दिलेले आहे. अशा प्रकारचे सर्व वातावरण असताना यामधून मार्ग काढण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष म्हणून आम्ही जेव्हा या सभागृहात विषय मांडतो त्यावेळी तुमच्या व्यवस्थेमधील त्रुटींचे तुम्हाला दर्शन घडावे, ही कळकळ असते. प्रत्येक वेळी त्यामध्ये राजकीय अभिनिवेश नसतो. एकूणच या राज्याचे बरे व्हावे, या राज्यातील जनता सुखी व्हावी, सुरक्षित रहावी, यासाठी ज्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, त्या आवश्यकतेकडे आपण गांभीर्याने बघितले पाहिजे, अशी अपेक्षा असते. आताची अवस्था कालांतराने सुधारेल वगैरे म्हणून पुढील वेगळे आश्वासन देण्याऐवजी आलेली परिस्थिती सत्य आहे, हे घडत आहे आणि हे थांबले पाहिजे, थांबविण्यासाठी आम्ही आमची सर्व शक्ती पणाला लावू, परंतु हे राज्य सुरक्षित ठेवू, या राज्यातील सामाजिक सलोखा बिघडवू देणार नाही, गुन्हेगारी वाढू देणार नाही, गुन्हेगारांना जबर बसेल अशी पोलीस यंत्रणा असेल, पोलीस यंत्रणा कार्यक्षम असेल, भ्रष्टाचाररहित असेल, असा विश्वास तुम्ही दिला पाहिजे. भ्रष्टाचाररहित यंत्रणा असावी, अशी थोडी धाडसाची मागणी मी केली आहे. पण शासनातर्फे जे आकडे प्रसिध्द केले जात आहेत त्यानुसार भ्रष्टाचारात कोणत्या खात्याचा क्रमांक कितवा आहे, कोण पुढे आहे, हे स्टॅटेस्टिक मांडले जाते.

सभापती महोदय, माझ्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात आम्ही नाशिक येथून मुंबईला यायचो. नाशिकचे एक ट्रॅफिक विभागातील ए.सी.पी.मुंबई येथे कार्यरत होते. त्यावेळी मुंबईमध्ये आमदार निवासामध्ये जाण्याचा काही प्रश्नच नव्हता. ए.सी.पीं.शी ओळख असल्यामुळे आम्ही त्यांच्या घरी रहावयास जायचो. श्री.विनायक शेळके असे त्यांचे नाव होते. आम्ही मुंबईला आल्यानंतर महाविद्यालयीन जीवनातील एक भाग असा असायचा की, मुंबईत येऊन एक इंग्रजी सिनेमा बघायचा आणि रात्री मुक्कामाला ए.सी.पी.शेळक्यांच्या घरी जायचे. सर्व नाशिककर त्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

'मामा' या नावानेच ओळखायचे. एक दिवस आम्ही सर्व त्यांच्या घरी गेलो, मामा घरी आले नव्हते. त्यांच्या घरातील आणि इमारतीमधील सर्व गडी बाहेर जिन्यामध्ये बसून विरंगुळा म्हणून पैसे लावून पत्ते खेळत बसले होते. रात्री 12 वाजता शेळके साहेब आले. तेव्हा

...4....



श्री.हेमंत टकले.......

लिफ्टही नव्हती. जिन्याने घरी जात असताना त्यांनी बघितले की, सर्व गडी पैसे लावून पत्ते खेळत होते. ते काही बोलले नाही, घरात आले, घरातील गड्याला बाहेर जाण्यास सांगितले आणि त्यांनी पोलीस स्टेशनला फोन लावला. प्रत्येक घरातील जुगार खेळणाऱ्या गड्यांना त्यांनी पोलीस स्टेशनच्या हवाली केले, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आणि दंडही झाला. याला जरब म्हणतात.

यानतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

इतक्या छोट्या गोष्टींची काळजी घेणारे मुंबईचे पोलीस दल आज हरवले आहे. ते सापडत नाही, ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. सरकारकडून चार महिन्यात या गोष्टी व्हाव्यात अशी अपेक्षा नाही. या गोष्टींच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. त्या बाबी करणे आवश्यक आहे, या सर्व प्रश्नांकडे सरकारने आत्मियतेने पाहिले पाहिजे. राज्याचा कारभार करताना मुख्यमंत्री महोदयांना असे वाटत असेल की, गृहखात्याचे काम संवेदनशील आहे, त्यामध्ये अधिक लक्ष देण्याची गरज आहे. इतरांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्याकडे असलेल्या इतर खात्यांचा कारभार दुसऱ्यांकडे देऊन तो हलका करुन दिला तर हा प्रश्न सुटण्यास मदत होईल. ही चर्चा अतिशय महत्वाची आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना येथे बोलून दाखविल्या, त्या सर्व भावनांची दखल घेऊन मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात परामर्श घ्यावा अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**कारेगांव तालुका राळेगांव, जिल्हा यवतमाळ येथील सार्वजनिक नळ योजनेच्या विहीरीत गाळ काढताना पाच मजुरांचा दुर्दैवी मृत्यू होणे याबाबत औचित्याचा मुद्दा**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना माननीय सभापती यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिलेली आहे त्यामुळे त्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात यवतमाळ जिल्ह्यात पाच बळी गेले आहेत. यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. "कारेगांव तालुका राळेगांव, जिल्हा यवतमाळ येथील सार्वजनिक नळ योजनेच्या विहीरीत असलेल्या गाळामुळे गावातील ग्रामस्थांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे दिनांक 31/03/2015 रोजी विहिरीतील गाळ काढण्यासाठी विहिरीत उतरलेल्या पाच मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडणे." पाणी उपसण्यासाठी सोडण्यात आलेल्या डिझेल इंजिनच्या धुरामुळे व विहिरीत खोल गेलेल्या पाण्यामुळे पाच मजुरांचा गुदमरुन मृत्यू झाला व दोन मजुरांची परिस्थिती अतिशय गंभीर आहे, त्यांना सेवाग्राम रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. मृत्यू झालेल्या पाच मजुरांच्या कुटुबांना व जखमींना तातडीने आर्थिक मदत मिळण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. ही चिंतेची बाब या विषयाच्या अनुषंगाने मी सभागृहात मांडत आहे. यावर शासनाने निवेदन करावे अशी मी शासनाला विनंती करतो.

-----------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय मुख्यमंत्री यांनी नियम 97 च्या चर्चेला उत्तर देण्याबाबत**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अतिशय संवेदनशील विषयावर चर्चा झालेली आहे, संसदीय कार्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, चार वाजता मुख्यमंत्री महोदय उत्तर देतील. त्यानंतर पाच वाजता उत्तर देण्यात येईल असे सांगितले होत. या चर्चेच्या उत्तराला विलंब करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. मुख्यमंत्री महोदयांना तत्काळ बोलावून या चर्चेला उत्तर दिले पाहिजे. या चर्चेचे गांभीर्य टिकवून ठेवले पाहिजे.

**तालिका सभापती** : आता नियम 93 च्या सूचना घेण्यात येतील. सभापती महोदयांनी जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय कायम राहील.

----

....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : माझ्याकडे आज नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या, त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण यांनी " पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील वीटभट्टयांवर स्थलांतरित झालेल्या सुमारे 20,000 कुटुंबातील बालके सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षात शिक्षणापासून वंचित राहिल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी " कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रात परप्रांतीय मच्छिमारांनी घुसखोरी केल्याने स्थानिक मच्छिमारांवर आलेली उपासमारीची वेळ." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्ह्यात संजय गांधी व श्रावणबाळ सारख्या निराधार योजनांचे अनुदान लाभार्थ्यांना नियमित मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीचे वेळ." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी " मुंबईतील रसायन तंत्रज्ञान संस्था (आयसीटी) या विद्यापीठातील प्राध्यापकांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी माहे मार्च, 2015 पर्यंत प्रलंबित असल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सचिव...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, माणिकराव ठाकरे, संजय दत्त यांनी " दिनांक 30 मार्च, 2015 रोजी राळेगांव तालुक्यातील कोरेगाव (जि.यवतमाळ) येथे सार्वजनिक नळ योजनेच्या विहिरीतील गाळ काढताना गुदमरुन 5 मजुरांचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत रुग्णालय व महाविद्यालयात चतुर्थ श्रेणीतील बदली कामगारांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, किरण पावसकर, प्रकाश गजभिये यांनी "नागपूर शहरातील मध्यवर्ती कारागृहातून दिनांक 31 मार्च, 2015 रोजी पाच कैदी पळून जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश बिनसाळे, ॲड.रामहरी रुपनवर यांनी " अकोला जिल्ह्यातील बाभुळगाव जहांगीर येथील जवाहर नवोदय विद्यालयात 49 विद्यार्थीनींवर विद्यालयातील दोन शिक्षक लैंगिक अत्याचार करीत असल्याची घटना दिनांक 31 मार्च, 2015 रोजी उघडकीस येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "महाजनकोने पारस औष्णिक केंद्राकरिता गाझीपूर ता.बाळापूर, जि.अकोला येथील मेसर्स सुधीर कंस्ट्रक्शन नागपूर कंपनीला दिले असून या कंपनीने वेळेच्या कालावधीपूर्वी काम पूर्ण केल्यामुळे कामात झालेली अनियमितता." या विषयावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...6..



सचिव...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "दिनांक 28 मार्च, 2015 रोजी नागपूर शहरात रामनवमी निमित्त काढलेल्या शोभा यात्रेमध्ये 3 महिलांचे मंगळसूत्र चोरांनी पळविल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील यांनी " बालकविहार विद्यालयाप्रमाणे नवजीवन विद्यालय, मालाड (पूर्व) या शाळेत शिक्षकांच्या बोगस नेमणुका तसेच शाळेतील गैरप्रकार यासंदर्भात नवजीवन विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याबद्दल लेखी तक्रार करुनही कारवाई न झाल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व उपनगरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा भाग असलेल्या रिक्षा वाहतुकीला अधिकाअधिक रिक्षा थांबे देण्यासाठी करावयाची उपाययोजना. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----

....7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, यासंदर्भात आपणाला जो निर्णय करायचा आहे तो आपण करावा. माझी अशी विनंती आहे की, नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर सभागृहात नियम 97 अन्वये चर्चा झाली आहे. चार वाजता मुख्यमंत्री महोदय येऊन उत्तर देणार होते. त्यानंतर पाच वाजता येतील असे कळविण्यात आले. सभापती महोदयांनी सांगितले की, सव्वा पाच वाजता मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल. या महत्वाच्या प्रस्तावाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री महोदय उत्तर देणार आहेत. लक्षवेधी सूचना घेण्यात काही अडचण नाही. आणखी आपणाला चार तास बसून लक्षवेधी सूचना घेता येतील.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना आल्यावर या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सभापती महोदयांनी नियम 97 अन्वये चर्चा घेण्याची परवानगी दिली. या चर्चेला उत्तर देण्याची तयारी शासनाने दाखविली आहे. यामध्ये प्रश्न असा आहे की, आज प्रश्न उपस्थित केल्यावर विधानसभेत मुंबईच्या प्रश्नांवर चर्चा सुरु आहे, तेथे माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. सभापती महोदयांच्या दालनात असे ठरले होते की, मुख्यमंत्री या चर्चेला आजच उत्तर देतील. मुख्यमंत्री महोदयांना मी निरोप पाठविला आहे, मी स्वतः खालच्या सभागृहात जाऊन मुख्यमंत्री महोदयांना निरोप देतो. तोपर्यंत विनियोजन विधेयक, नियम 93 च्या सूचना व लक्षवेधी सूचना घ्याव्यात, माननीय मुख्यमंत्री आले की, उत्तराला सुरुवात करतील व तेव्हा बाकीचे कामकाज थांबविता येईल असे ठरले होते. ठरल्याप्रमाणे सभागृहात वेगळे करायचे असेल तर माझी काही हरकत नाही. सर्वानुमते असे ठरले आहे त्यावेळी विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे श्री.सुनील तटकरे, श्री.जयंत पाटील उपस्थित होते.

**तालिका सभापती** : सभापती महोदयांच्या दालनात मी देखील उपस्थित होतो. मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचना घेण्याचे सूतोवाच केले आहे, परंतु ही गोष्ट मला देखील योग्य वाटत

नाही. कारण लक्षवेधी सूचनेला न्याय मिळाला पाहिजे. सन्माननीय सदस्य अनेक प्रश्न मांडतात. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची भावना आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती........**

या विषयावर अतिशय गांभीर्याने चर्चा झालेली आहे. मुख्यमंत्री महोदय सभागृहात येतील आणि या चर्चेला उत्तर देतील.

मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 20 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज आठवड्याचा शेवटचा दिवस आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तराचे भाषण संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित होणार असेल तर आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना सोमवारी चर्चेला घेण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मंगळवार दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजी लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपले भाषण सुरु करावे.

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे

**मु.शी.:** नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कैद्यांनी पलायन केल्याचे उघडकीस येणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, जयंत पाटील, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु...

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 97 अन्वये या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा घेण्यात आली. माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडेजी, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरेजी, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश गजभिये, भाई जगताप, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, माननीय सदस्य सर्वश्री हरिसिंग राठोड, हेमंत टकले यांनी आपले मत व्यक्त केले.

सभापती महोदय, मुळात कायदा आणि सुव्यवस्थेवर या सभागृहात नुकतीच चर्चा झाली होती. पण त्यानंतर दोन मोठया घटना घडल्यामुळे आज माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी आग्रह धरल्यानंतर ही चर्चा घेण्यात आली. सभापती महोदय, नागपूरमध्ये जी घटना घडली, विशेषतः नागपूर मध्यवर्ती कारागृहातून 5 कुख्यात बंद्यांनी पलायन केले. बिशनसिंग उके, शोएब सलीम खान, सत्येंद्र उर्फ राहुल गुप्ता, प्रेम उर्फ नेपाली खत्री, आकाश ठाकूर या 5 कैद्यांनी बंदी बरॅकचे गज कापून पलायन केले. मुळात आपण घटना बघितली तर सदर बरॅक 203 फूट असून रुंदी 23 फूट आणि उंची 23 फूट आहे. बरॅकला 25 खिडक्या आणि 1 दरवाजा आहे. ज्या खिडकीतून गज वाकवून हे बंदी पळाले त्या खिडकीला 9 गज आहेत. प्रत्येक 2 गजामधील अंतर 5 इंच आहे. ज्या ठिकाणचे गज कापून ते पळाले, त्यानंतर देखील बडी गोलमधील या बरॅकला लागून भिंतीचे कुंपण आहे. सदरची भिंत अंतर्गत भिंत असून तिची रुंदी 8 बाय 10 इंच आहे. सदर भिंत अंदाजे 20 फुटापेक्षा जास्त म्हणजे 23 फुटाची आहे. ती दक्षिण दिशेला आहे. बंद्यांनी पलायन केले ती बरॅक दक्षिण उत्तर 203 फूट व पूर्व पश्चिम 23 फूट आहे.

सभापती महोदय, हे सांगण्याचे कारण असे की, जोपर्यंत अंतर्गत मदत मिळत नाही तोपर्यंत असे पलायन होऊ शकत नाही. त्यामुळे निश्चितपणे अधीक्षक वैभव कांबळेंना निलंबित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

केले त्यांच्या विरोधात मागील वर्षी राज्य सरकारकडे 51 अहवाल आले होते. आश्चर्य असे की, त्यातील एकाही अहवालावर कारवाई करण्यात आली नाही. 51 अहवाल विरोधात आल्यानंतरही कारवाई का झाली नाही हा एक महत्वाचा विषय आहे. मागील काळात अधिवेशन सत्र सुरु असताना असे लक्षात आले की, नागपूर कारागृहात मोबाईल, दारुची बाटली सापडली. तत्कालीन गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांनी कारागृहात जाऊन पाहणी देखील केली होती आणि त्या ठिकाणी व्यवस्था उभी केली होती. त्यानंतर कारागृहात मोबाईल जॅमर बसविण्यात आले होते. पण असे लक्षात आले की, हे मोबाईल जॅमर देखील जाणीवपूर्वक बंद केले जातात. त्यातून सर्रासपणे कारागृहात वेगवेगळे मोबाईल वापरले जातात.

सभापती महोदय, काल सभागृहामध्ये एक प्रश्न चर्चेला आला होता. मागील वर्षी एका कैद्याने 1000 मोबाईल कॉल्स जेलमधून केल्याचे निष्पन्न झाले. या माध्यमातून दोन गोष्टी करायचे ठरविले आहे. या संपूर्ण घटनेची चौकशी डी.जी.(अँटी करप्शन) करतील. त्यांच्या अंतर्गत एक समिती तयार केली आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत त्यांनी याचा अहवाल द्यावा. ज्यामध्ये काय काय लॅप्सेस होते, व्यक्ती आणि व्यवस्था या दोहोंमध्ये काय काय लॅप्सेस होते, कोणत्या गोष्टी पॉईंट आऊट झाल्या पण कार्यवाही झाली नाही अशा गोष्टी कोणत्या आहेत, त्या ठिकाणी काय केअर घ्यावयास पाहिजे होती ती घेतली गेली नाही, जेल मॅन्युअलप्रमाणे कारवाई झाली नाही याची माहिती घेतली जाईल. त्याचप्रमाणे यापुढे काय केले पाहिजे याची देखील शिफारस केली जाईल, अशा प्रकारची समिती तयार करण्यात आली आहे. त्या समितीला मी स्पष्टपणे सांगितले आहे की, कोणाचाही मुलाहिजा न ठेवता त्या ठिकाणी जेवढे लोक यामध्ये सामील असतील, छोटे आणि मोठे असोत, एकदा कारवाई झालीच पाहिजे. त्या शिवाय अशा घटना करणाऱ्यांवर जरब बसणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आर्टिकल 311 चा उल्लेख केला आहे. जे जे लोक या घटनेमध्ये सामील असल्याचे निष्पन्न होईल त्या प्रत्येक व्यक्तीला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आर्टिकल 311 चा वापर करुन बडतर्फ केले जाईल. त्यांच्या विरुध्द फौजदारी कारवाई देखील केली जाईल आणि गुन्हा दाखल करुन प्रॉसिक्युशन देखील केले जाईल. अतिशय गंभीर गुन्हा

...3..



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

घडलेला आहे. या आरोपींना शोधण्यासाठी पथक तयार केले आहे. काही लिड मिळाले असून त्या संदर्भात कारवाई सुरु आहे. जरुर ते आरोपी सापडतील असा मला विश्वास आहे. त्याच बरोबर कामठी येथील आरोपी पळाला, तो लगेच सापडला. त्याला अटक केली आहे. अशी कोणतीही गंभीर परिस्थिती या निमित्ताने तयार झालेली नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका घटनेचा उल्लेख केला. नागपूरमध्ये झालेल्या फायरिंगबद्दलचा तो मुद्दा होता. जे फायरिंग झाले ते एकमेकाच्या ओळखीचे होते व त्यांच्या वैमनस्यातून झाले होते. त्या प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात आली. एका गोष्टीचा आपल्याला विचार करावा लागेल. यातील प्रमुख आरोपी लिटील सरदार आणि त्याचा भाऊ जेंटील सरदार यांची पार्श्वभूमी पाहिली तर ती गुन्हेगारी स्वरुपाची आहे. या गुन्हेगारांची पार्श्वभूमी पाहता जेंटील सरदार विरुध्द एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली होती. मला या ठिकाणी कोणावर आरोप करावयाचा नाही. पण शासन स्तरावर त्याच्यावरील एमपीडीए कारवाईचा रिव्ह्यू करण्यात आला आणि त्याला मोकळे सोडण्यात आले. आताच्या शासनाच्या काळात झालेले नाही. पण मला त्याच्या आरोपात जायचे नाही. अशा प्रवृत्ती विरोधात एमपीडीए कायद्यांतर्गत पोलीस कारवाई करतात. एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई का केली जाते? सातत्याने ही मंडळी गुन्हे करतात, गुन्हा केल्यानंतर त्यांच्याविरुध्द साक्ष द्यायला लोक तयार होत नाहीत. म्हणून प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन म्हणून कारवाई करावी लागते. जर त्यांच्याविरुध्द प्रिव्हेंटिव्ह ॲक्शन घेतल्यानंतर रिव्ह्यू घेऊन त्यांना सोडून देणार असू, ज्यांच्याविरुध्द एक गुन्हा नाही, इतके गुन्हे नोंद असताना अशा प्रकारच्या गुन्ह्याबाबत लिनियन्सी दाखविली तर ते आणखी गुन्हे करावयास धजतात. म्हणून या घटनेचा धागा पकडून शासन स्तरावर कोणत्याही प्रकरणामध्ये

रिव्ह्यू करावयाचा नाही, गृहमंत्र्यांसहीत कोणत्याही प्रकरणात रिव्ह्यू करायचा नाही. याचे निकष तयार करण्यात येतील.

नंतर 2एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

तांत्रिक विषय म्हणजे उच्च न्यायालयाचे आदेश वगळून ज्या प्रकरणांमध्ये गंभीर गुन्हे आहेत अशा प्रकरणात राज्य स्तरावर रिव्ह्यू न घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राजे येथे घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून ती अत्यंत गंभीर आहे. या घटनेची आपण पार्श्र्वभूमी बघितली पाहिजे. दोन परिवाराने दोन दिवसांपूर्वीच एकमेकांविरूद्ध क्रॉस कंम्प्लेंट केल्या होत्या. श्री.बबन आव्हाड यांच्या पत्नीने माझ्या मुलीच्या लग्नाची माहिती पोलीस स्टेशनला का दिली व सप्ताहाचा हिशोब का मागतो अशा प्रकारची तक्रार फिर्यादीने केली आहे. जे आरोपी आहेत त्यांची मुलगी अल्पवयीन आहे. तरी त्यांनी तिचे लग्न केले अशा प्रकारे फिर्यादीच्या कुटुंबातून तक्रार झाली होती. मग त्याची चौकशी झाली. ती मुलगी अल्पवयीन नव्हती. मग त्यांच्यातील वैमनस्य सातत्याने सुरू झाले. हे करणारे कोण आहेत याचा देखील शेवटी विचार केला पाहिजे. हे करणारे समाजातील पुढारी आहेत. आरोपी हे माजी सरपंच आहेत, तर त्यांची पत्नी ही सरपंच आहे. जे फिर्यादी आहेत त्यांचे पती माजी सरपंच आहेत. मी एक गोष्ट स्पष्ट सांगतो की, आरोपी हा कुठल्याही पक्षाचा नसतो. सरपंच हा निवडून येतो. त्याला आपण लोकप्रतिनिधी म्हणतो. त्या लेव्हलची लोक असे वागत असतील त्याचा गंभीरतेने विचार करावा लागेल हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. मी स्पष्टपण सांगतो की, आरोपी हा कुठल्याही पक्षाचा नसतो. तो फक्त आरोपीच असतो. येथे तो आरोपी भाजपचा आहे असे सांगण्यात आले. तो आरोपी कुठल्या पक्षाचा आहे हे मी सांगणार नाही. तो भाजपचा नक्कीच नाही. हे दोन्ही गट एकाच पक्षाचे आहेत. ते कुठल्या पक्षाचे आहेत हे मी सांगणार नाही. पक्ष असे कोणाला घटना करायला सांगतो हे मी मानणारा नाही. त्या आरोपीचा भाजपशी काहीही संबंध नाही. त्याचा रिपोर्ट मी घेतलेला आहे. आपणा सर्वांचा आग्रह असल्यामुळे त्या आरोपीचा राष्ट्रवादी पक्षाशी संबंध आहे असे मी येथे सांगतो. पण पक्ष असे करा असे कधीच सांगणार नाही या मताचा देखील मी आहे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा प्रस्ताव आपल्या अनुमतीने सभागृहासमोर आलेला आहे. अतिशय गंभीर असा विषय येथे उपस्थित करण्यात आला आहे. आरोपी कोणत्या पक्षाचा आहे हे सांगून त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. मी माझ्या भाषणाच्या शेवटी व सन्माननीय सदस्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली होती की, बाकी सर्व विषय सोडून या गंभीर विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर अपेक्षित आहे. माननीय मुख्यमंत्री संवेदनशील आहेत. ती संवेदनशीलता या उत्तरातून दिसली पाहिजे. ती संवेदनशीलता दिसण्याच्या ऐवजी ओझरता राजकीय रंग देऊन या विषयातील गंभीरता निघून जात आहे. ज्या कारणासाठी आपण संपूर्ण कामकाज बाजूला ठेवले आहे ते साध्य झाले पाहिजे. हा विषय कोणालाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यासाठी उपस्थित केलेला नाही. या विषयाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. सगळ्यांना असुरक्षित वाटत आहे. त्यामुळे यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे. त्याच्या पलीकडे दुसरा कोणताही विषय नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले होते की, यात पक्षाचा काहीही संबंध नाही. येथे आपण हा भाजपचा कार्यकर्ता आहे असा उल्लेख केल्यामुळे हा विषय आलेला आहे. आपण जर तो उल्लेख केला नसता तर पक्षाचा विषय आलाच नसता. आपणच आरोप केलेले आहेत. मी यात राजकारण केले नव्हते. पक्ष असे करावे हे कधीच सांगत नाही. आरोपी हा कुठल्याही पक्षात असू शकतो. पण पक्षाने त्याला आरोप करायला सांगितले आहे किंवा गुन्हा करायला सांगितला आहे या मताचा मी नाही. त्यामुळे मी राष्ट्रवादी पक्षावर कुठलाही आरोप लावलेला नाही. मी केवळ एवढेच सांगितले की, तो आरोपी भाजपाचा नाही. ते येथे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दोघांमध्ये वैमनस्य झाले. त्यातील एक जण माजी सरपंच आहे, तर एक सरपंच आहे अशा प्रकारचा उल्लेख केला आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मला माझे भाषण पूर्ण करू द्यावे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांचे भाषण पूर्ण करू द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, प्रत्येक शब्दाचा किस येथे पाडणार असाल तर माझे भाषण कसे काय होईल ? मी फक्त येथे चिंता व्यक्त केली आहे. आज सरपंचाकडून काय अपेक्षा आहेत ? सरपंच हा समाजाचा पुढारी आहे. त्याला मी राजकीय रंग देत नाही. सरपंच, माजी सरपंच, महिला सरपंच हे सर्वजण समाजाचे पुढारी आहेत. येथे पक्षाचा विषय नाही. लोकप्रतिनिधी असे वागायला लागले तर आपले कुठे चुकते आहे, असे का घडते याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भाने मी बोललो आहे. मला कुठल्याही परिस्थितीत याला राजकीय रंग द्यावयाचा नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील एका घटनेचा उल्लेख केला आहे. यात आरोपी व पीडित एकमेकांना ओळखत होते. त्यांचे लग्न करण्याचे देखील ठरले होते. ते एकत्रित राहिले. पण त्यानंतर त्या आरोपीने लग्न केले नाही. त्या महिलेचा एक प्रकारे उपयोगच केला. त्यामुळे त्यांनी तक्रार दिली व त्यावर तातडीने कारवाई देखील झाली.

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी एक गंभीर घटना सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आहे. ना.म.जोशी मार्ग पोलीस ठायातील ए.पी.आय.श्री.मोरे डान्स बारमध्ये गेले होते. ए.पी.आय.श्री.मोरे यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरूद्ध डी.इ.सुरू केली आहे. मी पुन्हा आपल्याला सांगतो की, यात ते दोषी आढळले तर संविधानातील अनुच्छेद 311 अनुसार त्यांना बडतर्फ करण्यात येईल. आपण मानव असल्यामुळे मानवतेच्या दृष्टीने विचार करतो. त्यामुळे अशांना आपण कमी शिक्षा देऊन सोडून देतो. पण अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करीत नाही तो पर्यंत आपण धाक निर्माण होणार नाही.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

नागपूर येथील तडीपार गुंड श्री.प्रकाश बागडे याने एका मुलीला मारहाण केली. तिची तक्रार घेण्यात आली नाही अशा प्रकारचा आरोप करण्यात आला. तिची तक्रार तीन तास उशिराने घेण्यात आली. 11.00 वाजता ती मुलगी पोलीस ठाण्यामध्ये आली व 3.00 वाजता तक्रार नोंदविण्यात आली. मुलींच्या संदर्भात तक्रार असेल तर ती नोंदविण्यात 4.00 तास लागण्याचे कारणच नाही. तातडीने त्या पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे. त्याची चौकशी करण्यात येत आहे. चौकशीमध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई केल्याचे आढळून आले तर निश्चितपणे त्यावर कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी लातूर आश्रमशाळेसंबंधात बोलताना 36 पोस्ट मार्टेम झाले नाही असे सांगितले. पण ती वस्तुस्थिती नाही. पहिले पोस्ट मार्टेम तातडीने करण्यात आले होते. त्यानंतरच गुन्हा दाखल करण्यात आला. अधिकची माहिती हवी होती म्हणून दुसऱ्यांदा पोस्ट मार्टेम करण्यात आले. पहिल्या पोस्ट मार्टेममध्ये विलंब झालेला नाही. उलट रातोरात पोस्ट मार्टेमचा रिपोर्ट घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन रेक्टरवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात संस्था चालक देखील गुंतलेला आहे काय याचा देखील तपास सुरू केला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .........

यासंदर्भातील तपास सुरु केला असून यामध्ये त्यांचाही समावेश असेल तर त्यांच्यावरही कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे. गुन्हे घडू नयेत यासाठी आपण अशा प्रकारे कारवाई करण्याचे ठरवले आहे.

सभापती महोदय, महिला दक्षता समित्या गठीत करण्यात याव्यात यासंदर्भात विषय मांडण्यात आला असून त्यासंदर्भात शासनाच्या वतीने योग्य ती कार्यवाही केली जाईल.

या ठिकाणी जरीपटका पोलीस स्टेशनच्या संदर्भातील विषय उपस्थित करण्यात आला असून त्यावर ऑलरेडी कारवाई करण्यात आली असून यामध्ये कोणालाही पाठीशी घानण्याचा काही एक संबंध येत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नागपूर येथील उद्योगपतींवर दिवसा ढवळया हल्ले होत आहेत यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी जो हल्ला झाला होता त्यासंदर्भात तातडीने कारवाई करण्यात आली असून सगळया आरोपींना अटक करण्यात आली आहे. या विषयाच्या संदर्भात मला पुन्हा राजकारण आणावयाचे नाही. परंतु अशा प्रकारचे एलिमेन्टस आहे की, ज्यांच्यावर एमपीडीए लावला गेला होता त्यांचा एमपीडीए नंतर काढला गेला. मला असे वाटते की, गुन्हेगारांवर जर वचक ठेवावयाचा असेल तर कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारच्या प्रवृत्तींना ठेचूनच काढले पाहिजे. मी आपल्याला विश्वासाने सांगू इच्छितो की, ज्यांची पार्श्वभूमी गुन्हेगारीची आहे त्यांनी जर आपली पाश्वभूमी सुधारण्याचा प्रयत्न केला तर त्यांना एक मोका निश्चित दिला गेला पाहिजे परंतु अशा प्रकारे गुन्हेगारी करावयाची आणि कोणत्या तरी पॉलिटीकली आश्रयाला जायचे, तुम्ही सत्तेत असाल तर तुमच्याकडे यायचे आणि आम्ही सत्तेत असलो की, आमच्याकडे यायचे असे त्यांचे काम असते. ते कोणत्याही पक्षाचे नसतात. त्यामुळे यांना कोणत्याही परिस्थितीत थारा मिळू नये हाच प्रयत्न या निमित्ताने करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अकोला येथील नवोदय विद्यालयाचा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. जानेवारी 2014 ची ही पहिली घटना आहे. यासंदर्भातील तक्रार आता दाखल

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .........

झालेली आहे. ही घटना तातडीने दाखल करण्यात आली आहे. आता या प्रकरणाची चौकशी देखील आपण करणार आहोत. परंतु यामध्ये ही देखील चौकशी केली जाईल की, एक वर्षापर्यंत प्रिन्सीपलने तक्रार दाखल केली नाही त्यामुळे त्या प्रिन्सीपलला यासंदर्भातील माहिती होती काय ? जर माहिती असेल तर त्या प्रिन्सीपलवरही कारवाई केली जाईल. कारण जानेवारी 2014 मध्ये घटना घडते, यामध्ये 45 मुलींना काहीनाकाही प्रमाणात त्रास देण्यात आलेला आहे. असे असताना एक एक वर्ष त्यासंदर्भात तक्रार होत नाही याचा अर्थ त्यामध्ये कोणाचाही तरी इनव्हॉल्व्हमेंट नक्कीच आहे असाच त्याचा अर्थ होतो. म्हणून यासंदर्भात निश्चितपणे कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केला आहे की, आयजीला निलंबित केले आणि ऑर्थर रोड जेलच्या अंडासेल मधील कैद्यांना मदत पुरवण्याचा त्याच्यावर आरोप आहे. मुळात जे सस्पेंड करण्यात आले ते आयजी नसून ते अधीक्षक आहेत. ते कधीही ऑर्थररोड जेलमध्ये नव्हते. त्यांच्यावर आपण म्हणता तसा आरोप नसून त्यांच्यावर वेगळा आरोप आहे. त्यांच्याविरुध्द शासनाकडे वेगवेगळया प्रकारचे 51 रिपोर्ट आले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर निश्चितपणे कडक कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, मागच्या चर्चेमध्ये कॉ.पानसरे यांचा मुद्दा मी घेतला नाही म्हणून टिका झाली होती परंतु नंतर मी त्यासंदर्भातील उत्तर दिले होते. आज देखील टिका होऊ नये म्हणून मी एवढेच सांगतो की, यासंदर्भात एकंदर 20 टीम कार्यरत असून या टिमला जेवढी टेक्नीकल मदत पाहिजे ती मदत आपण दिलेली आहे. यामध्ये ज्या लिड्स मिळाल्या आहेत त्यावर काम सुरु आहे. या घटनेत मोटरसायकल मिळाली असून चॅसी नंबरच्या आधारावर मालकाचा शोध घेण्यात आला परंतु ती चोरीची निघाली. चोरीचा तपास घेत असताना ती मोटारसायकल कोठून चोरीला गेली यासंदर्भात काही लिड्स मिळतात काय यासंदर्भात प्रयत्न सुरु आहेत. यासंदर्भात सीसीटीव्ही फुटेज आहे ते एम्प्लीफायर करुन त्यातून काही मिळते काय हे पाहण्याचा प्रयत्न सुरु आहे. या विषयाच्या संदर्भात तेथील एसपी अहोरात्र मेहनत घेत असून त्यांना मदतीसाठी बाहेरच्या टिमदेखील दिलेल्या आहेत. आव्हान म्हणून पोलिसांनी हे काम स्वीकारले आहे. ही केस सीबीआयला द्या, कोर्ट मॉनिटर

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .........

प्रोव्होक करा अशा वेगवेळया मागण्या होत आहेत. आपण यापूर्वी सीबीआयकडे डॉ. दाभोळकर साहेबांच्या चौकशीचे काम दिले होते परंतु त्यातून अजूनही काही निकाल आलेला नाही. परंतु ही गोष्ट तेवढीच खरी आहे की, आपल्याला अनंत काळापर्यंत थांबता येणार नाही, आपल्या ठरावीक कालावधीत याचा शोध घ्यावाच लागणार आहे. कोर्ट मॉनिटर प्रोव्होक करावा अशी मागणी या निमित्ताने करण्यात आली. यामध्ये आवश्यकता असेल तर त्याला सरकारची ना नाही. परंतु मला असे वाटते की, यासंदर्भात पोलिसांना आपण काही काळ दिला पाहिजे. त्यामुळे यासंदर्भात पोलीस निश्चितपणे तपास करतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि अनेक सन्माननीय सदस्यांनी कन्व्हीक्शन रेटच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी आपण कन्व्हीक्शनच्या रेटच्या संदर्भात उलट माहिती देत आहात. आपण सांगितले आहे की, आमच्या काळात कन्व्हीक्शन रेट 32 टक्के होता.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आघाडी सरकारच्या काळातील कन्व्हीक्शन रेटच्या संदर्भात आपण माहिती दिलेली आहे. मी कन्व्हीक्शनचा रेट 30-32 टक्के होता असे काही बोललो नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, यासंदर्भात मी मागचा संदर्भ दिला होता. ज्यावेळेस युतीशासन सत्तेवर आले होते तेव्हा म्हणजे 1996 मध्ये कन्व्हीक्शन रेट 32 पर्सेंट होता आणि 1999-2000 मध्ये तो 10 टक्क्यावर आला होता. मी मागचा संदर्भ दिला असून आपण चार महिन्याचा संदर्भ घेऊ नये असे मला वाटते. यामध्ये मागच्या सरकारचे कन्व्हीक्शन रेट वाढल्याचे प्रमाण असू शकते. त्यामुळे वर्षभर जाऊ द्या आणि नंतर सांगा एवढेच मी म्हणालो होतो.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, 1995 मध्ये सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता व त्यामध्ये प्रॉसिक्युशनला वेगळे करण्यात आले होते. त्यानंतर काही काळ रेट ऑफ कन्व्हीक्शन खाली आला होता. परंतु त्यावेळेस रेट ऑफ कन्व्हीक्शन 34 नव्हता. यासंदर्भातील संपूर्ण आकडेवारी माझ्याकडे आहे. त्यानंतर कन्व्हीक्शन रेट स्टेबल झाला व नंतरच्या काळामध्ये तो कमी कमी होत 8 टक्क्यावर आला होता. आता जो रेट ऑफ कन्व्हीक्शन झालेला आहे तो जानेवारी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .........

महिन्यात 28 टक्के आणि फेब्रुवारी महिन्यात तो 38 टक्के झालेला आहे आणि ही जी वाढ झालेली आहे (अडथळा)यासंदर्भातील सर्व आकडेवारी मी देण्यास तयार आहे. काल सुध्दा यासंदर्भातील आकडेवारी मी दिली होती. गंभीर गुन्हयामधला, रेप मधला रेट का वाढला याची माहिती दिली होती. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. ठाकरे साहेब बहुतेक उपस्थित नव्हते. यासंदर्भात काय काय स्टेप्स घेतल्या, हा रेट कोणत्या काळात वाढला होता त्याची माहिती मी दिली होती. त्याचे प्रॉसिक्युशन कधी झाले त्याची सुध्दा मी माहिती देण्यास तयार आहे. न्यायालयात खटला कधी चालला त्याचीही मी माहिती देतो. मी 15 वर्षे विरोधी पक्षात असल्यामुळे विरोधी पक्ष कोणकोणते प्रश्न विचारु शकतात याची मला पूर्ण कल्पना असल्यामुळे मी तयारीनिशी आलेलो आहे. त्यामुळे रेट ऑफ कन्व्हीक्शन अतिशय झपाटयाने वाढत असून त्यासंदर्भात आपण खूप स्टेप्स घेतल्या आहेत. आपल्याला हा कन्व्हीक्शन रेट 38 टक्क्यापर्यंत मेन्टेन करावा लागणार आहे.

सभापती होदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी लोनावळा व कॉ.पानसरे यांच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. कॉ.पानसरे यांच्या संदर्भात मी आताच उत्तर दिले आहे व लोनावळयाच्या संदर्भात कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेदरम्यान माहिती दिलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, लोनावळयाच्या संदर्भात उत्तर देताना आपण असे सांगितले होते की, आरोपीचे बिहारमध्ये लोकशन्स मिळाले असून मुंबईची टीम जाऊन आरोपीला अटक करेल अशा प्रकारचे आपण वक्तव्य केले होते. या गोष्टीला आता 15 दिवस झाले एवढेच मी आपल्या निदर्शनास आणून देतो.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपली टीम बिहारमध्ये असून बिहार सरकारची मदत आता मिळू लागली आहे. व्यक्ती समजला असून तो कोणत्या भागात आहे हे समजण्यासाठी थोडा वेळ लागतो आहे. यातील एका आरोपीला पकडण्यात आले असून एक आरोपी बिहारमध्ये आहे.

सभापती महोदय, कळवा पोलीस स्टेशनच्या संदर्भातील जी घटना आहे त्यासंदर्भात चौकशीचे आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी राहूरी येथील गट शिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे आणि प्रशांत मोहाडे यांच्यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. या प्रकरणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .........

निश्चितपणे चौकशी करुन जी कारवाई करणे शक्य असेल ती केली जाईल.

सभापती महोदय, डॉ. अशोक थोरात यांना जामीन मिळाला आहे अशा प्रकारचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी केला असून यासंदर्भात तपास घेऊन तो जर योग्य प्रकारे नसेल तर जामीन रद्द करण्याची कारवाई देखील निश्चितपणे केली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, लोनावळा येथे अडीच तीन वर्षापूर्वी कचरा वेचणाऱ्या 11-12 वर्षाच्या तीन मुलीपैकी एका मुलीवर रेप झाला होता.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

तर तीन मुलींना पोलीस स्टेशनमध्ये अडवून ठेवले होते. त्यावेळी मी स्वत: लोणावळा पोलीस स्टेशनला गेले होते. त्यातील एका मुलीला ससून रुग्णालयात ठेवले होते तर दोन मुली तेथून पळून गेल्या होत्या. त्या केसचे पुढे काय झाले याची चौकशी करुन माहिती द्यावी.

**सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांचे भाषण पूर्ण करु द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन वर्षापूर्वीची माहिती विचारलेली आहे. त्या संदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. माहिती घेऊन त्यांना ती देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी गृह विभागाकरिता वेगळा स्वतंत्र मंत्री असावा असे सांगितले. आज आर.आर.पाटील साहेब आपल्यात नाहीत, मुख्यमंत्र्यांकडे गृह खाते असणे का आवश्यक आहे ही त्यांची खंत आपण ऐकली असती तर ते आपल्या लक्षात आले असते. मी त्याचे उत्तर नंतर देईन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जोरदार आणि हल्लाबोल भाषण केले. मी त्यांना सांगू इच्छितो की, अक्कू यादव प्रकरणाची पुनरावृत्ती निश्चितपणे होऊ देणार नाही. नागपूरच्या घटनेचे मी समर्थन करणार नाही. मागील काळात किती घटना घडल्या, या काळात किती घटना घडल्या हे सांगून मला सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही आणि ती पद्धतही बरोबर नाही, असेही मी सांगितलेले आहे. ही गोष्ट खरी आहे की, नागपूरला काहीही झाले तरी सर्व चॅनेल्स आणि मीडियाचा पॉईन्ट ऑफ फोकस तिथ असतो. तो असणे साहजिकच आहे कारण मुख्यमंत्री नागपूरचा आहे आणि त्यांच्याकडे गृह विभागाचा कार्यभार आहे त्यामुळे त्यांचा फोकस फार मोठ्या प्रमाणावर आहे. हे आव्हान मी स्वीकारलेले आहे. नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेसाठी थोडा वेळ लागेल. मी या ठिकाणी आता जे सांगत आहे ते शब्दश: घेऊ नये. थर्ड स्टेजचा कॅन्सर झालेल्या पेशंटला स्पेशालिस्टकडे पाठवून त्याला दोन महिन्यामध्ये बरे करा असे कोणी सांगितले तर ते शक्य नाही. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी देखील सांगितले की, मागील 15 वर्षांचा उल्लेख करु नका. पण आम्ही तो उल्लेख का करु नये, कारण मागील 15 वर्षामध्ये ज्या व्यवस्था बिघडल्या.. (अडथळा )

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणलेला नाही. हे योग्य नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मुख्यमंत्री महोदयांना बोलू द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी काही मौलिक सूचना केलेल्या आहेत.. (अडथळा)...

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

**सभापती** : मी बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी बोलू नये. मुख्यमंत्री महोदयांना उत्तर पूर्ण करु द्यावे. त्यानंतर आपण आपले म्हणणे मांडावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, समोरुन आरोप करायचे आणि आम्ही त्यावर उत्तर द्यायचे नाही काय, असे कसे चालेल ? आपण केलेल्या आरोपांना उत्तर द्यावेच लागेल. आपण मला उत्तर देण्याकरिता येथे बोलाविले आहे.

सभापती महोदय, आपण आमची चार महिन्यांची कर्तबागारी सांगता तर आम्ही मागील सरकारची 15 वर्षांची कर्तबगारी सांगणार नाही काय ? आपण मागील 15 वर्षामध्ये काय केले ते सांगत नाही, पण आपण म्हणत असाल तर तेही सांगेन. आपण मला थांबवू शकत नाही. तसेच मी काय उत्तर द्यावे हे आपण मला डिक्टेट करु शकत नाही. माझे उत्तर मी स्वतः देईन. आपण मला डिटेक्ट करु शकत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांवर निश्चितपणे विचार करण्यात येईल. त्यांनी सांगितले की, काही मूलभूत बदल करण्याची आवश्यकता आहे. मला देखील तसेच वाटते आणि त्या मूलभूत बदलांकडे राज्य सरकारला नेत आहोत. त्यासाठी थोडा वेळ लागेल. पण ते शाश्वत दृष्टया होईल. आज रेट ऑफ कन्व्हीक्शन सुधारत आहे. रेट ऑफ डिटेक्शन सुधारत आहे. ही गोष्ट खरी आहे की, काही घटना घडत आहेत, त्यातील काही घटना गंभीर आहेत. राज्य सरकारने या सर्व घटनांची गंभीरतेने दखल घेतलेली आहे. मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, आम्ही पलायन करणार नाही.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

आम्ही प्रत्येक घटनेच्या मुळाशी जाऊ. मी राज्यातील जनतेला या सभागृहाच्या माध्यमातून आश्वस्त करतो की, राज्यातील पोलीस यंत्रणा सक्षम करुन कायदा आणि सुव्यवस्था योग्य प्रकारे राहावी यासाठी प्रयत्न करणार आहोत. सरकार स्थापन होऊन चार महिने झाले आहेत. सरकार नवीन आहे. या चार महिन्यांत खूप सुधारणा झालेल्या आहेत. रेट ऑफ कन्व्हीक्शन वाढत आहे, रेट ऑफ डिटेक्शन वाढत आहे. राज्याला सुरक्षिततेकडे नेण्याकरिता हे सरकार कटिबद्ध आहे एवढेच या ठिकाणी सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

**सभापती** : मी सन्माननीय सभागृहाला सांगू इच्छितो की, अल्पकालीन चर्चेवर राईट ऑफ रिप्लाय आहे होतो काय हा पहिला विषय आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी राईट ऑफ रिप्लायसाठी उभा नाही. माननीय मुख्यमंत्री उत्तर देत होते आणि आम्हाला त्यांचे उत्तर ऐकायचे होते. उत्तर देत असताना त्यांच्याकडून एका प्रश्नाचे उत्तर राहून गेले आहे. मी माझ्या भाषणाच्या शेवटी एक उल्लेख केला होता की, मागील 15 वर्षात आम्ही काय केले हे आम्हाला सांगू नये. मागील 15 वर्षात जे काही झाले ते वाईट झाले असे त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला सांगितले. (अडथळा)....

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते..

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष राईट ऑफ रिप्लायवर बोलत नाही. ते त्यांच्या भाषणातील मुद्यावर बोलत आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला देखील तो विषय घ्यायचा नव्हता. कदाचित माननीय मुख्यमंत्र्याकडे चुकीची माहिती आली असेल. तो आरोपी काँग्रेस पक्षाचा नाही, पदाधिकारी नाही. तो कोणाचा याचे सर्व पुरावे देऊ. माझ्याकडे जे पुरावे आहेत ते मी देतो आणि आपल्याकडे जे पुरावे आहेत ते आपण द्यावेत. जेन्टीलचा विषय कोणी काढला ? पण आपण मला येथे सांगावे की, नागपूरचा बागडे तडीपार आहे. त्या मुलीचा गुन्हा नोंदवून घेण्यास तीन तास लागले. त्या अधिकाऱ्याची आपण बदली केली. गुन्हा गंभीर आहे. ज्याला नागपूरमधून तडीपार केले आहे तो नागपूरमध्ये आहे आणि तो मुलीला छेडत आहे. त्या प्रश्नाला पद्धतशीरपणे बगल दिलेली आहे.... ......(अडथळा)..

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राईट ऑफ रिप्लाय नसताना जो काही मुद्दा मांडला आहे त्यावर माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत असा माझा समज आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या घटनेतील कोणालाही स्पेअर करण्याचे काही कारण नाही. या प्रकरणामध्ये संबंधितांची तातडीने बदली केलेली आहे. आवश्यकता असेल तर कारवाई करण्यात येईल आणि ज्याच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे त्याला सस्पेंड देखील केले जाईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आम्ही सभात्याग करतो.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 6 एप्रिल, 2015 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 09 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 6 एप्रिल, 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION